होते, तेव्हा अशा शब्दांच्या अर्थात व्यवस्थितपणा, प्रमाणबद्धता, बांधेसूदपणा या संकल्पनांचाही समावेश होतो. त्यामुळे घाट व आकार हे शब्द त्यांच्या मूळच्या 'दृश्य' संदर्भापलीकडे जाऊन इतर क्षेत्रांतही वापरले जातात. फॉर्मसाठी 'रूप' ही संज्ञा ढोबळपणे वापरली जाते. परंतु फॉर्म म्हणजे केवळ रूप नव्हे, तर कलाकृतीच्या अंतर्गत घटकांची सौंदर्यतत्त्वांच्या आधारे केलेली संघटना वा बांधणी या अर्थाने 'रूपबंध' हा शब्द वापरला जातो. (एस. डी. इनामदार : २०१५ : ४२) कलाकृतीच्या अंतर्गत घटकांमधील सौंदर्य निकषांच्या आधारे मांडणी करणे म्हणजेच 'रूपबंध' होय असेही म्हणता येवू शकते. कलाकृतीला सर्वार्थाने नावीन्यपूर्ण रूप प्रदान करण्याचे रूपबंधातील विभिन्न प्रयोगांच्या माध्यमातून शक्य होत असते.

कोणतीही कलाकृती आशय आणि अभिव्यक्ती यांच्या माध्यमातून संपन्न होत असते. आशय आणि अभिव्यक्ती या दोन संकल्पनांच्या संमिश्रणातूनच कोणतीही कलाकृती साक्षात होत असते. *कलाकृतीचे आशय आणि अभिव्यक्ती असे विभाजन केल्यास अभिव्यक्तीला 'फॉर्म' म्हणणे योग्य ठरते. फॉर्ममध्ये ऐंद्रिय माध्यम, अभिव्यक्तीचे तंत्र व शैली यांचा समावेश करावा लागतो.* (एस. डी. इनामदार : २०१५ : ४२) कलाकृतीच्या अभिव्यक्तीचे तंत्र आणि शैली यांना सामावून घेण्याचे कार्य फॉर्म म्हणजेच रूपबंध करत असतो असे म्हणता येवू शकते.

इंग्रजीतील 'फॉर्म' या संकल्पनेसाठी मराठीत विविध संज्ञा रूढ आहेत. त्यांचा वापरही वेगवेगळ्या अनुषंगाने केला जात असतो. फॉर्मला रूपबंध, घाट, आकार, घडण, संघटना वा सुसंघटना, आकृतिबंध, रचनाबंध इत्यादी अनेकविध पर्याय समीक्षकांनी वेगवेगळ्या संदर्भात सुचवले आहेत. फॉर्मसाठी कोणत्या संदर्भात कोणता पर्याय योजावा याबाबतीत औचित्य बाळगणे जरुरीचे असते. कलाकृतीच्या अंतर्गत घटकांना अनुसरून 'रूपबंध' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असते.

निर्माण होणाऱ्या प्रत्येक कलाकृतीला काही अंतर्गत घटकांची महत्त्वपूर्ण मदत घ्यावी लागत असते. म्हणूनच कलाकृतीच्या निर्मितीक्षम गुणवैशिष्ट्यांसाठी अंतर्गत घटकांची रचना अत्यंत महत्त्वाची असते. *केनेथ बर्कचे 'फॉर्म' संबंधी एक मार्मिक विधान आहे, 'Form is the potentiality of being interested by certain processes of arrangements' (रचनांच्या विशिष्ट प्रक्रियांमध्ये रस घेण्याची क्षमता म्हणजे रूपबंध)* (एस. डी. इनामदार : २०१५ : ५१) कलाकृती सकारात असताना तिने तिच्या अंतर्गत रचना प्रक्रियांशी जी सुसंवादी भूमिका जोपासलेली असते त्यावरच तिच्या रूपबंधाची नेमकी दिशा ठरत असते. रूपाबंधाच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांसाठी कलाकृतीने तिच्या अंतर्गत रचनात्मक घटकांशी नेहमीच सुसंवादी राहायला हवे असे यावरून निश्चितपणे म्हणता येते.

आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या वस्तूला तिच्यातील अंतर्गत माध्यमामुळे मिळणाऱ्या विशिष्ट रूपाला किंवा आकाराला रूपबंध असे म्हणता येवू शकते. अभिप्रेत वस्तूला तिच्या आशयामुळे मिळणाऱ्या घाट किंवा आकारालाही रूपबंध ही संकल्पना लागू पडते. *आशय व अभिव्यक्ती हे दोन वेगवेगळे घटक असून त्यांच्यात औचित्याचे नाते असते. आशय व अभिव्यक्ती यांच्यात एक प्रकारचे साधर्म्य असते. हे साम्य संवेदनांचे गुण व आशयाचे स्वरूप यांच्यात असते. त्याचप्रमाणे संवेदनांच्या बांधणीतील अंतर्व्यवस्था व आशयातील अंतर्व्यवस्था यांच्यातही साम्य असते.* (रा. भा. पाटणकर : १९७४ :३८७) कोणत्याही कलाकृतीचा आशय तिचा स्वतःचा घाट किंवा आकार घेऊन प्रत्यक्ष अवतरत असतो. कलाकृतीमधील आशय आणि अभिव्यक्ती यांचे जेव्हा विभाजन केले जाते तेव्हा अभिव्यक्तीला त्या कलाकृतीचा रूपबंध समाजाला जातो.

कोणतीही कलाकृती सकारात जाताना त्या कलाकृतीतील अंतर्गत घटकांची एक वैशिष्ट्यपूर्ण रचना सकारात जात असते. या अंतर्गत घटकांच्या सुनियोजित

मांडणीचा कलाकृतीच्या निर्मितीप्रक्रीयेवर मोठा प्रभाव पडत असतो. कलाकृती सकारात जाताना ती विशिष्ट ‘फॉर्म’ म्हणजेच ‘रूपबंध’ आत्मसात करत असते. ‘फॉर्म’ या एकाच संकल्पनेचे विविध अर्थ आपणाला ‘फॉर्म’ या एकाच संकल्पनेच्या माध्यमातून अनुभवता येतात. *पहिला अर्थ रूप किंवा सौष्ठव, दुसरा अर्थ आकृती, तिसरा अर्थ आकार, निर्मित वस्तूचा आराखडा, घाट, तिची रचना, चौथा अर्थ अभिव्यक्ती, मांडणी आणि पाचवा अर्थ सत्त्व.* (अशोक केळकर : १९७६ : २७) कलाकृतीच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीतून तिला नावीन्यपूर्ण सौष्ठत्व प्राप्त होत असते. एका विशिष्ट आराखड्याच्या सहाय्याने कलाकृतीतून नेमका जीवनानुभव अभिव्यक्त करण्याचे कौशल्य रूपबंधाच्या माध्यमातून सहजपणे शक्य असते.

कोणताही बेढब, बेडौल, ओबडधोबड, वेडावाकडा आकार म्हणजे कलेतील आकार नव्हे, हे उघड आहे. कलेतील आकार निर्माण होत असताना तो एक वैशिष्ट्यपूर्ण, सौंदर्ययुक्त आकार धारण करता असतो. कलाकृतीला जो आकार प्राप्त होत असतो, तो कोणत्या प्रतीचा आहे यावरच त्याची प्रतवारी अवलंबून असलेली दिसून येते. *कलेतील आकार (फॉर्म) हा सौंदर्ययुक्त असतो. तो सौंदर्याकार असतो. सौंदर्यानुभूती निर्माण करणारा आकार म्हणजे कलेतील आकार होय. कलाकृतीमध्ये आकाराला सौंदर्यपूर्ण रूप दिले जाते, ते कलाकृतीच्या अंतर्गत घटकांच्या संघटनेद्वारा. कलेतील आकाराची बांधणी करणारी ही संघटनातत्त्वे म्हणजे संवाद, विरोध, समतोल ही लयतत्त्वे होत. कलेतील आकारिक घटकांची संघटना ही सुसंवादी, एकात्म, एकजिनसी व सेंद्रिय स्वरूपाची असावी लागते, तरच ती कलाकृती सजीव व अनन्यसाधारण ठरते.कलाकृतीमध्ये आकाराला सौंदर्यपूर्ण रूप दिले जाते. हा सौन्दार्याकार म्हणजेच कलाकृतीच्या रूपबंधाचे सत्त्व वा प्राणतत्त्व होय.* (एस. डी. इनामदार : २०१५ : ४७) कलाकृतीच्या अंतर्गत घटकांची सौंदर्यपूर्ण आणि संगतवार केलेल्या मांडणीनेच त्या कलाकृतीस एक वैशिष्ट्यपूर्ण रूपबंध प्राप्त झालेला असतो.

कलाकृतीने धारण केलेला रूपबंध हा बहुतांश तिच्या अंतर्गत घटकांनी समृद्ध केलेल्या आशयसंपन्न अनुभवांनी बंदिस्त केलेले असतो. म्हणूनच कलाकृतीच्य निर्माण प्रक्रियेत सौंदर्यपूर्ण मांडणी अत्यावश्यक बाब असलेली दिसून येते.

मानवी जगण्याशी अनुसंधान बांधत कुठलीही कलाकृती वास्तविक जीवनानुभवाचे विलक्षण दर्शन घडविण्याचा प्रयत्न करत असते. *आयुष्य जगत असताना कथनरूप रचत राहण्याची माणसाची प्राचीन सवय आहे. या सवयीमधून आयुष्याला विशिष्ट आकार दिला जातो. अनुभवांना रचनाबंध प्राप्त करून दिला जातो. अनुभव, स्मृती, आविष्कार यांना कथनरूपात ढाळण्याची प्रवृत्ती मानवी व्यवहारांच्या केंद्रस्थानी असते.* (हरिश्चंद्र थोरात : २०११ :०९) अनुभवांना शब्दांच्या विशिष्ट ठेवणीतून विशिष्ट आकार प्राप्त करून देतानाच त्या अनुभवांची आशयात्मक कथानके तयार व्हावीत यासाठी अपेक्षित रूपबंध महत्त्वाची भूमिका पार पडत असलेला दिसून येतो. आयुष्यात वाट्याला येणाऱ्या विभिन्न कथनरूपांना वैशिष्ट्यपूर्णतेणे अभिव्यक्त करताना कलाकृतीचा रूपबंध महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतो.

१.३ नव्वदोत्तर कालखंडाची कथा आणि रूपबंध

उत्तराधुनिक काळात वाङ्मयप्रकारांची चिकित्सा अधिकाधिक डोळस होताना दिसते. १९९० नंतरचा काळ सबंध जगण्याला एक प्रकारची गतिमानता देणारा काळ आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या साहित्य कलाकृतींना, त्यांच्या रूपबंधाला एक प्रकारचा बंदिस्तपणा आला. एक प्रकारचा आटोपशीरपणा आला. या कालखंडातील कथांमधून 'काय सांगितले' या बरोबरच 'कसे सांगितले' या गोष्टींना अत्यंत महत्त्व आले. लघुकथा वाङ्मयप्रकाराला अधिकाधिक समृद्ध करणाऱ्या ना.सि.फडके यांनी आशयापेक्षा अभिव्यक्तीला दिलेले महत्त्व या कालखंडातही कायम राहिले. उलट रूपबंधाला केंद्रस्थानी आणणारी शैली लोकप्रिय झालेली दिसून येते.

साठच्या दशकात रूपबंधाविषयीची जाणीव वाढू लागली असली तरी एक प्रकारचा तंत्रवादही या काळात रूजलेला दिसून येतो. कथेसारख्या लेखन प्रकारात गाठ, निरगाठ आणि उकल अशी सोपी समीकरणे सांगणारा साचाच या कालखंडात निर्माण झालेला दिसून येतो. अभिव्यक्तीच्या खोलात खऱ्या अर्थाने न शिरल्याने मराठीत मोठ्या प्रमाणात तंत्रवाद बोकाळलेला दिसून येतो. त्यामुळे रूपबंधाविषयी समज या कालखंडात वाढलेली दिसून येत असली तरी रूपबंधाचे खरे स्वरूप आणि त्याची जडणघडण कशी होते, याचे विवेचन मराठीत या काळात कटाक्षाने झाले नाही.

१.४ आशय आणि अभिव्यक्ती:-

कोणतीही कलाकृती तिच्या अंतर्गत घटकांनी निर्मिलेल्या रूपबंधीय संकल्पनांनी बंदिस्त केलेली असते. रूपबंधाची जडणघडण नेमकी कोणत्या तऱ्हेने होते हे सांगणे अर्थात थोडे अवघड आहे. यासाठी आशय आणि अभिव्यक्ती या दोन संकल्पनांचा विचार प्रथम करावा लागतो. आशय अभिव्यक्त होत असताना त्याला त्याचे स्वतःचे असे रूप लाभत असते. *पण आशायाला स्वतःचा असा आकार असतो का? कलावंताच्या मनात काही एक कालाबीज उद्भवते त्यावेळी त्या कालाबीजाला स्वतःचा असा गर्भजात आकार असतो का? कालाबीजाचा उद्भव आणि कलाकृतीचा अंतिम आकार यांमधील संबंधांचे स्वरूप काय असते? असे अनेक या संदर्भात उभा करून, कलागर्भाला उपजत स्वतःचा आकार असतो, अनुभवाचे पहिले अवतरण असा आकार घेऊनच जन्मते.* (सु. रा. चुनेकर : १९६४ : ४०७) आशयानुभावाला अनुसरून कलाकृतीला तिचा स्वतःचा असा आकार प्राप्त होत असतो. हा आकार त्या कलाकृतीच्या अंतर्गत घटकांनी बंदिस्त केलेला असतो. कलाकृतीला तिचा असा एक स्थायीभाव असतो. तिच्या अंतरंगातील घटकांच्या सुसूत्रतेमध्ये तिचे वेगळेपण

अवलंबून असते. प्रत्येक कलाकृती तिचा स्वतःचा वेगळेपणा जोपासण्यासाठी वेगवेगळा रूपबंध स्वीकारत असते.

आशय आणि अभिव्यक्ती असे दोन शब्द आपण वापरत असलो तरी प्रत्येक श्रेष्ठ कलाकृतीच्या सहवासात आशय आणि अभिव्यक्ती यांचे अभिन्नत्वच विशेषत्वाने प्रतीत होते. परंतु असे असूनही कलेचा आशय हा तिचे अंतिम रूप निश्चित करीत असतो की, विशिष्ट रूप निर्माण करण्याच्या हेतूनेच कलावंत कार्यप्रवृत्त होत असतात. प्रत्येक कलाकृतीचे अंतिम रूप ती ज्या अनुभवबीजातून निर्माण झाली त्या अनुभवबीजावर, ते बीज ज्या मनोभूमीत रुजले त्या मनोभूमीवर, तिच्या ठिकाणी असणाऱ्या नवनिर्मिती करण्याच्या शक्तीवर आणि सौंदर्यनिर्मितीच्या ज्या अलिखित तिचा अवतार झाला त्या नियमावर अवलंबून आहे.

कलानिर्मिती होते म्हणजे केवळ भावानुभव व्यक्त होत नाही, तर तो भावानुभव ती विशिष्ट चित्राकृती घेऊन अभिव्यक्त होतो. असे होते म्हणूनच अशा कलाकृतीच्या परिशीलनाने एकाच वेळी सत्य आणि सौंदर्य यांचा साक्षात्कार होतो त्यातूनच आशय आणि अभिव्यक्ती यांमधील अभिन्नता जाणवते. *ललितकलांच्या क्षेत्रात वेगवेगळ्या घाटांना आणि घाटदारपणाला विशेष महत्त्व आलेले आहे. केवळ ललित वाङ्मयाचा विचार केला तरी आपणास त्यात कितीतरी वेगवेगळे घाट दिसून येतात. ललित वाङ्मयाचे प्रकार काल्पितानाही आपण ह्या विविध प्रकारांचे घाट लक्षात घेऊनच त्यांना कविता, लघुकथा, कादंबरी, नाटक इत्यादी नावे दिली आहेत ना? लघुकथेतून प्रकट होणाऱ्या अनुभवाची प्रकृती कादंबरीहून अथवा नाटकातून व्यक्त होवू पाहणाऱ्या भावानुभावाच्या प्रकृतीहून वेगळी आहे म्हणून लघुकथा ही कादंबरी, नाटकापासून वेगळी झालेली आहे की काय असा प्रश्न आपल्या मनात आल्याखेरीज राहात नाही. सर्वच लघुकथा ह्या लघुकथा असल्या तरी प्रत्येक उत्तम लघुकथेचा घाट वेगळा असतो. तो तिच्यातून व्यक्त होऊ पाहणाऱ्या अनन्यसाधारण जीवनानुभवाने बराचसा निश्चित*

केलेला असतो. तिच्यातून साधली गेलेली चित्राकृती ही त्या जीवनानुभवाने जणू सहजपणे स्वीकारलेली असते व म्हणून तिच्यात एक प्रकारची विलोभनीय वेगळीक अवतरते. अभिव्यक्तीची व त्या अभिव्यक्तीमधून आपोआप प्रकट होणाऱ्या रूपाची अपरिहार्यता जाणवल्याखेरीज रसिक मनाचे समाधान होणेच शक्य नाही. प्रत्येक आशय आपल्याबोबर आपला स्वतःचा फॉर्म घेऊन जन्माला येतो. कलाकृती निर्माण होईपर्यंत तिचा फॉर्म कसा असेल याबद्दल कलावंत काहीच सांगू शकत नाही. आशयाला समांतर असणारा रूपबंध कोणत्याही कलाकृतीच्या अंतरंगात सकारात जात असतो. कलाकृतीने धारण केलेल्या रूपाचा सरळ संबंध तिच्यात सामावलेल्या आशयाच्या स्वरूपावर अवलंबून असलेला दिसून येतो. कोणतीही कलाकृती तिच्या रूपासाठी तिच्या अंतरंगाने सामावून घेतलेल्या आशयाशी संबंधित असते असे निश्चितपणे म्हणता येते.

ललित वाङ्मयाची प्रकृती तपासताना मधु कुलकर्णी यांनी साहित्याच्या रूपबंधाबद्दल काही विचार प्रकट केले आहेत. ते लिहतात, *प्रत्येक अनुभव आपला रूपबंध जणू आपणच शोधीत आहे. आपली आंतर व्यवस्था आपणच निश्चित करीत आहे. म्हणूनच ललितकृतीपरत्वे ही आंतररचना, ही संघटना बदलते आहे. तिच्यात गणिती एकसुरीपणा नाही. प्रत्येक अनुभवाचे अंतर्गत ताण वेगळे, त्याची बोलण्याची रीत वेगळी, चाल वेगळी, अंतर्विश्वाची रचना वेगळी, तिच्या अंतर्गत घटकातील सुसंगती त्या समग्र अनुभवाच्या संदर्भात जणवत असते.* (मधु कुलकर्णी : १९८७ :१२२) म्हणजेच मधु कुलकर्णी आशय आणि अभिव्यक्ती यांच्यात अभिन्नत्व मानतात. अभिव्यक्तीमधून प्रकट होणाऱ्या रूपाची अपरिहार्यता जाणवली पाहिजे असे त्यांना सांगावेसे वाटते. प्रत्येक अनुभव आपला रूपबंध आपणच शोधीत असतो, आपली आंतर्व्यवस्था आपणच निश्चित करत असतो. विचार आणि अनुभूती प्रतिभेच्या

सहाय्याने कल्पनेच्या पातळीवर गेल्यावर तिच्यात जी चित्राकृती कलावंताला जाणवते ती तिची अभिव्यक्ती असते याविषयी त्यांनी अचूक भाष्य केलेले आहे.

कोणतीही कलाकृती सकारात असताना त्या कलाकृतीच्या अंतर्गत घटकांच्या मांडणीच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर बहुतांश वेळा अवलंबून असलेले दिसून येते. *कलाकृतीबद्दल असे म्हणता येते की तिच्या सामर्थ्याचे सारे मर्म आकृतीत असते. काय सांगितले आहे, काय शिल्पित किंवा चित्रित केले आहे यातच कलेचा दर्जा व कस ठरतो. जुन्या समीक्षकांनी ध्वनीला किंवा रसाला महत्त्व देताना ह्याच 'कसे' वर भर दिला आहे व आपणही आकृती म्हणजे सर्वस्व मानू लागलो आहोत. 'आकृती' म्हटले की तिला एकीकडे अंतर्गत व्यवस्था व दुसरीकडे बाह्यसंबंध मानावे लागतात. त्यामुळे अमुक परिसरात ती आकृती सजीव आहे व तिच्या अशा अवयवांची एकात्मता आकृतीरूपात साधली गेली आहे असा दुहेरी विचार करावा लागतो.* काय सांगितले आहे यापेक्षा कसे सांगितले आहे यावर कलाकृतीचे वेगळेपण अवलंबून असते. वेगळ्या संकल्पनांच्या वापरणे निश्चितच वेगळी कलाकृती सकारात असते.

वाङ्मयीन कलाकृती साकारात असताना तिच्या अंतरंगात सामावलेल्या आशयाच्या क्षमतेवर, तिच्या कसावर जसा त्या कलाकृतीचा दर्जा अवलंबून असतो, तसाच त्या कलाकृतीच्या आशयाने अभिव्यक्त होताना कोणता रूपबंध स्वीकारलेला आहे यावरही तिचा वेगळेपणा, तिच्यातील सक्षमपणा, नावीण्यापूर्णता अवलंबून असते. कलाकृती अस्तित्वात येत असताना तिला व्यक्त होताना जो रूपबंध सोयीचा वाटतो तो तिने धारण केलेला असतो. या रूपबंधावरच तिच्या यशापयशाची गणिते अवलंबून असलेली दिसून येतात. रसिकांच्या मनावर आजही अधिराज्य गाजविणाऱ्या कलाकृतींच्या याशास्वीतेमागे त्या-त्या काळाला मागे टाकत त्या कलाकृतीने नव्याने स्वीकारलेल्या अभिव्याक्तींचे गणित असते असे म्हणावयास शक्य होताना दिसते.

कलावंत कलाकृती निर्माण करत असताना साध्या विषयातूनही नावीन्यपूर्ण आशय घडवित असतो. प्रतिभावंतांना सध्या गोष्टीतूनही एखाद्या महाकाय कादंबरीची बीजे निर्माण करता येत असतात. छोट्या गोष्टीतून मोठा आशय निर्माण करणे ही कोणत्याही कलावंताची खासियत असते. *कलात्मक कल्पनेच्या व्यापारामुळे निर्माण होणाऱ्या कालाकृतीमध्ये एकात्मताही असते आणि आकृती व आशय ही जोडीही असते. या जोडीचा परस्परसंबंध पुन्हा या एकात्मतेतच विलीन होणारा असतो. किंबहुना या एकात्मतेच्या रहस्यामुळेच, आकृतीला शोधण्याचा प्रयत्न जो जो सफल व्हावा तो तो आकृती आशयात विलीन झालेली आढळते. अभिव्यक्तीमध्ये आविष्काराचा भाग येतो. हा आविष्कार होत असताना आशयाची नवी स्फुरणे होत राहतात. ती पकडण्यासाठी लेखकाकडून प्रयत्न होत राहतो. आशयातून आविष्कार आणि आविष्कारातून नव्या आशयाची स्फुरणे होत असतात.* आशय आणि अभिव्यक्तीच्या एकात्मतेवरच साहित्य निर्मितीचा डोलारा अवलंबून असतो. कलाकृतीमधील आशय आणि अभिव्यक्ती या गोष्टीच प्रामुख्याने कलाकृतीचा कस ठरवत असतात.

कलाकृतीच्या आशयाने स्वीकारलेल्या अभिव्यक्ती पद्धतीवर त्या कलाकृतीचा रूपबंध अवलंबून असतो. कलाकृतीने स्वीकारलेल्या विशिष्ट घाटातून तिचा विशिष्ट आकार उमलत जात असतो. *सौंदर्यमीमांसेतील एक अगदी मामुली प्रमेय आहे की कलाकृतीचे सौंदर्य त्यात आविष्कृत झालेल्या फॉर्मवर, सुसंघटनेवर, तिच्या घडणीवर किंवा घाटावर अधिष्टीत असते. वाङ्मयाच्या क्षेत्रात हा फॉर्म, ही सुसंघटना, हा घाट आपणाला अभिव्यक्ती पद्धतीत शोधता येतो, किंवा जे व्यक्त करायचे ते आणि ते व्यक्त करण्याची साधने किंवा पद्धती यांच्या परस्पर संबंधातून वाङ्मयातील फॉर्मचे, सुसंघटनेचे स्वरूप कसे असते, याचा कयास आपण बंधू शकतो.* कलाकृतीतून आपण जे व्यक्त करत असतो त्यावरच तिचा रूपबंध निश्चित होत असतो. त्या रूपाबंधला साकारण्यासाठी कलाकृतीमधील अंतर्गत घटकांची एक वैशिष्ट्यपूर्ण ठेवण अपेक्षित

असते. ज्यामुळे ती कालाकृती अन्य कलाकृतींपेक्षा भिन्न आणि आशयसंपन्न भासत असते.

साहित्याचा आशय आणि त्याचे रूप व शैली या घटकांचा वेगळा विचार लेखक निर्मितीच्या वेळी करत नसावा असेच वाटते. अनुभवाचा आशय व्यक्त होतानाच त्याचे रूप लेखकाच्या निर्मितीच्या अंगाने सहजपणेच येते आणि अशा सहजतेने येतायेताच सिद्ध होत जाते. पण लेखानाआधी त्याचा रूपविषय अनुभवाचा घटक होत नसावा आणि शैली ही तर लेखकाच्या लेखकपणाचीच महत्त्वाची ओळख आहे. आपल्या शैलीची मुद्रा न पडलेला आणि आशयानुरूप शैलीची विविध रूपे शोधून ती सामर्थ्याने व्यक्त करणाराही लेखकच असतो. ही शैली माणसाच्या अष्टविध प्रकृतीप्रमाणेच लेखकाच्या निर्मितीशी अभिन्न अशी आहे. लिहितेसमयी त्याचा किंवा इतर रचनात्मक अंगाचा वेगळा अभ्यास होतो असे नसेलच. पण लेखनानंतर प्रसिद्धीपूर्वी किंवा प्रसिद्धीनंतर स्वतःच्या लेखनातील या अंगाचा विचार लेखकाने स्वतःकरता केला किंवा त्याला तो करता आला तर ? तर काय होईल? मग लेखनाच्या वेळी तो कमालीचा सावध होईल का? जे लेखन अजाणतेपणी, सहजतेने झाले तेच तो जास्त सजगतेने करेल की त्याला बंध पडतील? स्वतःच केलेल्या रचना-विचाराचे? की आपल्याच लेखनाच्या रचनात्मक अभ्यास-विचाराने त्याला काही नवे आयाम मिळतील? तो कुतूहलाने, तटस्थपणे किंवा गुंतूनही, असा आपल्या निर्मितीकडे बघू शकेल? काय होईल? निर्मितीविचार कधी असा अधोरेखित करता येतही नाही. परंतु लेखनाच्या रचनात्मक घटकांचा वेगळा अभ्यास होऊ शकतो आणि व्हायला पाहिजे.

लेखक जेव्हा कादंबरी लिहितो, तेव्हा त्याला कादंबरी लिहिणार आहे हे आधी माहित असते. म्हणजेच कादंबरी लिहिता लिहिता कादंबरीची कथा होते किंवा तिचे नाटकात रुपांतर होते असे होत नाही. *कथासूत्र व त्यामागील आशय स्वतःबरोबरच स्वतःचा रूपबंध निश्चित करतो आणि लेखकाच्या आवाहनानुसार अवतरत येतो. जे*

सांगायचे आहे ते कथन कोणत्या रूपबंधात आणले पाहिजे हे कोण ठरवतो? या प्रश्नाचे ढोबळ आणि योग्य उत्तर असे की हे लेखकच स्वतः ठरवत असतो. पण त्याबरोबरीने कलाकृतीमधील आशय आणि तीत दडलेला अनुभव स्वतःच्या रूपाबद्दल आपोआपच निर्णय घेत असतो. त्यामुळे कलाकृतीमधील पत्रांचा नियंता लेखक असत नाही, तर पात्रांचे वर्तन व त्यांची कलाकृती अंतर्गत असलेली नियती, त्यांचे भवितव्य निर्मितीच्या पातळीवर आधीच ठरलेले असते. लिहिताना बदल होणे इत्यादी बाह्य संस्कार लेखकाकडून जरी होत असले तरी कलाकृतीमधील अंतर्गत सुसंगतीच रूपबंध ठरवत असते. (भारत सासणे : २००९ :११७) साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकास कलाकृतीचा प्रकार निश्चित करण्याची अनुमती असते. परंतु कलाकृती कोणता आकार घेऊन अवतरणार आहे, हे बहुतांश वेळा त्या कलाकृतीने धारण केलेल्या रूपाबंधावर, तिच्यातील अंतर्गत घटकांवर अवलंबून असल्याचे ठामपणे म्हणता येते. कलाकृती सकारात जाताना तिच्यातील अंतर्गत घटकांची सुसंगती कशा रीतीने श्रेणीबद्ध राहते यावर तिच्या रूपाबंधाचा नेमका चेहरा निश्चित होत असतो. आपण निवडलेले जे आकाश असते ते स्वतःच स्वतःचे रूप ठरवीत असते. त्यामुळे या निवडल्या गेलेल्या द्रव्याचे प्रकटीकरण कोणत्या शैलीत केले जावे याचेही दिग्दर्शन कलाकृती स्वतःच करते. म्हणजेच रूप, घाट, शैली इत्यादींबाबत लेखकाचा जरी विचार असला तरी हा विचार निर्मितीच्या अबोध पातळीवर जी गूढ अशी प्रक्रिया घडते त्या प्रक्रियेशी सुसंगत असतो. ही प्रक्रिया प्रयत्नपूर्वक घडवता येत नाही. ही प्रक्रिया स्वयंप्रेरणेने घडून येते.

लेखक जेव्हा साहित्याच्या निर्मितीक्षमतेचा आपल्या जाणिवांच्या प्रस्तुतीकरणासाठी उपयोग करत असतो तेव्हा तो कलाकृतीच्या विभिन्न पैलूंचा अत्यंत खुबीने उपयोग करत असतो. लेखकाने निर्माण केलेली ही कलाकृती जेव्हा वाचक आपल्या अन्वयार्थ लावण्याच्या क्षमतेच्या जोरावर जाणून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला निर्माण केलेली कलाकृती ही वास्तव अनुभवांचे प्रतिबिंब उमटविणारी कलाकृती

आहे की वास्तवाचे काही अंश घेऊन रचलेली वास्तववादी कलाकृती आहे याविषयीचा संभ्रम त्याच्या मनात बहुतांश वेळा निर्माण झालेला दिसून येतो. *लेखकाने जे लिहिलं आहे ते प्रत्यक्ष घडलं आहे की घडवलं आहे हे वाचकाने ओळखायचं कसं? तर ह्या संदर्भात ढोबळमानाने असा म्हणता येईल की वास्तववादी साहित्य हे त्यातील जे घटित आहे ते वाचकाला प्रत्यक्षात घडलेलं वाटावं अशा पद्धतीनं रंगवण्यात येतं. उलट 'फिक्शन' मध्ये वास्तवात जे घडायला तर खरं हरकत नाही, परंतु जगरहाटीमध्ये, व्यवहारांच्या दबावामुळे तसं सहसा घडत नाही, हेतुपुर:सर घडवलं जातं. त्याच्या मांडणीचा सूर वाचकांना आपण हे रचलेलं आहे ह्याची जाणीव करून देणारा असतो. त्याचा हेतूच मुळी वाचकांच्या मनात 'हे खरोखरच घडलं असावा का?' अशी शंका निर्माण करणं हा असतो. अशा प्रकारच्या मांडणीलाच ढोबळमानाने 'घाट' असं म्हणता येईल.* (सतीश तांबे : २००७ : २१०) लेखकाच्या निर्मितीप्रक्रीयेलाच जाणून घेण्याचा मार्ग म्हणून कलाकृतीच्या घाटाचा अर्थात रूपबंधाचा सूक्ष्मतर अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लेखकाची, त्याच्या लेखन प्रक्रियेची जडणघडण जाणून घेण्यासाठी त्याच्या रूपबंधाकडेच जावे लागते.

१.५ निष्कर्ष

१) कलाकृतीला विशिष्ट आकार प्राप्त होण्यासाठी तिच्यातील अंतर्गत घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. अंतर्गत घटकांच्या स्थाननिश्चीतीवरच त्या कलाकृतीला विशिष्ट रूपबंध प्राप्त होत असतो.

२) साहित्याचा अनुभव घेण्याच्या प्रक्रियेतूनच तिचा विशिष्ट स्वभाव, गुणधर्म आपल्या मनावर प्रतिबिंब उमटवत असतात. कोणत्याही साहित्य कलाकृतीचा रूपबंध काळाच्या बदलानुसार ठरत असतो. काळाच्या बदलत्या परिमाणांना सामावून घेण्याचा प्रयत्न प्रत्येक कलाकृती करत असते.

३) मराठी साहित्यात कलाकृतीला विशिष्ट आकार प्रदान करणारी संघटना म्हणून रूपबंध ही संकल्पना वापरली जाते. एखादी कलाकृती कोणत्या घटकांच्या संयोगातून निर्माण झालेली आहे याविषयीची प्रक्रिया स्पष्ट करणारी संकल्पना रूपबंध म्हणून ओळखली जाते.

४) साहित्य कलाकृतीला प्राप्त झालेला विशिष्ट घाट हा त्या कलाकृतीचा एका अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण रूपबंधच असतो. कलाकृती अंतर्गत जी एक विशिष्ट सुसंघटना प्रस्थापित केलेली असते, जी एक घडण जोपासलेली असते त्याचाही समावेश रूपबंध या संकल्पनेमध्येच होत असलेला दिसून येतो.

५) वाङ्मयीन कलाकृती साकारात असताना तिच्या अंतरंगात सामावलेल्या आशयाच्या क्षमतेवर, तिच्या कसावर जसा त्या कलाकृतीचा दर्जा अवलंबून असतो, तसाच त्या कलाकृतीच्या आशयाने अभिव्यक्त होताना कोणता रूपबंध स्वीकारलेला आहे यावरही तिचा वेगळेपणा, तिच्यातील सक्षमपणा, नावीण्यापूर्णता अवलंबून असते.

६) साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकास कलाकृतीचा प्रकार निश्चित करण्याची अनुमती असते. परंतु कलाकृती कोणता आकार घेऊन अवतरणार आहे, हे बहुतांश

वेळा त्या कलाकृतीने धारण केलेल्या रूपाबंधावर, तिच्यातील अंतर्गत घटकांवर अवलंबून असल्याचे ठामपणे म्हणता येते.

७) साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकास कलाकृतीचा प्रकार निश्चित करण्याची अनुमती असते. परंतु कलाकृती कोणता आकार घेऊन अवतरणार आहे, हे बहुतांश वेळा त्या कलाकृतीने धारण केलेल्या रूपाबंधावर, तिच्यातील अंतर्गत घटकांवर अवलंबून असल्याचे ठामपणे म्हणता येते.

८) लेखकाच्या निर्मितीप्रक्रीयेलाच जाणून घेण्याचा मार्ग म्हणून कलाकृतीच्या घाटाचा अर्थात रूपबंधाचा सूक्ष्मतर अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लेखकाची, त्याच्या लेखन प्रक्रियेची जडणघडण जाणून घेण्यासाठी त्याच्या रूपबंधाकडेच जावे लागते.

❖ संदर्भ व टीपा

१) इनामदार एस.डी., २०१५ : **रूपबंध**, प्रतिमा प्रकाशन, पुणे

२) जोशी, सुधा, २००० : **कथा : संकल्पना आणि समीक्षा**, मौज प्रकाशन, मुंबई

३) थोरात, हरिश्चंद्र, २०११ : **कथनात्म साहित्य आणि समीक्षा**, शब्द प्रकाशन, मुंबई

४) तांबे, सतीश, २००७ : **लेखाजोखा**, लोकवाङ्मय गृह, प्रकाशन, मुंबई

५) कुळकर्णी, मधु, १९८७ : **ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण**, शुभदा प्रकाशन, पुणे

६) सासणे, भारत, २००९ : **वाटा आणि मुक्काम**, मौज प्रकाशन, मुंबई

७) पाटणकर, रा. भा., १९७४ : **सौंदर्यमीमांसा** , मौज प्रकाशन, मुंबई

८) केळकर, अशोक, १९७६ : **सौंदर्यमीमांसा : तीन टिपणे** , संदर्भ, नागपूर

९) चुनेकर, सु.रा., १९६४ : **प्रा. रा. श्री. जोग गौरव ग्रंथ**, व्हीनस प्रकाशन, पुणे

प्रकरण दुसरे

नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे

....

२.१ प्रस्तावना :-

मराठी साहित्याच्या विकासात विविध कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय स्थित्यंतरांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेवर वंश, काळ आणि परिस्थितीचा फार मोठा प्रभाव असतो, हे तेनचे निरीक्षण बहुतांश अचूक ठरताना दिसते. कारण कुठलाही लेखक त्याच्या भोवतालच्या अनेक सामाजिक घटकांनी नियंत्रित अथवा प्रभावित झालेला असतो. विशिष्ट कालखंडातील समाजाची ध्येयधोरणे, रूढी-परंपरा, प्रेरणा-प्रवृत्ती कोणत्या आहेत यावरच साहित्यप्रकाराला विशिष्ट दिशा लाभताना दिसून येते.

१९९० पर्यंत आधुनिक युगाचा अस्त झाला व १९९० नंतर उत्तराधुनिक कालखंडाची सुरूवात झाली असे मानण्यात येते. १९९० नंतरच्या कालखंडात भारताने स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेने सर्वच क्षेत्रात जागतिकीकरणाचा प्रवेश झाला. व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना सिमाविरहित बनवत, एकमेकांच्या भूमीत कायदेशीररीत्या खुलेपणाने व्यापार करण्याची व्यवस्था या माध्यमातून निर्माण केली. वरवर पाहताना आपणाला ही प्रक्रिया खूप सरळ, सोपी आणि व्यापारी वाटते. परंतु तितकीच ती गुंतागुंतीची, जटील आणि सामाजिक, सांस्कृतिक परीघना छेद देणारी असलेली दिसून येते.

१९९० च्या कालखंडात मानवी समाजाला आंतर्बाह्य व्यापलेल्या जागतिकीकरणाचे परिणाम साहित्याच्या निर्मिती प्रक्रीयेवरही होवू लागले. साहित्याच्या सर्वच प्रकारांत त्याचे बरे-वाईट परिणाम जाणवू लागले. जागतिकीकरणाचे आणि

त्यामुळे बदललेल्या वास्तवाचे दूरगामी परिणाम मराठी कथेवरही मोठ्या प्रमाणात झाले. मराठी कथेच्या अभिव्यक्ती वैशिष्ट्यांमध्ये, आशयसूत्रांमध्येही मोठ्या प्रमाणात बदल झाला. प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून नव्वदोत्तर मराठी कथेच्या बदलत्या आशयसूत्रांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

२.२ नव्वदोत्तर मराठी कथा आणि कथाकार :-

१९९० नंतरचा कालखंड हा अतिशय संवेदनशील, महत्त्वाचा व काही प्रमाणात सगळीकडेच उलथापालथ करणारा असा होता. कथेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास नव्वदपूर्व कालखंडात कथेत आलेली मरगळ कथाकाराना जाणवत होती. कथा स्तब्ध आणि ग्लानीग्रस्त झाल्यामुळे लघुकथा म्हणून जो कोणता रूढ असा रूपबंध परंपरेने स्वीकारला होता, तो रूपबंध मोडून काढण्याची आवश्यकता कथाकारांना वाटायला लागली होती. त्यातूनच नव्या आशयाची, नव्या रूपाची कथा तिच्या विविध प्रवृत्तींसह १९९० नंतरच्या कालखंडात विकसित झालेली आढळून येते.

१९९० नंतरच्या कालखंडातील प्रमुख कथाकार म्हणून आपणाला प्रामुख्याने जयंत पवार, सतीश तांबे, पंकज कुरुलकर, मेघना पेठे, मलिका अमर शेख, आसाराम लोमटे, प्रशांत बागड, प्रणव सखदेव, जी.के.ऐनापुरे, मिलिंद बोकील, राजन खान, राजन गवस, भारत सासणे, नीरजा, सदानंद देशमुख, मधुकर धर्मापुरीकर, प्रिया तेंडूलकर, मनस्विनी लता-रविंद्र, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा लोखंडे, किरण गुरव, रंगनाथ पठारे, प्रतिमा जोशी, प्रवीण पाटकर, संजय भास्कर जोशी, समर खडस, अभिराम भडकमकर, निखिलेश चित्रे, बालाजी सुतार इ. कथाकारांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मानवी जीवन बदलाच्या वास्तवतेचा आर्कचित्र रेखाटणाऱ्या या कथाकारांच्या कथांनी नव्वदोत्तर मराठी कथेचे दालन समृद्ध झालेले दिसून येते.

जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या विविध प्रश्नांना आत्मविश्वासाने भिडण्याचे प्रयत्न उपरोक्त कथालेखकांच्या कथा करताना दिसून येतात. सामाजिक बदलांचा, मानवी जीवनातील स्थित्यंतरांचा अत्यंत सूक्ष्मपणे वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांनी केलेला दिसून येतो. पूर्वाश्रमीच्या कथेपेक्षा नवीन आशय, विषयाची, सूत्रांची, रूपबंधाची कथा साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. मानवी जगण्याचे भोवतालच्या शतखंडित वास्तवात झालेले रूपांतरण समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखक करत आहेत. नव्वदोत्तर कथा केवळ नावीन्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी, काळाचे भान असणारी आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

२.३ नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे :-

लेखकाचा आत्मोद्गार जेव्हा अपरिहार्य होऊन प्रकटण्यासाठी धडपडू लागतो, तेव्हा श्रेष्ठ कलाकृतीचा जन्म होताना दिसून येतो. भोवतालच्या घटकाकडून त्यासाठी त्याला प्रेरणा मिळत राहतात. आपल्या भोवताली असणाऱ्या सामाजिक पातळीवर विविध संघर्षानं तोंड देत जगत राहणाऱ्या माणसांची यासाठी त्याला प्रेरणा मिळत राहते. माणूस हसतो म्हणजे काय?, माणूस रडतो म्हणजे काय?, माणूस सुखाच्या पाठीमागे ऊर फुटेपर्यंत धावत राहतो म्हणजे काय? या आणि यांसारख्या अनेक प्रश्नांच्या अन्वयार्थशोधाच्या प्रेरणेतून कथाकारांची कथा आकारात असते. लेखकाच्या प्रेरणेविषयी लिहिताना भारत सासणे सांगतात, *भोवताली अनेक पातळ्यांवरून, अनेक पद्धतीने, अनेक प्रकारे संघर्ष करीत जगत राहणाऱ्या जीवांकडे पाहून जी काही एक वैश्विक करूणा निर्माण होत असेल त्या करुणेतून काहीएक प्रेरणा घेऊन, लेखक लिहायला लागतो व अनेकांच्या वेदना स्वीकारून आणि सहकंपित होऊन जीवनदर्शी लेखन करतो. चिंतनशील व प्रामाणिक अशा लेखकाचे हे असे भागधेय असते.*

मनोरंजन किंवा बुद्धिरंजन हा लेखनामागचा हेतू उरत नाही तर सर्वसामान्य माणसाचा शोध हा हेतू लेखनामागे शिल्लक राहतो. (भारत सासणे : २०१२ :१२) मानवी जीवन संघर्षाचा, त्याच्या सुख-दुःखाच्या कारणांचा शोध हा लेखकाच्या निर्मितीप्रक्रियेचा मध्यबिंदू असतो. त्या प्रेरणेतूनच तो सर्वात्मक मानवी जीवनाला व्यापून उरणाऱ्या संकल्पनेचा शोध घेत राहतो. १९९० नंतरच्या कालखंडातील कथालेखाकांनाही नानाविध आशयसूत्रांनी लिहिते राहण्याची प्रेरणा दिलेली आहे. त्या आशयसूत्रांचा विस्ताराने शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून केला जाणार आहे.

२.३.१ समुहविषयक सहानुभाव :-

नव्वद नंतरच्या दशकात जागतिकीकरणाच्या अपरिमित प्रभावाने सामान्य माणसाचे जगणे बंदिस्त होऊ लागले. सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्षाची तीव्रता आणखी धारदार होऊ लागली. भोवतालच्या समाजात त्याचे जगणे कठीणच नव्हे तर टोकदार होऊ लागले. जागतिकीकरणाने माणसाच्या जगण्यात अशाश्वतता मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागली. स्पर्धा तीव्र झाली. अनेकांच्या हातातील काम जाऊन ती माणसे बेकार होऊ लागली. एकेकाळी समृद्धतेचे आयुष्य जगणारी माणसे एका फटक्यात फाटके आयुष्य जगू लागली. या फाटके आयुष्य जगणाऱ्या सामाजिक व्यवस्थेतील अनेक घटकांविषयी सहानुभाव व्यक्त करण्याच्या भूमिकेतून, प्रेरणेतून नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकार लिहिते झालेले दिसून येतात.

'जयंत पवार' या अलीकडच्या काळातील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथाकाराच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहातील याच शीर्षकाच्या कथेतून जागतिकीकरणामुळे मुंबईसारख्या महानगरातील अनेक गिरण्यांच्या ठिकाणी उभे राहिलेल्या आधुनिक मॉल्समुळे गिरणी कामगारांच्या वाट्याला आलेल्या विस्थापनाची, शोषणाची गंभीर कहाणी आपणासमोर येते. *जयंत पवारांची कथा ही*

प्रामुख्याने गिरणी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी कथा आहे. संपाने देशोधडीला लागलेला गिरणीकामगार नंतर गिरणगाव उद्ध्वस्त होऊन त्या जागी टोलेजंग, चकचकीत इमारती उभ्या राहण्याच्या गतिमान प्रक्रियेत विस्थापित झाला. दत्ता सामंत यांनी पुकारलेला गिरणी कामगारांचा संप, या संप संदर्भातील राष्ट्रीय मिल मजदूर संघाची भूमिका, नेत्यांमधील अंतर्गत दुही, त्याचा फायदा घेणारे गिरणीमालक आणि गिरणगावच्या बदलत्या रूपात उपरा ठरलेला कामगार हे कामगारांच्या जगण्याशी संबंधित असणारे संदर्भविश्व जयंत पवारांच्या कथांचे केंद्रबिंदू असलेले दिसून येतात, (शीतल भोसले : २०१३ :१०१) गिरणी कामगारांच्या प्रश्नांविषयी, त्याच्या शोषणाविषयी प्रस्तुत लेखकाला येणारी चीड आणि त्यातून सामान्य माणसांविषयी त्यांच्या कथेतून व्यक्त होणारा सहानुभाव लेखक आपल्या कथेतून प्रत्ययकारकपणे आपणासमोर मांडतो.

नव्वद नंतरच्या दशकात मानवी जीवनाला अनेक संघर्षाच्या पातळीवर लढत राहावे लागताना दिसून येते. जातीविषयक, धर्मविषयक संकल्पनांच्या तीव्रतेतून वाट्यास येणारी विषमता असेल किंवा आर्थिक शोषणातून, कमीपणातून सर्वसामान्य माणसाला टोकदार अनुभवातून जावे लागत आहे. नव्वदोत्तर अनेक कथाकारांच्या कथांतून नागावलेल्या माणसाची चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. भोवताली कायम निर्माण होणाऱ्या दाहक अनुभवांतून आणि सर्वसामान्य माणसाच्या वास्तवाला छेद देण्याच्या सहनुभावातून नव्वदोत्तर कथा आकारास आलेली दिसून येते. मानवी जीवनाला सदैव वेढून राहिलेल्या दुःखमयतेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांकडून होताना दिसतो.

२.३.२ सामान्य माणसाचा शोध :-

कोणताही लेखक साहित्याच्या माध्यमातून समूहाजीवानातील सामान्य माणसाच्या जगण्याचा शोध घेण्याच्या हेतूने, प्रेरणेने लिहिण्याचा प्रयत्न करत असतो. नव्वदोत्तर कथालेखकही याला अपवाद नाही. सामान्य माणसाच्या दुःखाची, अवहेलनेची, शोषणाची, पिचलेपणाची जाण आणि त्याविषयक सहवेदना, सहानुभाव नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून व्यक्त होताना दिसतो. किंबहुना सामान्य माणसाची वेगवेगळया सामाजिक पटलावर विविध माध्यमातून होणारी अवहेलना, कुचंबणा रेखाटण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथाकार करत असलेले दिसून येतात. मानवी जीवनातील क्षणभंगूरतेविषयी, माणसाच्या अलौकिक ध्यासाविषयी आपल्या कथेच्या माध्यमातून भिडण्याचा प्रयत्न ‘मलिका अमर शेख’ यांच्या ‘एक होता उंदीर’, ‘कोहम? कोहम?’, ‘झाडपणाची गोष्ट’ आदि कथासंग्रहांच्या माध्यमातून केलेला दिसून येतो. महानगरीय माणसाचे कणाकणाने तुटत जाणे त्यांच्या कथेतून तीव्रतेने अनुभवयास येते.

नव्वद नंतरच्या दशकात केवळ माणसाचे जीवनमानच बदलले नाही, तर त्याच्या भोवतालचे सगळे सामाजिक संदर्भच बदलून गेले. पूर्वीच्या काळी दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारी माणसे, दुसऱ्याच्या नुकसानीने हळहळणारी माणसे जागतिकीकरणाने हिरावून घेतली. दुसऱ्याचे नुकसान म्हणजे आपला फायदा असा विचार करणाऱ्या माणसांनी इथली सगळी सामाजिक व्यवस्थाच काठोकाठ भरून गेली. मग आपोआपच ज्याच्याकडे सामर्थ्य तो दुसऱ्यावर अन्याय करू लागला. असत्याने सत्यावर जागोजाग विजय मिळवला. सामान्य माणसाचा कोणी वालीच राहिला नाही. नव्वदोत्तर कथाकारांनी या सामान्य माणसालाच त्यांच्या कथानकाचा निवेदक केला, ‘Protagonist’ केला आणि त्याच्या नजरेतून सामान्य माणसाच्या जगण्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ‘समर खडस’ यांचा ‘बकऱ्याची बॉडी’ नावाचा कथासंग्रह

अशाच सामान्य माणसांची व्यवस्थेविरुद्ध धर्म, हक्क यांविषयी सुरु असणारा संघर्ष अत्यंत टोकदारपणे चित्रित करते. सामान्य माणूस आणि त्याच्या जीवनाची व्यवस्थेकडून होणारी शोकांतिका नव्वद नंतरच्या कालखंडातील कथाकारांच्या कथेतील आशयसूत्रांमधील एक महत्त्वाचा घटक असलेला दिसून येतो.

२.३.३ चिरंतन मूल्यांबाबतची आस्था :-

मानवाच्या कल्याणाबाबत आस्था दाखवणाऱ्या काही मूल्यांची समाज नेहमीच अपेक्षा करत असतो. किंबहुना त्यांना जोपासण्याचा प्रयत्न करत असतो. लेखक या मूल्यांच्या माध्यमातून समाजात एक आदर्श रामराज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतो. साहित्याचा व्यवहाराच मुळात दया, क्षमा, सहानुभूती, प्रेम, निष्ठा, स्वातंत्र्य, समता, त्याग, सेवा, मानवता अशा चिरंतन मूल्यांशी संबंधित असतो. श्रेष्ठ साहित्य नेहमीच या मूल्यांच्या शोधात आणि जतन करून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.

मानवी मूल्यांचा क्रमशः होत गेलेला ऱ्हास ही नव्वद नंतरच्या दशकात जागतिकीकरणाने मानवी समाजाला दिलेली विदारक भेट आहे. मानवी मूल्ये टिकून राहावीत आणि त्यातूनच सामाजिक संकेत सांभाळत मानवी जीवनाचा प्रवास अधिकाधिक सुखदायी व्हावा ही पुरातन आणि समकालीन साहित्यातूनही मोठ्या प्रमाणात अपेक्षा बाळगली गेलेली होती आणि आहे.

मानवी मूल्यांची साहित्याच्या माध्यमातून जोपासना करण्याच्या प्रेरणेतूनच नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकार लिहित असलेले दिसून येतात. मानवी मूल्यांवरच कुठल्याही समाजाची नैतिक इमारत उभी राहत असल्याने या मूल्यांना चांगले साहित्य नेहमीच केंद्रस्थानी ठेऊन निर्मिती प्रक्रिया अनुसरत असल्याचे दिसून येते.

नव्वद नंतरच्या दशकात मानवी जीवनातून ही मूल्यव्यवस्थाच हद्दपार होऊन गेल्याचे दिसून येते. अनेक मानवी मूल्ये स्वार्थासाठी पायदळी तुडविले जाताना दिसतात. त्यातूनच या मानवी मूल्यांना पुन्हा नव्याने मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याच्या भूमिकेतून नव्वदोत्तर अनेक कथाकार प्रयत्नशील असलेले दिसून येतात. उदात्त मानवी जीवन हे उदात्त मानवी मूल्यांच्या आधारावरच उभारले जाऊ शकते हे सांगण्याचा प्रयत्न रंगनाथ पठारे, राजन खान, भारत सासणे आदि लेखकांच्या कथांतून होताना दिसते. मानवी मूल्ये हीच समान नागरिकत्व, एकरूप समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची संकल्पना आहे हे या आणि इतर अनेक नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून आपणास अनुभवयास मिळते. माणूस आणि त्याला जगण्यासाठी पूरक असणारी मानवी मूल्ये नव्वदोत्तर कथाकारांच्या कथांतील आशयसूत्रे असलेली दिसून येतात.

२.३.४ मानवी जीवनातील व्यामिश्रतेचा शोध :-

जागतिकीकरणाने मानवी जीवन संकल्पना व्यामिश्र आणि गुंतागुंतीची बनून गेल्याचे दिसून येते. नव्वदोत्तर कथाकारांनी आपल्या कथांच्या माध्यमातून मानवी जीवनातील व्यामिश्रतेचा शोध अत्यंत अंत:स्तरावर जाऊन घेतल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाने वेगवान झालेले आयुष्य, पैशाला आलेले अमाप महत्त्व, नात्यांमधील स्वार्थीपणात सातत्याने होणारी वाढ, सतत पाठीवर घेऊन फिरावे लागणारे अपेक्षांचे ओझे, त्यातून वाट्याला येणारी पराभूतता या आणि अशा अनेक कारणांनी नव्वदोत्तर कालखंडातील माणसाचे जगणे गुंतागुंतीचे होऊन गेले आहे. 'गणेश मतकरी' यांच्या 'खिडक्या अर्ध्या उघड्या' आणि 'इंस्टॉलेशन्स' या कथासंग्रहातील नायक, नायिका अशाच अनुभवांच्या, अपेक्षांच्या, अपयशीपणाच्या खोल गर्तेत रूतत गेल्यासारखे वाटत राहतात. आपला भविष्यकाळ सिक्युअर आणि वेल सेटल्ड करण्याच्या मोहात

वर्तमान आणि भूतकाळाच्या सगळ्या बंधनांना क्रूरपणे नष्ट करत जातात. संभ्रमाच्या, अस्थिरतेच्या, असहाय्यतेच्या अनेक खुणांनी नव्वदोत्तर माणसांचे जगणे कसे सैरभैर झालेले आहे याचे अस्वस्थ करणारे चित्रण 'गणेश मतकरी' आणि त्यांच्या समकालीन नव्वदोत्तर कथाकारांच्या कथांतून आपणास तीव्रतेने अनुभवयास येते.

२.३.५ मानवतेची वैश्विक संकल्पना प्रस्थापित करणे:-

माणसाला किमान माणसाप्रमाणे वागणूक मिळावी, जगातील कुठल्याही कोपऱ्यातील माणसाचे माणूसपण हिरावून घेतले जाऊ नये या भूमिकेतून वा प्रेरणेतून कुठल्याही कालखंडातील लेखक लिहीत असलेला दिसून येतो. नव्वदोत्तर काळात मानवतेचा सातत्याने सामाजिक परंपरेत होणारा ऱ्हास थांबविण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडातील लेखकांनी केलेला दिसून येतो. मानवतेच्या वैश्विक संकल्पनेचा पुरस्कार आणि प्रत्यक्ष जीवनातील त्याच्या उपयुक्ततेसंबंधी नव्वदोत्तर कथालेखक सजग असलेले दिसून येतात. 'राजन गवस' सारखा कथालेखक त्याच भूमिकेतून आपल्या 'आपण माणसात जमा नाही' आणि 'रीवणावायली मुंगी' या कथासंग्रहांच्या माध्यमातून सभोवतालच्या सामाजिक वास्तवाला भिडण्याचा आणि मानवतेच्या संकल्पनेला उदात्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. समाजातील मानवी नात्यांच्या गुंतवळीतून सुटून जाणारा मानवतेचा धागा घट्ट विणण्याच्या प्रेरणेतून नव्वदोत्तर कालखंडातील जवळजवळ सर्वच लेखक प्रयत्नशील असलेले दिसून येतात.

२.३.६ दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाची निर्मिती:-

मानवी जीवनातील दुःखाच्या परीहारासाठी लेखक सतत आपल्या लेखनातून प्रयत्नशील असतो. मानवी जीवन सुंदर, मंगल आणि सुखदायी व्हावे ही प्रेरणा सतत त्याच्या लेखनाच्या मुळाशी असते. मानवी जीवनाच्या शुभंकरतेचा कथालेखक नेहमीच ध्यास घेत असतो. नव्वदोत्तर कालखंडात जागतिकीकरणाने मानवी जीवनात

कमालीची निराशा, दुःखाने जी काजळी भरून राहिलेली आहे ती दूर करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकार करत असलेले दिसून येतात.

मनावी जीवनात धर्म, अर्थ आणि ईश्वरावरून वाढत जाणारी दरी आणि त्यातून संपूर्ण जगाच्या वाट्याला आलेली युद्धे, दहशतवाद, बॉम्बस्फोट ही नव्वद नंतरच्या कालखंडातील भयाने बंदिस्त झालेल्या समाजाच्या निर्मिती मागची कारणे आहेत. टोकाच्या धर्मांधतेवरून मानसा-माणसातील वाढत चाललेली दरी, भयाने व्यापलेला समाज, असहिष्णू वृत्तीचा होणारा पुरस्कार हा नव्वदोत्तर काळातील लेखकांना सतत विचारमग्न करायला लावणारा प्रश्न आहे. या प्रश्नाला आपल्या कथांच्या माध्यमातून सामोरे जाण्याचा प्रयत्न ‘शिल्प’ या कथासंग्रहाच्या माध्यमातून ‘मोनिका गजेंद्रगडकर’ यांनी केला आहे. *मोनिका गजेंद्रगडकरांच्या कथेचे एक वैशिष्ट्य म्हणजे वाचकाला अस्वस्थ करण्याचे प्रचंड सामर्थ्य हे होय. जात, धर्म, संस्कृती, नातेसंबंध,व्यवस्था, जगणे, रूढी, परंपरा या आणि अशा अनेक घाटकांविषयीच्या अनुत्तरीत प्रश्नांचे मोहोळ या कथांमधून वाचकांच्या मन आणि मेंदूत शिरते. ही अस्वस्थता वाचकाला माणूस म्हणून, वाचक म्हणून, रसिक आस्वादक म्हणून, अभ्यासक म्हणून समृद्ध करते.* (अजय देशपांडे : २०१७ : ११०) परिस्थितीला कणखरपणे सामोरे जाणाऱ्या आत्मविश्वासक स्त्रियांनी त्यांच्या कथा समृद्ध झालेल्या दिसून येतात.‘भारत सासणे’ यांच्या ‘ऐसा दुस्तर हा संसार’ कथासंग्रहातूनही दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न होताना दिसतो. *भारत सासणे यांच्या कथांतील पात्रांकडे पहिले तर असे दिसून येते की, विविध संस्कृतींतील,घटकांतील, परंपरांतील पात्रे इथे वावरतात. भिकारी, आंधळी,लहान मुले, कुरूप तरुण, विचित्र आडनावांची माणसे, कुरुपतेमुळे लग्न होऊ न शकलेले आणि वय वाढत चाललेले तरुण, महारोगी, गुंड, रस्त्यावर वसती करून राहणारे लोक, लग्न होऊ न शकलेल्या स्त्रिया, मूल होऊ न शकलेल्या स्त्रिया, आजारी स्त्री, मरणाची वाट बघणारे म्हातारे, मुले परदेशी असल्याने एकाकी झालेले वृद्ध दांपत्य,*

दुष्काळामुळे देशोधडीला लागलेला मजूर, स्थलांतर, भूक, भविष्याच्या ओढीने पळणारी कर्मदरिद्री माणसे अशी कितीतरी पात्रे सासणे यांच्या कथांमधून येतात. (प्रदीप कर्णिक, चंद्रकांत भोंजाळ : २००९ : एकोणवीस) माणसाच्या जगण्यातील अपार संवेदनांना लगडून आलेल्या दुःखाला टोकदारपणे आविष्कृत करण्याचे काम भारत सासणेंची कथा करते. माणसांच्या दुःखांचे विविधांगी दर्शन त्यांच्या कथांतून अनुभवयास येते.

२.४ निष्कर्ष

एकूणच नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे जाणून घेतल्यानंतर काही निष्कर्ष सूत्ररूपाने आपणाला पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे केवळ नावीन्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी, काळाचे भान असणारी आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

२) नव्वदोत्तर अनेक कथाकारांच्या कथांतून नागावलेल्या माणसांची चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. भोवताली कायम निर्माण होणाऱ्या दाहक अनुभवांतून आणि सर्वसामान्य माणसाच्या वास्तवाला छेद देण्याच्या सहनुभावातून नव्वदोत्तर कथा आकारास आलेली दिसून येते. मानवी जीवनाला सदैव वेढून राहिलेल्या दुःखमयतेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांकडून होताना दिसतो.

३) सामान्य माणूस आणि त्याच्या जीवनाची व्यवस्थेकडून होणारी शोकांतिका नव्वद नंतरच्या कालखंडातील कथाकारांच्या कथेतील आशयसूत्रांमधील एक महत्त्वाचा घटक असलेला दिसून येतो.

४) मानवी मूल्ये हीच समान नागरिकत्व, एकरूप समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची संकल्पना आहे हे या आणि इतर अनेक नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून आपणास अनुभवयास मिळते. माणूस आणि त्याला जगण्यासाठी पूरक असणारी मानवी मूल्ये नव्वदोत्तर कथाकारांच्या कथांतील आशयसूत्रे असलेली दिसून येतात.

❖ संदर्भ व टीपा

१) सासणे, भारत, २०१२ : **नव्वदोत्तर मराठी कथा,** खेळ, पुणे

२) भोसले, शीतल, २०१३ : **नव्वदनंतरची कथा ,** ललित-कथा विशेषांक, मुंबई

३) देशपांडे,अजय, २०१७ : **आजची मराठी कथा : काही नोंदी, काही निरीक्षणे,** सर्वधारा- नव्वदोत्तर मराठी कथा विशेषांक , अमरावती

४) कर्णिक,प्रदीप व भोंजाळ, चंद्रकांत, २०१२ **: निवडक भारत सासणे** – **तप्तप्रवाह,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

प्रकरण तिसरे

नव्वदोत्तर मराठी कथेची निवेदनशैली

....

३.१ प्रस्तावना :-

नव्वदोत्तर कालखंडात देशाच्या आणि महाराष्ट्राच्या एकूण वास्तवात महत्त्वाचे बदल होऊ लागले. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे नवमध्यमवर्गाचा झालेला उदय, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढलेले प्राबल्य, मानवी जीवनाचे, व्यापाराचे बदलते अर्थशास्त्र समजून घेऊन त्यात स्वस्थान निर्माण करण्यासाठी आणि ते टिकवून ठेवण्यासाठी अस्तित्वात असलेल्या जीवघेण्या स्पर्धा, या स्पर्धेत कराव्या लागणाऱ्या तडजोडी, आत्यंतिक व्यक्तीवादातून आलेली आत्ममग्नता, अर्थकेंद्री जीवनव्यवहार, चंगळवादी जीवनशैलीचे स्तोम, हे सामाजिक संदर्भ हा काळ समजून घेताना विचारात घ्यावे लागतात.

विशिष्ट आर्थिक धोरण स्वीकारल्यामुळे एका बाजूने ग्लोबल होऊ पाहणारा माणूस दुसऱ्या बाजूने विविध अस्मितांच्या चिरेबंद चौकटीत बंदिस्त होऊ लागण्याची प्रक्रियाही याच काळात गतिमान झालेली दिसते. धर्म, जात या संवेदनशील घटितांकडे राजकीय हितसंबंधांच्या प्रेरणेतून पाहिल्यामुळे समाजात सर्वस्तरीय असुरक्षितता निर्माण करणारा हा काळ आहे.

माणसाच्या गाभ्याशी नाळ जोडून असणारी आणि बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक बदलांबरोबर आंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी अशा दोन्ही प्रवृत्तींमध्ये नव्वदोत्तर कथा आंदोलित होताना दिसते. माणसाच्या सामाजिक संकेतच्या परिघाला कवेत घेतानाच निर्मितीचे विभिन्न मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न

नव्वदोत्तर कथेने केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून आपण ‘नव्वदोत्तर मराठी कथेची निवेदनशैली’ जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

३.२ व्यक्तीजीवनाकडून समूहजीवनाकडे प्रवास करणारी कथा :-

नवकथेच्या कालखंडातील आणि नव्वदोत्तर कालखंडपूर्व कथा म्हणजेच आधुनिक कालखंडातील कथेचा प्रवास समूहजीवनाकडून व्यक्तिजीवनाकडे झालेला दिसून येतो. गंगाधर गाडगीळांच्या मनोविश्लेषणात्मक कथा या त्याच्या उत्तम नमुना होत्या. सुधा जोशी गाडगीळांच्या कथेचा प्रकृतीधर्म वर्णिताना लिहितात, *युद्धोत्तर जगातील वेगाने बदलत जाणाऱ्या वास्तवाचे व्यापक भान तसेच मानवी मनाच्या व जीवनाच्या व्यामिश्र स्वरूपाची, त्यातील अंतर्विरोधाची, असंगतीची भेदक प्रतीती हे गाडगीळांच्या कथेचे अंतःस्रोत आहेत.* (सुधा जोशी : २००० : ३२) मानवी मनाच्या विविध विभ्रमाचे आविष्करण आपणास गाडगीळ आणि त्यांच्या समकालीन कथाकारांमध्ये पहावयास मिळते. मानवी मनाच्या खोल-खोल तळाचे दर्शन त्यांच्या कथांत आपणाला घडताना दिसून येते. मनोविश्लेषणात्मकता हा त्यांच्या कथेचा स्वभावधर्म आहे. तत्कालीन कथा समूहजीवनाकडून व्यक्तीजीवनाच्या अंतरंगात प्रवेशताना दिसते.

नव्वदोत्तर कालखंडातील कथा पुन्हा एकदा व्यक्तीजीवनाकडून समूहजीवनाकडे प्रवास करताना दिसते. प्रस्तुत कालखंडातील कथेत समूहजीवनाच्या वेदनेचे हुंकार उमटत असलेले दिसून येतात. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणाऱ्या, अनुकंपा निर्माण होणाऱ्या माणसांची या भयंकर स्वार्थी जगात अजूनही उपलब्धता आहे हे सांगण्याचा प्रयत्न ‘सतीश तांबे’ यांच्या

‘मॉलमध्ये मंगोल’, ‘राज्य राणीचं होतं’, ‘रसातळाला ख.प.च.’ यांसारख्या कथासंग्रहांच्या माध्यमातून होताना दिसतो.

३.३ मानवी मूल्यांपासून दुरावलेल्या माणसाचे चित्रण :-

नव्वदोत्तर कालखंडातील ग्रामीण कथेद्वारे ग्रामीण संस्कृतीचा, कृषी, कृषक परंपरेचा ऱ्हास, मानवी मूल्यांचे पायदळी तुडविले जाणे यांसारख्या घटकांना आविष्कृत करण्याचा प्रभावी प्रयत्न ‘आसाराम लोमटे’ यांच्या ‘इडा-पीडा टळो’, ‘आलोक’ आणि ‘किरण गुरव’ यांच्या ‘श्रीलिपी’,‘राखीव सावल्यांचा खेळ’ यांसारख्या कथासंग्रहाच्या माध्यमातून झालेला दिसून येतो.

नव्वदोत्तर कालखंडातही गावातील न संपणारी जातीयता, राजकारणाच्या माध्यमातून सामान्य माणसाचे होणारे शोषण, नव्याच्या आकर्षणातून शाश्वत मूल्यांपासून दुरावलेला सामान्य माणूस, कर्जबाजारीपणाने खचलेला शेतकरी या आणि अशा अनेक घटकांना जागतिकीकरणाच्या कोनातून चित्रित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. नव्वदोत्तर कालखंडातील बदलते ग्रामवास्तव, त्यातील सामान्य माणसाची होणारी असहाय्य फरफट या कथालेखकांच्या कथांच्या निवेदनशैलीच्या जोरावर अधिकाधिक प्रगल्भतेने अभिव्यक्त होताना दिसतो.

३.४ सजग, सावध व समकालीन घटनांची नोंद घेणारी कथा :-

मराठी कथेच्या माध्यमातून भोवताली घडणाऱ्या समकालीन घटनांची नोंद घेतली जायला हवी. नव्वदपूर्वीची कथा याला अपवाद होती. कोणे एके काळी भोवताली घडणाऱ्या घटनांची नोंद मराठी कथेच्या माध्यमातून घेतली जात नाही असे म्हटले जायचे आणि ते काही प्रमाणात खरे आणि दुर्दैवीही होते.

महात्मा गांधीजींची हत्या किंवा आणीबाणी यांसारख्या तत्कालीन राजकीय आणि सामाजिक पटलावर दीर्घकालीन परिणाम घडवून आणणाऱ्या घटनांची नोंद मराठी कथेने कुठेही घेतल्याचे दिसत नाही.

नव्वद नंतरच्या दशकात मात्र समकालीन घटनांविषयीची अनभिज्ञता अपवादानेच आढळून येते. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाला हादरवून टाकणारा दहशतवाद, जातीय ताणतणाव, दंगली, बॉम्बस्फोट यांचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर, राजन खान, भारत सासणे आदी कथालेखकांच्या कथेतून सूक्ष्मपणे आविष्कृत झालेले दिसते.

पंकज कुरुलकर, योगिनी वेंगुर्लेकर यांसारख्या कथाकारांच्या कथांतून कार्पोरेट जगातील कुरघोड्या, मालक-नोकर संघर्ष, विपणनातील आक्रमकता आदी घटकांचे तपशीलवार विवेचन येताना दिसते. *पंकज कुरुलकरांची कथा श्रेष्ठ, अभिजात साहित्यकृती असते का नाही, हा मुद्दा बाजूला ठेवला तरी त्यांच्या कथांत पर्यावरणाचे आणि समकालाचे अस्सल चित्रीकरण असते हे आवर्जून नमूद करायला हवे.* (संजय जोशी : २०१५ : १०८) कथाकाराला समकालाचे अस्सल भान हवे आणि त्याच्या आधारानेच त्याच्या कथेचे बांधकाम व्हयला हवे. पंकज कुरुलकरांच्या अनेक कथांतून समकाळाचे अनेक संदर्भ कथेच्या आवश्यकतेनुसार येताना दिसतात.

‘अफवा खरी ठरावी म्हणून’ या ‘प्रज्ञा लोखंडे’ यांच्या कथासंग्रहाच्या माध्यमातून समकालीन स्त्री आणि तिच्या भोवतालचे जग प्रामाणिकपणे चित्रित करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. औद्योगिक क्षेत्र आणि तिच्यातील ताणे-बाणे आजच्या काळाच्या पार्श्वभूमीवर ‘सुबोध जावडेकर’ यांच्या कथांच्या माध्यमातून नेमकेपणाने समोर येतात. त्यांची ‘कुरुक्षेत्र’ ही कथा या अनुषंगाने

महत्त्वाची ठरते. भोवतालच्या बदलत्या सामाजिक संकेतांना आपल्या कथांच्या माध्यमातून आविष्कृत करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकारांकडून होताना दिसतो. 'मनस्विनी लता रवींद्र' यांच्या 'ब्लॉगच्या आरश्यापल्याड' या कथासंग्रहाच्या माध्यमातून तरुण पिढीसमोर जागतिकीकरणाने उभे केलेल्या प्रश्नासंबंधी अत्यंत खोलवरची चिकित्सा येताना दिसून येते. *जागतिकीकरणोत्तर एकविसाव्या शतकाच्या आरंभाबरोबर तारुण्यात आलेली पिढी ही अनिश्चिततेच्या निसरड्या दोरीवरून चालण्याची कसरत करत किंवा त्याच दोरीला लोंबकळत, हिंदकळत त्यातलं थ्रील अनुभवणारी किंवा एकटेपणाच्या जाणिवेने विकल होणारी. ही या पिढीची भावनिक संमिश्रता मनस्विनीने आपल्या कथांतून नेमकी पकडली. ती मांडताना तिने निवडलेले शब्द आणि अनुभवांची बेधडक मांडणी यामुळे तिच्या कथा अस्सल वाटत राहिल्या. पण या पलीकडचं तिच्या लेखनाचं वैशिष्ट्य सांगायचं तर तिने स्त्री-पुरुष नात्यातल्या लैंगिकतेच्या आणि एकूणच लिंगभावाच्या राजकारणाचं दाखवलेलं भान, जे एकूणच मराठी साहित्यात फार कमी वेळा दिसत राहिलं आहे. तिच्या पिढीत अभावानेच दिसलेली सामाजिक ताण्याबाण्यांची आणि जातीय राजकारणाची जाणही तिच्या ठायी आहे.* (मुकुंद कुळे : २०१६ : ०९) स्त्री-पुरुष संबंधांतील पुरोगामी विचार, आपल्याच माणसांपासून तुटलेपणाची जाणीव, नोकरीतील अस्थैर्यातून पदरी आलेली निराशता या आणि विविध समकालीन प्रश्नांना मनस्विनीची कथा नेमकेपणाने भिडताना दिसते. समकालीन जीवनाच्या अनेक संदर्भाच्या मुळांना ही कथा स्पर्श करताना आढळते.

३.५ भोवतालच्या वास्तवाचे भान व्यक्त करणारी कथा :-

नव्वदोत्तरी कथा भोवतालच्या समकालीन घटकांचे, वास्तवाचे सजग भान व्यक्त करणारी आहे. भोवतालच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक संकेतांना कधी कवेत घेत तर कधी त्याला भिडण्याचा प्रयत्न करतानाच निवेदनाचे, प्रतिमांचे, भाषाशैलीचे, घाटाचे अर्थात रूपबंधाचे विभिन्न प्रयोग ती करत जाते.

उत्तराधुनिक कालखंडात जीवनपद्धतीमध्ये झालेले विविध बदल, व्यामिश्र जीवनपद्धतीचा बहुतांनी केलेला अंगीकार त्यामुळे कथेच्या रूपबंधाला, तिच्या आशयाच्या विस्तारालाही व्यामिश्रता वा व्यापकता लाभलेली दिसून येते. कथेचे तंत्र लघुकथा-कथा ते दीर्घकथा असे विस्तारत गेलेले दिसून येते. बहुतांश नव्वदोत्तरी कथेने दीर्घकथेचा रूपबंध स्वीकारलेला दिसून येतो. जयंत पवारांच्या जवळजवळ सर्वच कथा या दीर्घकथा प्रकारात समाविष्ट होणाऱ्या आहेत. कथाशयाच्या मागणीला अनुसरणारी व तिच्यातील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांना जवळची वाटणारी रूपबंधात्मकता लेखक स्वीकारत असतो. जयंत पवारांच्या कथेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास *रूपबंधाच्या नव्या शक्यता शोधताना स्वप्न, वास्तव, अद्भुताच्या पायावर कथा उभी करताना जयंत पवार महानगरीय संवेदनेबरोबर भारतीय संवेदना पकडण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. १९८० नंतर मराठी कथेला ओहोटी लागलेली असताना आणि महानगरीय कथा तर जवळपास हद्दपार झाली असताना जयंत पवारांच्या कथेने एक आश्वासक पाऊल टाकले आहे. जागतिकीकरण, महानगरीय संवेदना, भाषिक संवेदन आणि या सगळ्यांमधून पिचत चाललेला व पिछाडीवर पडत चाललेला सामान्य माणूस कथेच्या*

केंद्रस्थानी ठेऊन त्याच्या शोषणाच्या सगळ्या शक्यता तपासून पाहणारी ही कथा मराठी कथावाङ्मयात महत्त्वाची ठरणार आहे. (महेंद्र कदम : २०१३ : ५५) नव्या रूपबंधाच्या सहाय्याने मानवी जीवनाच्या सनातन दुःखाला पुन्हा नव्या रूपात, आशयसुत्रात गुंफतानाच मानवाच्या वैश्विक कल्याणाची, सर्वात्मिक संतोषाची याचनाच जयंत पवार वेगळया वाटेने जाऊन करतात. त्यांची कथा, तिचा नाटकाशी साधर्म्य राखून असणारा प्रवाही रूपबंध मराठी कथेला सर्वार्थाने समृद्ध करताना दिसतो.

३.६ बदलत्या जीवनशैलीला आविष्कृत करणारी कथा :-

जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेने जीवन, भाषा, संस्कृती, अभिरुची आदी सारे काही मुळातून बदलले आणि त्याचा एक परिणाम म्हणजे कथेचा भाषिक अवकाश, आशयद्रव्य, रचना हे सारे बदलले. जयंत पवार यांच्या कथालेखनाच्या अनेक सामर्थ्यापैकी एक म्हणजे त्यांची सिनेमॅटिक शैली होय. ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ या त्यांच्या कथासंग्रहातील काही कथा सिनेमॅटिक शैलीने लिहिल्या गेलेल्या आहेत. *जयंत पवार यांच्या कथेचे सामर्थ्य असे की प्राचीन कहाण्यांचा भाषिक रूपबंध आणि आजचे व्यामिश्र जीवन यांचे अनोखे मिश्रण त्यांनी केले आहे. आशयद्रव्य आणि रचना या दोन्ही पातळ्यांवर हे फ्युजन आजच्या मराठी कथेला उपकारक ठरणार आहे. नाटकातील निवेदन तंत्राचा कथेत अतिशय प्रयोगशील असा उपयोग जयंत पवार यांनी केलेला दिसतो. सिनेमा आणि नाटकाच्या माध्यमाची सूक्ष्म जाण या कथाकाराजवळ आहे.* (अजय देशपांडे : २०१७ : १०२) जयंत पवार कथेच्या माध्यमातून मानवी जगण्यातील विसंगतीचा, शोषणाचा, मूलभूत प्रश्नांचा, त्यातील गुंतागुंतीचा अत्यंत मूलगामी शोध घेताना दिसून येतात.

जी.के.ऐनापुरे यांचे ‘खंगोल’, ‘कांदाचिर’ आणि ‘झिंझुरडा’ आदी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. ऐनापुरे यांची कथा महानगराला चिकटून असणाऱ्या गावातील, वस्त्यातील दरिद्री माणसाचे जगणे त्यातील साऱ्या ताण्याबाण्यांसह चित्रित करते. ‘राप’ या शीर्षकाच्या एका कथेत दारिद्र्याचे अंगावर काटा आणणारे चित्रण आहे. प्रचंड मेहनत करून मासा पकडून आणल्यावरही तो खाता येत नाही, कारण घरात मीठ, चटणी काहीही नाही. शेवटी मासा कुत्र्याला टाकावा लागतो. महानगरातल्या खानपानाच्या बेसुमार चंगळवादाच्या पार्श्वभूमीवर हे चित्रण अस्वस्थ करणारे, अंतर्मुख करणारे, वास्तवाची गंभीर जाणीव करून देणारे आहे.

जी.के.ऐनापुरे यांची कथा पांढरपेशा समाजाला न दिसलेले वास्तव आपणासमोर आणते. आर्थिक आणि जातीच्या प्रश्नांच्या मुळाशी जावून त्याची चिकित्सा करण्याचे काम ऐनापुरेंची कथा करताना दिसते. *जी.के.ऐनापुरे यांच्या कथेचे एक वैशिष्ट्य येथे नमूद करणे अपरिहार्य आहे. एखाद्या नाटकाला किंवा सिनेमाला ठरावीक असे पार्श्वसंगीत असते. हे पार्श्वसंगीत आपल्याला गुंतवून ठेवते. आपल्या मनात विचारांची वेगवेगळी वलये निर्माण करते. जी.के.ऐनापुरे यांनी हे सूत्र त्यांच्या कथेमध्ये सुरेखपणे उपयोजिले आहे.* (अजय देशपांडे : २०१७ : १०६) मानवी जगण्यातील विसंगती रेखाटण्याचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य जी.के.ऐनापुरे यांची कथा करताना दिसते. माणूस आणि त्याचा सुखासाठी सतत सुरु असणारा संघर्ष आणि त्याची त्यासाठीची कोणत्याही स्तरावर जाण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती यांचा अस्वस्थ प्रवास ऐनापुरेंच्या कथेतून आश्वासकपणे आपल्या समोर येताना दिसतो.

३.७ स्त्रीविषयक जाणिवांना बेधडकपणे व्यक्त करणारी कथा :-

नव्वदोत्तरी कालखंडातील स्त्री जाणिवांविषयक महत्त्वाचे प्रश्न आपल्या कथांच्या माध्यमातून समोर आणणाऱ्या कथाकार म्हणून 'नीरजा' यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. नीरजा या अलीकडच्या काळातील एक महत्त्वाच्या कथाकार आहेत. त्यांचे 'दर्पणी जे बिम्बिले', ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' आदी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. स्त्रीत्वाचे अव्यक्त दुःख नीरजा यांच्या कथेत येते.

अनाग्रह आणि अनिर्णायक कथालेखनाची शैली हे नीरजा यांच्या कथेचे एक प्रमुख वैशिष्ट्य असलेले दिसून येते. कथालेखनाच्या या विभिन्न शैलीमुळे नीरजा यांची कथा वाचकांना विचारात टाकताना दिसते. कधी कधी ती वाचकांच्या विचारशक्तीला आव्हानही देण्याचा प्रयत्न करताना दिसते. समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष संबंधांचे विविध अंतःस्तर तपासण्याचा यशस्वी प्रयत्न नीरजा यांची कथा करताना दिसते.

मानसिक आणि शारीरिक पातळ्यांवर स्त्रियांचा अनाहतपणे सुरु असणारा जीवन प्रवास नीरजा यांनी आपल्या कथांतून अगदी तंतोतंतपणे रेखाटलेला आहे. 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' या संग्रहातल्या कथांमध्ये नीरजा यांनी निवेदन आणि संवाद यांच्या मांडणीत-धाटणीत अनोखे प्रयोग करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. या संग्रहातील 'सुशांतचा सोळावा वाढदिवस' ही कथा समकालीन वास्तवाचा वेगळा पापुद्रा उलगडून दाखवणारी कथा आहे.

आजच्या मुक्त वातावरणात आई, वडील, मुलगा, मुलगी या साऱ्यांचे संबंध अगदी मित्र-मैत्रीणीसारखे असावेत. इंटरनेट, मॉल, पॉपरॉक,पब,

मल्टीप्लेक्सच्या काळात मॉडर्न विचारांनी खुलेपणाने जगण्याचा प्रयत्न करताना मागच्या पिढीच्या हातूनही कशा अक्षम्य चुका होत राहतात त्याचे दर्शन या कथेत घडते. आपल्या सोळा वर्षाच्या मुलासोबत आपण मैत्रिणीसारखे वागावे या प्रयत्नात आई मुलाला सोळाव्या वाढदिवशी कंडोम सप्रेम भेट देते. पण नंतर हा मुलगा त्याचे काय करणार? या प्रश्नाच्या वेगवेगळ्या उत्तरांचा विचार करीत कमालीची अस्वस्थ होते. आईला आईच्याच नात्याच्या चौकटीत पाहणाऱ्या मुलाला तिचे मैत्रिणीचे रूप मुळीच पटत नाही. त्याला 'आई' हवी आहे. परंपरेने आई जशी असते तशीच त्याला हवी आहे. म्हणून वाढदिवसाच्या घटनेपासून तो मुलगा आईपासून मनाने तुटतो, दूरदूर होतो.

नीरजा यांची ही आणि इतर कथाही वाचकाला अस्वस्थ करतात. एकतर हा विषय फार नाजूक असून लेखिकेने तो अत्यंत धीटपणे मांडला आहे. बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवात मॉडर्न विचार स्वीकारत जुन्या पिढ्यांना त्यांचे पाऊल चुकविता येणार नाही. आई, मुलगा, बाप, मुलगी या नात्यातील पारंपरिक पदर झटकन फाडून टाकता येणार नाही. उलट या संक्रमण काळात अत्यंत समंजसपणे नात्यांची वीण जोपासावी लागेल, नवे सारे अंधानुकरण करीत स्वीकारता येणारच नाही आणि अगदी डोळे लाऊन परंपरेतले सारे काही जाळून टाकताही येणार नाही. विवेकाची मोठी गरज या काळात आहे. नीरजाची ही कथा वाचकाला समकाळाबाबत अनेक अंगांनी विचार करावयास प्रवृत्त करते. म्हणूनच नीरजा यांची कथा आजच्या मराठी कथेच्या प्रवाहात आशयद्रव्याच्या दृष्टीने महत्त्वाची कथा आहे. कथेचे रचनातंत्र बरेचदा प्रयोगशील असल्याचे दिसते. वाचकाला अस्वस्थ करत विचार प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य नीरजा यांच्या कथेत निश्चितपणे आहे असे म्हणता येते.

३.८ समकालीन सामाजिक वास्तवाला बंदिस्त करणारी कथा :-

नव्वदोत्तर मराठी कथा समकालीन सामाजिक वास्तवाला नेमकेपणाने बंदिस्त करताना दिसते. समकालीन मानवी जीवनात जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्नांना कवेत घेतानाच त्या प्रश्नांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी मराठी कथा करत असलेली दिसून येते. ‘मनस्विनी लता रवींद्र’ या लेखिकेच्या ‘ब्लॉगच्या आराश्यापल्याड’ नावाच्या कथासंग्रहातून जागतिकीकरणाने मानवी नातेसंबंधात घडवून आणलेल्या स्थित्यंतरांविषयी अचूक भाष्य करण्यात आलेले आहे. त्यांच्या कथा समकाळाचे भान जोपासत अभिव्यक्त होताना दिसतात. कदाचित त्यामुळेच त्यांची कथा इतरांपेक्षा वेगळी ठरताना दिसते. *मराठी कथेने गेल्या काही वर्षात घेतलेली उसळी उत्साहवर्धक आहे. त्यातही कथावाङ्मय प्रकारच्या किरटेपणाकडे निर्देश करत त्यावर केलेल्या हल्ल्यामुळे स्वतःच्या कोशात जाऊन निमूट झालेल्या महानगरी कथावाङ्मयाने धारण केलेला बहुमुखी अवतार अचंबित करणारा आहे. या महानगरी कथाविश्वात मनस्विनी लता रवींद्रच्या कथेने आश्वासक पाऊल टाकले आहे. त्याच्या खुणा तिच्या या पहिल्याच कथासंग्रहात स्पष्टपणे उमटलेल्या दिसतात. जागतिकीकरणोत्तर कालखंडात एकविसाव्या शतकाच्या आरंभी साहित्याच्या क्षितिजावर आलेली ही तरुण लेखिका स्वतःकडे आपल्या भवतालाकडे धीटपणे बघताना, त्यातलं उत्तम आणि हीण आत्मीयतेने निरखत त्याची अभिव्यक्ती बेधडकपणे करताना दिसते. हा बेधडकपणा तिच्या पिढीचाच स्थायीभाव आहे, हे खरं असलं तरी जगण्याची व्यामिश्रता समजून घेण्याची तयारी नसणं हाही तिच्या पिढीचा स्थायीभाव आहे. अर्थात याला अपवाद असणारे जे थोडेबहुत आपल्या अवतीभोवती आहेत. त्यात मनस्विनीची उपस्थिती ठळक आहे, कारण ती या*

व्यामिश्रतेला केवळ समजून घेत नाही तर, तिच्या पोटातला धाग्यांचा गुंता सोडवण्याचा प्रयत्न करते. सुटलेले धागे उकलून बघते. या प्रयत्नात तिला मानवी नातेसंबंधातली विदीर्णता आणि तिच्या तळाशी असलेलं माणसाचं एकटेपण दिसतं. जगण्याला नव्याने झटण्याची, नवी सुरूवात करण्याची जशी उमेद दिसते तशीच कशाशीही जोडले न जाण्यातून, तुटलेपणातून येणारी हतबलताही दिसते. या सगळ्यातून होणारा आनंद, येणारं दुःख वा कोणतीही भावना धडपणे व्यक्त न होण्याचा अनुभव येणं यामागे महानगरी जीवनशैलीने लादलेली एक अपरिहार्यता आहे. ती कोणत्याही अनुभवापाशी फार रेंगाळू न देता माणसांना पुढच्या क्षणांकडे खेचत नेते. यातला वेग आणि आवेग मनस्विनीच्या कथांमध्ये उतरताना दिसतो. त्यामुळेच तिची भाषाही पारंपरिक राहात नाही. पण या सगळ्या पलीकडे जात ती आजच्या जगण्यातल्या ताण्याबाण्यांच्या आड असलेलं लिंगभावाचं आणि जातीयतेचं राजकारण जाणून घेत त्याचा तरल आविष्कार करते, हे तिच्या कथांचं वेगळेपण आहे. (जयंत पवार : २०१४ : मलपृष्ठ) समकालीन जीवनातील विविध प्रश्नांना अधोरेखित करतानाच, त्या प्रश्नांच्या मुळापर्यंत जाऊन त्याची चांगल्या-वाईट अर्थाने गंभीर मांडणी त्यांच्या कथेमध्ये होताना दिसते. मनस्विनी लता रवींद्र यांची ‘हातात सुकाणू घेऊन भुर्र..’ ही कथा जरा वेगळ्या धाटणीची आहे. शालेय वयापासून एका मुलीच्या शारीरिक आणि मानसिक बदलांचे अत्यंत भाऊक चित्रण या कथेत आहे. तिचे आणि तिच्या मैत्रिणीचे भावविश्व देखील अत्यंत अकृत्रिम पातळीवर रेखाटले आहे. तिच्या विवाहनंतरचे ताणेबाणे आणि नंतर नवऱ्याशी संबंध तुटणे आदी अनेक घटना समकालीन समाज वास्तवाच्या पार्श्वभूमीवर फार बोलक्या ठरल्या आहेत.

३.९ निष्कर्ष :-

एकूणच नव्वदोत्तरी मराठी कथेच्या निवेदनशैलीचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष आपणाला खालीलप्रमाणे मांडता येतील.

१) नव्वदोत्तरी मराठी कथा समूहविषयक सहानुभवाच्या प्रेरणेतून निर्माण झाली आहे. अनोख्या निवेदन शैलीच्या द्वारे समूहमन आणि समूहजीवन यांना बांधून ठेवण्याचा, त्यांना सतत्याने स्पर्श करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी मराठी कथा करताना दिसते.

२) नव्वदोत्तर मराठी कथेच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असून त्याच्या व्यामिश्र जीवनानुभवाचा खोलवर वेध घेण्याच्या प्रयत्नातून मराठी कथा निर्मिली जाताना दिसते.

३) चिरंतन मानवी मूल्यांची जोपासना, दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाची निर्मिती या मूल्यांबाबत नव्वदोत्तरी मराठी कथा अत्यंत गंभीर असून या मूल्ययुक्त समाजनिर्मितीसाठी नव्वदोत्तरी मराठी कथा विशेष प्रयत्नशील असलेली दिसून येते.

४) व्यक्तीजीवनाकडून समाज जीवनाकडे प्रवास करणारी मराठी कथा अत्यंत सजग, सावध व समकालीन घटनांची साक्षेपाने नोंद करताना दिसून येते.

५) नव्वदोत्तर कथा भोवतालच्या वास्तवाचे अचूक आणि अस्सल भान व्यक्त करण्यासाठी कथेच्या निवेदनशैलीचा नेमकेपणाने उपयोग करताना दिसते.

❖ संदर्भ व टीपा

१) जोशी, सुधा, २००० : **मराठी कथा : संकल्पना आणि समीक्षा**, मौज प्रकाशन, मुंबई

२) जोशी, संजय, २०१५ : **दशकातील साहित्यिक**, ललित, मुंबई

३) कुळे, मुकुंद, २०१६ : **एक मनस्विनी लेखक**, रविवार महाराष्ट्र टाईम्स संवाद पुरवणी, मुंबई

४) कदम, महेंद्र, २०१३ : **जयंत पवारांची कथा**, परिवर्तनाचा वाटसरू, पुणे

५) देशपांडे,अजय, २०१७ : **आजची मराठी कथा : काही नोंदी, काही निरीक्षणे**, सर्वधारा, अमरावती

६) पवार, जयंत,२०१४ : **ब्लॉगच्या आरश्यापल्याड**, शब्द प्रकाशन, मुंबई

प्रकरण चौथे

नव्वदोत्तर मराठी कथेचे भाषाविशेष

....

४.१ प्रस्तावना :-

कोणत्याही साहित्य प्रकाराच्या यशस्वी उपयोजनासाठी, निर्मितीसाठी त्या कलाकृतीच्या अंतर्गत उपयोजिल्या जाणाऱ्या भाषिक वैशिष्ट्यांचे स्थान महत्त्वपूर्णच नव्हे तर आवश्यकही असलेले दिसून येते.

नव्वदोत्तर मराठी कथा समकालीन सामाजिक व्यवस्थेची भाषा आणि कल्पनाशक्तीला जिवंत ठेवण्याचे काम करताना दिसून येते. अनेक भाषिक वैशिष्ट्यांना स्वतःमध्ये सामावून घेत नव्वदोत्तर कालखंडातील भाषा आत्मविश्वासाने मार्गक्रमण करताना दिसून येते.

समाजाच्या जडणघडणीमध्ये भाषा महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावाने, वापराने आणि इंग्रजीच्या वाढत्या दबावाने आपल्या समाजातील मूळची मराठी भाषा दिवसेंदिवस आक्रसत चाललेली आहे. त्या आक्रसत चाललेल्या मराठी भाषेची अनेक रूपे आपणाला नव्वदोत्तर मराठी कथेत पहावयास मिळतात.

नव्वदोत्तर कालखंडातील अनेक लेखक आपले भाषिक वेगळेपण जोपासताना जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांची सूक्ष्मपणे नोंदही घेताना आढळतात. वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांच्या माध्यमातून एखाद्या प्रसंगाचे, काळाचे नेमके चित्र आपल्या डोळयांसमोर उभारत जातात. उदा. 'जयंत पवार' यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथेची सुरुवातच वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांच्या भाषेत कशी होते ते पहा, *सुंदरीने आपले चेतक बहु फैलावून आवाहन करावं*

किंवा एका मोहक प्राण्याने आपला जबडा इतका वासावा की, त्याचा वरचा ओठ आकाशाला भिडवा आणि खालचा ओठ भूपृष्ठावर उतरत लांब पसरलेल्या जिभेखाली दडून जावा किंवा गेटवे ऑफ ग्लोबल इंडिया तसं हायस्ट्रीट फिनिक्सचा महादरवाजा सताड ऐसपैस उघडा आहे. (जयंत पवार :२०११:५५) कथेतील वैशिष्ट्यपूर्ण भाषाच त्या कथेला सार्वभौमत्व मिळवून देत असते. त्यामुळे कोणताही कथालेखक कथेच्या भाषेविषयी अत्यंत सजग असतो.

नव्वदोत्तर मराठी कथेत समाजभान अधिक टोकदारपणे प्रतिबिंबित होताना दिसते. नव्वदोत्तर कालखंडात माणूस शतखंडित वास्तवामध्ये विभागाला गेलेला दिसून येतो. मानवी वृत्ती-प्रवृत्तींमध्ये झालेल्या बदलांचे चित्रण करण्यास पारंपरिक भाषाविशेष वेगळ्या पातळीवरून विचार करता तोकडे पडत होते असे दिसून येते. नव्वदोत्तर मराठी कथेने हे तोकडेपण संपुष्टात आणतानाच भाषाविषयक विविध प्रयोगांच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण मांडणीच्या द्वारे मानवी जीवनानुभावांचे एक संपन्न भावविश्व साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडात झालेले दिसून येतो. म्हणूनच या कालखंडातील कथेची अभिव्यक्तीकरणाची भाषा सर्वार्थाने वेगळी आणि मानवी मनाचे तळ धुंडाळणारी असलेली दिसून येते. मानवी जगण्याचे विविधांगी दर्शन घडविणे हे तिचे सगळ्यात महत्त्वाचे लक्षण असलेले दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून नव्वदोत्तर मराठी कथेत सामावलेल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा विशेषांच्या अभ्यासाविषयीची निरीक्षणे मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

४.२ शतखंडित वास्तवाला प्रतिबिंबित करणारी कथा:-

नव्वदोत्तर कालखंडात भारताने स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेने सर्वच क्षेत्रांत जागतिकीकरणाचा प्रवेश झाला. व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना सिमाविरहित बनवत, एकमेकांच्या भूमीत कायदेशीररीत्या खुलेपणाने व्यापार करण्याची व्यवस्था या माध्यमातून निर्माण झाली. बाजारकेंद्री जागतिकीकरणाने माणसाच्या आयुष्यात प्रवेशलेल्या कमालीच्या व्यक्तिवादाने त्याच्या अस्तित्वाचे शतखंडित वास्तवात रूपांतरण घडून आल्याचे दिसून येते. माणसाच्या बदलत्या भूमिकेमुळे, त्याच्या आत्मकेंद्री स्वभावामुळे साहित्याच्या रूपबंधामध्येही मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेले दिसून येतात. त्यातूनच बदलत्या काळातील, बदलत्या समाजरचनेचा घटक असणाऱ्या नव्या वाचकापुढे एक सलग विधान करण्याच्या भूमिकेतून नव्वद नंतरचे कथाकार नव्या वैशिष्ट्यांसह, जाणिवांसह, सहानुभावांसह स्वतःला अभिव्यक्त करू लागले.

नव्वदोत्तर कालखंडातील प्रमुख कथाकारांमध्ये जयंत पवार, सतीश तांबे, समर खडस, पंकज कुरुलकर, विजय तांबे आदी कथाकारांचा समावेश करता येईल. या कथाकारांच्या कथांतील भौगोलिक अवकाश हा प्रामुख्याने महानगराशी संबंधित आहे. जयंत पवारांच्या कथेत तर मुंबई एक पात्र म्हणूनच अवतरताना दिसेल. मुंबईतील अनेक स्थळांचे संदर्भ त्या स्थळांच्या विविक्षित ओळखींसह आणि सूक्ष्म बारकाव्यांसह साकार झाले आहेत. पंकज कुरुलकरांच्या कथेत आय.टी. इंडस्ट्री आणि कार्पोरेट क्षेत्राशी निगडित तपशील तेथील सूक्ष्म बारकाव्यांसह व्यक्त झाले आहेत.

जयंत पवार यांची कथा प्रामुख्याने मुंबईत वास्तव्याला असणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गातील आणि बहुजनसमाजातील माणसांविषयी, त्यातही कामगारांविषयी, त्यांच्या छोट्या-मोठ्या प्रश्नांविषयी आस्था बाळगून आहे. त्यांच्या 'छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र' व 'चंदूच्या लग्नाची गोष्ट अर्थात सड्डम में टढ्ढुम..' या कथांमध्ये अनुक्रमे बारबाला आणि वेश्या यांचे अनुभवविश्व, त्यामागील पुरुषसत्ताक राजकारणासह साकार झाले आहे. सतीश तांबे, पंकज कुरुलकर आणि विजय तांबे यांच्या कथेतील पात्रे ही मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजातील पात्रे आहेत असे साधारणपणे म्हणता येईल. अपवाद सतीश तांबे यांच्या 'रसातळाला ख.प.च.', 'पळवाटा वाटा पाताळा'च्या अशा काही कथा. समर खडस यांच्या कथांत मध्यमवर्ग आणि निम्न वर्ग अशा दोन्ही वर्गांतील पात्रे त्यांच्या विशिष्ट प्रश्नांसह साकार झाली आहेत.

जयंत पवारांची कथा ही प्रामुख्याने गिरणी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी कथा आहे. *जयंत पवारांची कथा वाचताना त्यांची संवेदनशीलता, भाषिक अभिव्यक्ती आणि पात्रांची सामाजिक पार्श्वभूमी हे सगळं भाऊ पाध्यांच्या जवळचं असल्याचं जाणवतं. स्वत: जगलेलं आणि अनुभवलेलं, बेचैन करणारं वास्तव समूहमनाद्वारे कथेत व्यक्त करणं हे या दोघांचंही ठळक वैशिष्ट्य. मात्र पवार यांच्या कथांमधून उभं राहणारं भाषिक व्यक्तिमत्त्व हे अत्यंत मौलिक आणि त्यांचं स्वतःचं आहे. त्यांच्या कथांमधलं वास्तव 'घडवलेलं' किंवा 'कृत्रिम' नाही, त्यामुळे त्यांची भाषाही तशी नाही. आधी 'फॉर्म' निश्चित करून ते कथा लिहित नसल्यामुळे त्यांच्या कथांचा आशय स्वतःचा आकार घेऊनच निश्चित होतो.* (निखिलेश चित्रे : २०११ :१८) पात्रांची विशिष्ट सामाजिक पार्श्वभूमी तयार करून त्यावर जयंत पवार आपल्या कथेची इमारत

उभारत असलेले दिसून येतात. त्यांच्या कथेतील पात्रांचे भाषिक अवकाश इतके अचूक असतात की ती कथा वास्तवात घडून गेल्याचा प्रत्यय वाचकाला येतो.

४.३ समकालीन भयावह वास्तवाला शब्दरूप देणारी कथा:-

आर्थिक उदारीकरनातून खुली झालेली जागतिक बाजारपेठ, आर्थिक सत्ता मिळविण्याची उपलब्ध झालेली मुबलक संधी, परंतु त्याच वेळी त्या संधीपर्यंत पोहोचण्यासाठी विविध क्षेत्रांत असलेली जीवघेणी स्पर्धा, या स्पर्धेत माणसाचे, त्याच्या शारीर, बौद्धिक कौशल्याचे झालेले टोकाचे 'वस्तुकरण', तसेच कोणत्याही गोष्टीचे बाजारीकरण होऊ शकते हे समकालीन समाजवास्तव पंकज कुरुलकर, सतीश तांबे आणि विजय तांबे यांच्या कथांमध्ये साकार झाले आहे. विजय तांबे यांच्या 'कौ.ब.क. आणि स.द.क. ची गोष्ट : सामुहिक वाचनासाठी', 'भगवंत भगवंत' आणि 'ढील' या कथा या दृष्टीने विशेष लक्षणीय आहेत.

पैसा हाच सुखी जीवनाचा मंत्र ठरविणाऱ्या या काळात वस्तूंना अमाप महत्त्व येवून गरज आणि चैन यांतील सीमारेषा धूसर करणारी वर्तनशैली समाजात रुजलेली दिसते. या चंगळवादी संस्कृती विषयी सतीश तांबे यांच्या 'रसातळाला ख.प.च.' या कथेतील निवेदक असलेले लेखकपात्र म्हणतो, *मी सुमीला म्हटलं, ''ते तर आहेच. पण गरीब किंवा श्रीमंत स्वतःला तत्त्वनिष्ठ म्हणून टेंभा मिरवत नाहीत. मध्यमवर्गीय मात्र स्वतःला काय समजतात! आपणच तेवढे संस्कृतीरक्षक आहोत! पण मी ज्या-ज्या पांढरपेशांना भेटतो, ज्यांच्या घरी जातो त्या कुणाच्याही घरी शाळा-कॉलेजच्या पुस्तकांखेरीज आणखी कोणत्याही विषयांवरची पुस्तके नसतात. गेल्या काही वर्षांमध्ये तर ह्या वर्गाच्या हातात पैसाही बऱ्यापैकी आलाय. पण त्यांच्या गप्पा ऐक. फक्त*

खाण्यापिण्याच्या आणि गाड्याघोड्यांच्या असतात. काहीतरी महत्त्वपूर्ण विषयावरची चर्चा मी पांढरपेशांच्या गप्पांमध्ये क्वचितच ऐकली आहे. मी त्यांना 'ख.प.च.' म्हणतो ते उगीच नाही. त्यांच्या तोंडात 'ख' म्हणजे खाणे, 'प' म्हणजे पिणे आणि मनात 'च' म्हणजे, तुझ्यासमोर बोलायला थोडंसं अवघड वाटतंय पण 'च' म्हणजे चढणे, म्हणजे सेक्स असतं...फार तर आपण 'च' फॉर चोचले म्हणूया. देहाचे चोचले! म्हणजे आपला अर्थही व्यापक होईल...हे मला तुझ्याशी बोलताना आताच सुचलं. चांगलं आहे. 'खाणं पिणं चोचले पुरवणं' ह्यालाच कुणीकुणी चंगळवाद असं म्हणतात...आज कुठेही बघ, ह्या वर्गाकडे वाहने येताहेत. वेगवेगळी गॅजेट्स ते थेट उंची साबण, शाम्पू नि काय नि काय पण ह्यांचे खर्च आणि चर्चा त्यापलीकडे जायला तयार नाहीत. तरीही ह्यांना आतून मात्र असं वाटतं की आपण फार श्रेष्ठ आयुष्य जगतो आहोत. पण त्यासाठी आवश्यक असलेली तत्त्वं, मूल्य, नैतिकता, सत्याची चाड ह्यांचा गंध तरी असतो का त्यांना? मला तरी नाही दिसलेला!...ते वरवर नीतीनियम पाळतात तेवढंच!" (सतीश तांबे :२०१० : ३३-३४) नव्वदोत्तर कालखंडात झालेल्या बदलांमुळे मानवी जीवन जाणिवांमध्ये, जगण्याच्या पद्धतींमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होताना दिसून येतात. माणसाची केवळ जीवनशैलीच नव्हे तर त्याची जीवनाविषयीची जाणीवही संकुचित होवू लागली आहे. नव्वदोत्तर कालखंडातील कथालेखक मानवी जीवनानुभवांच्या बदलत्या समकालीन भयावह वास्तवाला अचूकपणे अधोरेखित करताना दिसतो. बाह्य वस्तुंच्या तृष्णेमुळे पृष्ठपातळीवर जीवनाला समृद्धी येणे परंतु अंतर्यामी माणसाचे समाजापासून, स्वतःपासून तुटत जाणे, एकाकी होऊन उरणे इत्यादी संदर्भ सतीश तांबे यांची कथा अधोरेखित करते.

उदारीकरणाने रुजविलेल्या या जीवनशैलीची दूसरी बाजू म्हणजे, भौतिक समृद्धी मिळविण्यासाठी संस्थात्मक आणि वैयक्तिक पातळीवर चालणारे भ्रष्ट आचार. पंकज कुरुलकर, समर खडस यांच्या प्रमाणेच सतीश तांबे यांचीही कथा समाजाच्या भयावह चेहऱ्याला शब्दरूप देण्याचा प्रयत्न करते. त्यांच्या 'दाऊद संताजी, हर्षद धनाजी' या कथेत मध्यमवर्गीय माणसांनी दाऊद इब्राहीम आणि हर्षद मेहता यांना 'आयडॉल' मानणे या समूहमानसिकतेवर उपरोधपूर्ण भाष्य केलेले आहे. हर्षद आणि दाऊद मोठ्या पातळीवर जाऊन जे भ्रष्ट आचरण करतात तेच आचरण एका मर्यादित चौकटीत करणारा मध्यमवर्गीय समाज, तांबे यांच्या कथेच्या केंद्रस्थानी असलेला दिसून येतो. ही कथा मध्यमवर्गीयांच्या वर्तनातील संधीसाधूपणा व दांभिकपणा ठसठशीतपणे अधोरेखित करते. त्यांच्या 'देव-दानवे नरा' या कथेत माणसापेक्षा वस्तूंना, पैशांना महत्त्व देणाऱ्या, माणसाचा मानवी चेहरा पुसट करीत नेणाऱ्या विद्रूप सामाजिक वास्तवाचा उच्चार झाला आहे.

४.४ भौतिक सुखांबद्दल अपार तृष्णा बाळगणाऱ्या माणसांची कथा :-

माणसाच्या आयुष्यात निर्माण होणारे प्रश्न हे प्रामुख्याने 'मी' च्या लघु आणि जात, वर्ग आणि धर्म नामक बृहद वृत्तीतून आणि भौतिक सुखांबद्दलच्या अपार तृष्णेतून निर्माण झालेले प्रश्न आहेत, याचे भान जयंत पवार आणि सतीश तांबे यांची कथा करून देते. सतीश तांबे यांच्या कथेत भौतिक समृद्धीच्या हव्यासाचे भय वाटणारी आणि ही अनिर्बंध तृष्णा माणसाचा घात करणारी असून त्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे, अशी मूल्ययुक्त भूमिका अधोरेखित करणारी पात्रे साकार झाली आहेत. 'देव-दानवे नरा' कथेतील नंदन, 'गुरुविण कोण' मधील तो आणि 'तात्पर्य कथे'च्या

आकृतिबंधाशी नाते सांगणाऱ्या ‘बापूंच्या खुर्चीची गोष्ट’ कथेतील मोहन शेणॉय या पात्रांचे तृष्णेचे वर्तुळ भेदण्याची गरज प्रतिपादन करणारे चिंतनगर्भ विचार या दृष्टीने लक्षणीय आहेत.

विजय तांबे, जयंत पवार आणि सतीश तांबे यांची कथा ‘नैतिकता’ या मूल्यसंकल्पनेला अनेक बाजूंनी तपासून पाहण्याचा प्रयत्न करते. नैतिकतेची समाजमान्य कल्पना आणि व्यक्तीच्या मूल्यविवेकातून निर्माण झालेली नैतिकता यांच्यातील चिरंतन संघर्ष ही कथा अधोरेखित करते. सुंदर-असुंदर, पाप-पुण्य, नीती-अनीती या विरोधी धारणांचे सूचन करणारे संकल्पनाव्यूह माणसाच्या जगण्याला कोंडीत पकडतात, हे वास्तव ही कथा सशक्तपणे उलगडून दाखविते. ती जीवनाला समजून घेण्याच्या अनेक पातळ्या आपल्यासमोर उघड करते. सतीश तांबे यांच्या ‘सी-सॉ’, ‘रसातळाला ख.प.च.’, विजय तांबे यांच्या ‘माझंचपणचा सार्वत्रिक अबोला’ व जयंत पवार यांच्या ‘छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र’ व ‘चंदूच्या लग्नाची गोष्ट अर्थात सड्डम में टढ्ढुम...’ या कथांचा येथे उल्लेख करता येईल.

धार्मिक पुनरुज्जीवनाच्या प्रक्रियेचा अपरिहार्य परिणाम म्हणून झालेल्या धार्मिक दंगली, घडवून आणलेले बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया, भिन्न धर्मीय स्त्रियांवर केले गेलेले बलात्कार व भिन्नधर्मीय माणसांची केली गेलेली अमानुष कत्तल, इत्यादी संदर्भ पंकज कुरुलकर, समर खडस आणि जयंत पवार यांची कथा थेटपणे व्यक्त करते. त्यांच्या कथांतून आलेले बाबरी मशीद-राम मंदिर प्रकरणाचे, कारगिल युद्धाचे व गोध्रा हत्याकांडाचे उल्लेख या दृष्टीने विचारात घेता येतील. या सामाजिक वातावरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून मानवी मनात निर्माण झालेली कमालीची असुरक्षितता आणि मानवी जीवनाला

भोवंडून टाकणारी दहशत जयंत पवार, विजय तांबे, पंकज कुरुलकर आणि समर खडस यांच्या कथांतून अभिव्यक्त होते. जयंत पवार यांची 'टेंगशेंच्या स्वप्नात ट्रेन', पंकज कुरुलकर यांच्या 'दंगल', 'घर' या कथा, विजय तांबे यांची 'आतल्या आत टेररिस्ट' आणि समर खडस यांची 'बकऱ्याची बॉडी' या कथा या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

सतीश तांबे यांच्या कथेतून समकालीन वास्तवातील हिंसेचे संदर्भ व्यक्त होताना दिसतात. त्यांच्या कथेतून हिंसेचे मूळ स्वबाह्य परिस्थितीत शोधणाऱ्या मानसिकतेला उघड केले जाते. वस्तुतः समाजाच्या या स्खलनशील व्यवहारातून वेगळे राहण्याचा अवकाश व्यवस्था देत नाही. तसेच व्यवहाराच्या या धबडग्यात बहुतांश माणसांची ती गाभ्याची गरज उरत नाही, या शोकगर्भ आणि विदारक सत्यापर्यंत सतीश तांबे यांची कथा वाचकाला घेऊन जाते. वरील संदर्भांच्या बरोबरीनेच लोकशाहीत सत्ताकेंद्राशी जोडली गेलेली हुकुमशाही, व्यक्ति व विचारस्वातंत्र्याची केली गेलेली गळचेपी इत्यादी संदर्भही सतीश तांबे यांच्या 'लाल नदीचे मूळ' आणि 'दाऊद संताजी, हर्षद धनाजी' या कथांतून अधोरेखित होतात.

उपरोक्त विवेचनावरून पंकज कुरुलकर, सतीश तांबे आणि जयंत पवार या कथाकारांची कथा सामाजिक वास्तवातील आशयद्रव्य आपल्या लेखनाच्या आशयसूत्राशी थेटपणे जोडून घेते, ही बाब स्पष्टपणे पुढे येते. असे करीत असताना घडणाऱ्या घटनांचा मानवी जीवनावरील परिणाम, या परिस्थितीला माणसांनी दिलेल्या प्रतिक्रिया, त्यातून सूचित होणाऱ्या वृत्तीप्रवृत्ती शोधण्यात या कथाकारांना अधिक आस्था आहे. हे कथाकार भवतालाचा केवळ वेध घेत नाहीत तर ते मानवी जीवनाच्या संदर्भात या वास्तवाचा अन्वयार्थ लावण्याचा

प्रयत्न करतात. सतीश तांबे व जयंत पवार या कथाकारांची या संदर्भातील ताकद विशेष लक्षणीय आहे, असे म्हणता येईल.

४.५ नव्या आर्थिक समीकरणांचे, जागतिकीकरणाचे आयाम समजून घेणारी कथा :-

बहुसंख्य मराठी कथा स्त्री-पुरुष संबंध, कष्टकऱ्यांचे दयनीय जगणे आणि किस्सेबाज विनोद यामध्ये पूर्वी घोटाळायची तशीच ती आजही घोटाळताना दिसते. अपवाद पूर्वीही होते. आजही आहेत. अपवाद म्हणूनच सांगायचे तर 'योगिनी वेंगुर्लेकर' यांसारखी एरवी फारशी प्रसिध्द नसलेली लेखिका मात्र आवर्जून नव्या जगण्याचे, नव्या आर्थिक समीकरणांचे आणि जागतिकीकरणाचे विभिन्न आयाम समजून घेत कथा लेखन करताना दिसते. उदाहरणार्थ 'नांदी' या कथेत योगिनी वेंगुर्लेकर जागतिकीकरणामुळे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय घडामोडींचा उत्कृष्ट वेध घेतात. छोट्या स्थानिक कंपन्याच कशा मोठ्या कंपन्या गिळंकृत करतात याचे चित्रण करता करता त्या त्याचे परिणाम अगदी सूक्ष्म पातळीवर एखाद्या प्रेमात पडलेल्या जोडप्यावर कसे होतात त्याचेही चित्रण करतात. अशा कथेत चिरंतन नाती-भावना याच्याबरोबर खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाने झालेले परिणाम दिसतात. याच कथेत योगिनी वेंगुर्लेकर लिहितात, *लहान कार्सच्या क्षेत्रात असलेली व्हिटले ही कंपनी अनभिषिक्त सम्राटच जणू! पण व्हिटले मंडळी साळसूद नव्हती. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड वैगेरे बाजारपेठांतून इतकी वर्षे वेगवेगळ्या लढणाऱ्या क्रिसलर-डाइलमर या कंपन्या. एव्हाना त्यांचा नखरा बराच उतरलेला. केवळ या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी आशियाई बाजारपेठेकडे नजर वळवली. मग त्यांनी जाळं लावायला सुरूवात केली. भांडवलटंचाईमुळे जेरीला आलेली बाफना इंडस्ट्री आपसुक अडकली जाळ्यात. इथं बस्तान बसवायचं म्हटल्यावर मात्र त्यांनी*

धडाकेबाज सुरूवात केली. त्यांना इथली संपूर्ण कार्यपद्धती संगणकावर घ्यायची होती व इथून फक्त आशियाच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या बाजारात गाड्या विकण्याचा 'ऑनलाईनबिझनेस' सुरु करायचा होता. (योगिनी वेंगुर्लेकर : २०१४ :२५) या सर्व वर्णनात जागतिकीकरणामुळे जगभर घडणाऱ्या घटनांची जाण दिसते. आणि ही जाण अस्सल माहितीसह येते. शेवटी बाफना इंडस्ट्रीत काम करणाऱ्या उर्मिला या तरुणीच्या भावजीवनाशीच येवून भिडते ही कथा. या घडामोडींमुळे बाफना इंडस्ट्री उत्पादनापासून दूर जाऊन केवळ विक्रीकेंद्र होत आणि अनेकांच्या नोकऱ्या जातात. आणि त्यात उर्मिलेची मानसिक कोंडी होत जाते. कथा मानवी भावनांची आहे, पण त्याला आजच्या जगात घडणाऱ्या गोष्टी केवळ पार्श्वभूमीवरच असत नाहीत तर मुख्य कारण ठरतात आनित्यामुळे कथा खऱ्या अर्थाने समकालीन होते.

४.५ लैंगिक प्रेरणेचे विविध आयाम उलगडून दाखवणारी कथा :-

माणसाची कामप्रेरणा आणि त्यातील गुंतागुंत हे सतीश तांबे यांच्या कथेतील एक अत्यंत महत्त्वाचे सूत्र आहे. लैंगिकतेबद्दल अनुभवपूर्व कुतूहल आणि प्रत्यक्ष अनुभवानंतरही सुखातील वैविध्याची, वैचित्र्याची असलेली ओढ, लैंगिक संबंधाविषयीचे कल्पित आणि प्रत्यक्ष अनुभव यांतील अंतर, अपेक्षाभंग आणि तरीही नरमादीला परस्परांच्या देहाविषयी वाटणारे अपार आकर्षण तसेच लैंगिकतेकडे पाहण्याचा समाजाचा पारंपरिक दृष्टिकोन, त्याच्याशी निगडीत नीतीअनीतीच्या मूल्यकल्पनांचे संदर्भव्यूह हा सतीश तांबे यांच्या लैंगिकता या सूत्राशी निगडीत असलेल्या कथांचा अवकाश आहे. लैंगिक प्रेरणेचे विविध आयाम उलगडून दाखवताना प्रेमभावनेशी निगडित असणाऱ्या रूढ रोमँटिक संदर्भांचे प्रतिनिधित्व करणारा, या संबंधातील गूढतेचे वलय अधोरेखित करणारा, किंवा मानवी मैथुनाविषयी आत्यंतिक आस्था

असणारा निवेदक सतीश तांबे यांच्या कथेत येत नाही. उलटपक्षी त्यांच्या कथेतील निवेदक या आदिम प्रेरणेकडे पाहण्याची प्रस्थापित व्यवस्थेची मूल्यात्मक दृष्टी आणि त्यामुळे निर्माण होणारे ताणतणाव तसेच प्लेटॉनिक प्रेम आणि शारीरिक आकर्षण यांची द्विधृवात्मक मांडणी यांमुळे स्त्रीपुरुषांची होणारी कोंडी यांकडे थेटपणे, विलक्षण समजुतीने आणि बऱ्याचशा निर्लेपपणे पाहतो. 'कोरसमधील बोबडा पोपट', 'बिनबायांच्या जगात ब्रह्मचाऱ्याचे लग्न', थेंबे थेंबे तळं-थेंबे थेंबे गळं', करीना माझी वियाग्रा' यांसारख्या कथा या दृष्टीने लक्षणीय आहेत.

सतीश तांबे यांची कथा मानवी जगण्याच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या शारीरप्रेमाविषयी अत्यंत मूलगामी आणि बेधडक विचार मांडताना दिसते. *लैंगिक संदर्भापासून सुरु होणारी तांबेंची कथा जीवनातल्या अन्य संदर्भांकडेही तितक्याच आस्थेने पाहते, किंबहुना काही वेळा कथेचा अंतिम परिणाम हा लैंगिकतेची कशा ओलांडून जीवनाच्या अन्य संदर्भाकडे अधिकाधिक अंतर्मुखपणे पाहण्याची दृष्टी देणारा असतो असेही दिसते. स्त्रीपुरुष संबंधांकडे खुलेपणाने पाहत असताना व्यवस्थेने प्रस्थापित केलेली मूल्ये, नीतिकल्पना प्रमाण मानल्या तरी आणि नाकारल्या तरी, माणसाची सर्व बाजूंनी कोंडी करण्याची क्षमता व्यवस्थेत आहे, याचीही गंभीर नोंद सतीश तांबे यांची कथा घेते. त्यामुळे सतीश तांबे यांच्या कथा मैथुनाकडून मननाकडे जाणाऱ्या कथा आहेत असे म्हणता येईल.* (शीतल भोसले : २०१३ : १०४-१०५)

प्रस्थापित व्यवस्थेने ठरवून दिलेल्या नीतिनियामांच्या चौकटीतच जगण्याची सक्ती बहुतेकदा सामान्य माणसावर होत असते. सतीश तांबे यांची कथा या माणसांच्या नैसर्गिक जगण्याची उर्मी अत्यंत अचूक शब्दांच्या माध्यमातून आपणासमोर आविष्कृत करण्याचा प्रयत्न करतात.

४.६ निष्कर्ष :-

एकूणच नव्वदोत्तरी मराठी कथेच्या भाषिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष आपणाला खालीलप्रमाणे मांडता येतील.

६) नव्वदोत्तर मराठी कथा समकालीन सामाजिक व्यवस्थेची भाषा आणि कल्पनाशक्तिला जिवंत ठेवण्याचे काम करताना दिसून येते. अनेक भाषिक वैशिष्ट्यांना स्वतःमध्ये सामावून घेत नव्वदोत्तर कालखंडातील भाषा आत्मविश्वासाने मार्गक्रमण करताना दिसून येते.

७) नव्वदोत्तर कालखंडातील अनेक लेखक आपले भाषिक वेगळेपण जोपासताना जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांची सूक्ष्मपणे नोंदही घेताना आढळतात. वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांच्या माध्यमातून एखाद्या प्रसंगाचे, काळाचे नेमके चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभारत जातात.

८) नव्वदोत्तर मराठी कथेत समाजभान अधिक टोकदारपणे प्रतिबिंबित होताना दिसते. नव्वदोत्तर कालखंडात माणूस शतखंडित वास्तवामध्ये विभागाला गेलेला दिसून येतो. मानवी वृत्ती-प्रवृत्तींमध्ये झालेल्या बदलांचे चित्रण करण्यास पारंपरिक भाषाविशेष वेगळ्या पातळीवरून विचार करता तोकडे पडत होते असे दिसून येते. नव्वदोत्तर मराठी कथेने हे तोकडेपण संपुष्टात आणतानाच भाषाविषयक विविध प्रयोगांच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण मांडणीच्या द्वारे मानवी जीवनानुभावांचे एक संपन्न भावविश्व साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडात झालेले दिसून येतो. म्हणूनच या कालखंडातील कथेची अभिव्यक्तीकरणाची भाषा सर्वार्थाने वेगळी आणि मानवी मनाचे तळ धुंडाळणारी असलेली दिसून येते. मानवी जगण्याचे विविधांगी दर्शन घडविणे हे तिचे सगळयात महत्त्वाचे लक्षण असलेले दिसून येते.

९) नव्वदोत्तर कालखंडातील कथालेखक मानवी जीवनानुभवांच्या बदलत्या समकालीन भयावह वास्तवाला अचूकपणे अधोरेखित करताना दिसतो. बाह्य वस्तुंच्या तृष्णेमुळे पृष्ठ्पातळीवर जीवनाला समृद्धी येण्यासारखे वाटणे परंतु अंतर्यामी माणसाचे समाजापासून, स्वतःपासून तुटत जाणे, एकाकी होऊन उरणे इत्यादी भावनांचा उत्कट आविष्कार वैशिष्ट्यपूर्ण शब्दानुभावांच्या माध्यमातून प्रस्तुत कालखंडातील कथा आश्वासकपणे करत असलेली दिसून येते.

१०) आर्थिक उदारीकरनातून खुली झालेली जागतिक बाजारपेठ, आर्थिक सत्ता मिळविण्याची उपलब्ध झालेली मुबलक संधी, परंतु त्याच वेळी त्या संधीपर्यंत पोहोचण्यासाठी विविध क्षेत्रांत असलेली जीवघेणी स्पर्धा, या स्पर्धेत माणसाचे, त्याच्या शारीर, बौद्धिक कौशल्याचे झालेले टोकाचे 'वस्तुकरण', तसेच कोणत्याही गोष्टीचे बाजारीकरण होऊ शकते हे समकालीन समाजवास्तव व्यक्त करण्यासाठी नव्वदोत्तर कथालेखक भाषिक प्रयोगशीलतेचा अवलंब करताना दिसतात.

❖ संदर्भ व टीपा

१) पवार, जयंत:२०११: **फिनिक्सच्या राखेतून उठला मोर**, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

२) चित्रे, निखिलेश (प्रस्तावना) - पवार, जयंत :२०११ : **फिनिक्सच्या राखेतून उठला मोर**, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई

३) तांबे, सतीश:२०१० : **रसातळाला ख.प.च.,** अक्षर प्रकाशन, मुंबई

४) भोसले, शीतल : २०१३ : **नव्वदीनंतरची कथा**, ललित कथा विशेषांक, मुंबई

प्रकरण पाचवे

नव्वदोत्तर मराठी कथेतील प्रयोगशीलता

....

५.१ प्रस्तावना :-

कलाकृती निर्माण होतानाच ती अंगभूतपणे प्रयोगशील संकल्पनांना सामोरी जात असते. प्रयोगशीलतेचा संबंध संपूर्ण कलाकृतीच्या संकल्पनेबरोबरच तिच्या सुट्या घटकांशीही असतो. कथेतील पात्रे, पात्रांचे वर्तन, कथासूत्राची रचना, काळाला मागेपुढे करणे, संवादाचे स्वरूप यामधून किंवा यांच्यातील काही घटकांमधून प्रयोगशीलतेचा प्रत्यय येतो. कधी कधी या घटकांच्या परस्पर संबंधातूनही प्रयोगशीलता जाणवते. लेखकाची जीवनदृष्टी आणि त्याची विशिष्ट विचारसरणीसुद्धा या सर्व घटकांना वेगळे परिमाण देऊ शकते.

कथेमधील घटना, कथासूत्राची रचना, काळाची मांडणी, पात्रचित्रणाची पद्धत, निवेदक, भाषिक वैशिष्ट्ये या सर्वांच्या माध्यमातून कथेतील प्रयोगशीलतेचा शोध घेता येतो. कथा हा साहित्यप्रकार वास्तवाशी निगडित असल्याने बाह्य वास्तवातील व्यामिश्रता साकार करताना कलावंत कोणती नवी तंत्रे निर्माण करतो, यावर या साहित्यप्रकारांची प्रयोगशीलता अवलंबून असते.

सध्याच्या तुकड्यातुकड्यांनी बनलेल्या मानवी अस्तित्वाचे आणि एकसंध नसलेल्या व्यामिश्र वास्तवाचे प्रकटीकरण करताना ‘श्याम मनोहर’ यांनी घटना, घटनाक्रम, कथासूत्र, पात्रांचे वर्तन, संवाद या सर्वांचेच स्वरूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. वास्तव आणि कल्पित यांच्या परस्परसंबंधांचे पारंपरिक साचे ‘श्याम मनोहर’, ‘विलास सारंग’ यांसारख्या कथाकारांनी मोडून टाकले आहेत.

समकालीन वास्तवातील माणसाचे जीवन शतखंडित वास्तवामध्ये विभागले गेलेले आहे. कथाकाराला हे वास्तव चिमटीत पकडण्यासाठी नवनवीन प्रयोगांचे सहाय्य घ्यावे लागत असलेले दिसून येते. *प्रयोगशीलतेच्या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की, जीवनानुभव, जीवनाशय वेगळा, नवीन आहे म्हणून त्या कलाकृतीला कोणी प्रयोगशील म्हणत नाही. साहित्यात येथे त्याबरोबरीनेच मोठ्या प्रमाणात भाषिक व रूपकात्मक वेगळेपण महत्त्वाचे असते. अर्थात, आशयाचा या वेगळेपणाशी घनिष्ठ संबंध असतो. व्यवस्थेशी बंडखोरीच्या द्वारे तो संबंध येतो. आशय आणि अभिव्यक्ती असे काही निखळ विभाजन शक्य नसते. केवळ आशयात्म किंवा केवळ भाषिक वा रूपात्मक वेगळेपण हे फक्त जीवनार्थरहित कलांमध्येच शक्य असते.* (वसंत पाटणकर :२०११ :२६,२७) कोणत्याही कलाकृतीमधील प्रयोगशीलता गृहीत धरताना त्या कलाकृतीमधील आशय, अभिव्यक्ती आणि रूपकात्म संकल्पनांमध्ये जी मोडतोड झालेली असते, ती कलाकृतीच्या प्रयोगशीलतेचा प्रत्यय प्रत्यक्ष वाचकाला आणून देत असते असे म्हणता येते.

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून आपण नव्वदोत्तर कालखंडातील कथा कोणत्या प्रयोगशील घटकांनी समृद्ध झालेली आहे याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

५.२ **संहितेला अनेक नव्या शक्यतांमध्ये बघणे :-**

नव्वदोत्तरी मराठी कथा संहितेला वेगवेगळया नव्या शक्यतांधून आविष्कृत करत असलेली दिसून येते. *जयंत पवार यांच्या कथेतून महानगरातील जागतिकीकरणाच्या उपस्थितीचे अतिशय प्रभावी चित्र आले आहे. महानगरातील अक्राळविक्राळ गतीची अतिशय सजीव चित्रणे आली आहेत. कामगार सर्वहारा वर्गाच्या घुसमटीचा आणि गुदमरलेपनाचा त्यास संदर्भ*

आहे. नवभांडवली अर्थव्यवस्थेचा आणि त्याच्या लाभार्थी चकमकीत दुसऱ्या आणि हद्दपारीच्या वाटेवरील समूहजगाचे हे चित्रण आहे. (रणधीर शिंदे :२०१७ :७०) भोवतालच्या जगाने निर्माण केलेल्या विविध शक्यतांना कवेत घेतानाच त्या शक्यतांना कथेच्या माध्यमातून अभिव्यक्त करणारे जयंत पवार हे नव्वदोत्तर कालखंडातील एक आश्वासक कथाकार आहेत. त्यांची ‘तर्काच्या खुंटीवरून निसटलेले रहस्य’ ही ‘मुक्त शब्द’ या नियतकालिकात प्रकाशित झालेली कथा या अनुषंगाने पाहण्यासारखी आहे.

नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथांमध्ये जुन्या-नव्या व्यवस्थांच्या सत्वशून्यतेतून माणसाच्या वाट्याला येणारे एकाकीपण, पात्रांनी परात्म होण्यास दिलेला नकार, कृषिसंस्कृतीपासून दूर जाऊन शहरी संस्कृती स्वीकाराव्या लागलेल्या पात्रांना अनुभवायला येणारे तुटलेपण, सामाजिक रुढींच्या विळख्यात अडकून पडल्याने परात्मा झालेल्या पात्रांचे दुःख आणि कलावंतापासून ते जागतिक राजकारणापर्यंत पसरलेली उच्च स्तरावरील दांभिकता, ही दांभिकता ओळखूनही कृती करू न शकल्यामुळे संवेदनशील व्यक्तींना येणारी हतबलता आदी घटकांनी बंदिस्त केलेल्या संहितेला नव्वदोत्तरी मराठी कथा वेगवेगळया नव्या शक्यतांधून आविष्कृत करत असलेली दिसून येते.

५.३ **आशयाची मोडतोड करणे :-**

नव्वदोत्तरी मराठी कथेतून आधीच्या कालखंडाप्रमाणे कथेतून रूढार्थाने अभिव्यक्त होणाऱ्या आशयाची मोठ्या प्रमाणात प्रयोगशीलतेच्या नावाखाली मोडतोड झालेली दिसून येते. कादंबरीतून ज्याप्रमाणे शैलीच्या मागणीप्रमाणे आशयाला मोल्ड केले जाते, अगदी त्याच प्रमाणे नव्वदोत्तर

मराठी कथेतूनही शैलीच्या मागणी नुसार आशयाला मोल्ड केले जात असल्याचे दिसून येते.

नव्वदोत्तर मराठी कथाकार आशयाची विविधांगी रचना आपल्या कथांच्या माध्यमातून अभिव्यक्त करू पाहतात. *कुटुंब, समाज व संस्कृती यांच्याविषयी कळकळ असणारे व व्यक्तीच्या सुखदु:खाविषयी आस्था बाळगणारे नव्वदोत्तरी लेखक नव्या-जुन्या सामाजिक, सांस्कृतिक आव्हानांना जी कथारूपे देत आहेत व कथानकापासून ते निवेदनापर्यंत अनेक कथाघटकांमध्ये जे प्रयोग करत आहेत ते काळाला आणि कथाशायला अनुरूप असे आहेत.* (भारती निरगुडकर :२०१३:८८) नव्वदोत्तर कथाकार भोवतालच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांना कथाशयात गुंफतानाच त्या कथाशयाला नव्या आणि आश्वासक रूपात बंदिस्त करताना दिसतात. कथाशयाला नवनव्या शक्यतांमध्ये बंदिस्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे नव्वदोत्तर मराठी कथा एका वेगळया कथाविषयांनी समृद्ध झालेली दिसून येते.

५.४ निवेदनाच्या अनेक शक्यतांचा अवलंब करणे:-

नव्वदोत्तर मराठी कथा नैकरेषीय निवेदनाच्या शक्यातांना कवेत घेतानाच त्यातून एक संपन्न अनुभव आपणासमोर मांडताना दिसते. *नव्वदोत्तर मराठी कथाकारांच्या कथेतील निवेदक कथेत शोकात्म भाव निर्माण करण्यासाठी पात्रांचा विशिष्ट स्वभावधर्म कल्पितात. काहीवेळा पात्रांठायी वसणारा आत्मशोधाचा ध्यासच त्यांच्या वेदनेचे मूळ बनताना दिसतो. माणसाच्या स्वभावगुणधर्माबरोबरच नातीगोती, व्यक्तींचे परस्परांशी असणारे भावबंध, एकमेकांना समजून न घेण्याची त्यांची वृत्ती,यातून त्यांच्या वाट्याला येणारा एकटेपणा, इत्यादी गोष्टी मानवी जीवनात कशाप्रकारचे दु:खभोग*

आणतात याकडेही त्यांचे निवेदक लक्ष वेधून घेतात. (भारती तेंडूलकर : २०१३:१६८) नव्वदोत्तर मराठी कथाकार एक संपन्न जीवनानुभव आविष्कृत करतानाच त्या अनुभवातून वाट्याला येणारी दु:खमयता अत्यंत टोकदारपणे आविष्कृत करताना दिसून येतात.

नव्वदोत्तर मराठी कथाकार आपल्या कथाशयाला प्रभावीपणे आविष्कृत करण्यासाठी विभिन्न निवेदनाच्या पद्धती आणि निवेदकाच्या शक्यता निर्माण करताना दिसतात. प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी निवेदकांनी आजची कथा काळाची समीकरणे जुळविण्याचा प्रयत्न करताना दिसते. समकाळाने निर्माण केलेल्या विविध प्रश्नांना जसेच्या तसे कथेतून प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न अलीकडच्या कथाकारांकडून होताना दिसतो.

नव्वदोत्तर कालखंडातील जयंत पवार आणि सतीश तांबे हे महत्त्वाचे कथाकार आहेत. या दोन्ही कथाकारांनी निवेदनाच्या अनेक शक्यता वापरून आपल्या कथा वैशिष्ट्यपूर्ण बनविल्या आहेत. *लौकिकातीलव्यक्तीला त्याच्या लौकिकातील ओळखीसह कथांतर्गत वास्तवात पात्ररूप देणारा रचनाबंध सतीश तांबे आणि जयंत पवार यांच्या कथेत साकार झाला आहे. त्यामुळे कल्पित आणि वास्तव यांचा एक अर्थपूर्ण खेळ कथांतर्गत वास्तवात उभा केला जातो. जयंत पवार यांच्या 'छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र' या कथेच्या शेवटी आलेल्या तळीटीपेत कथेच्या निवेदकाचा मृत्यू झाला आहे याचे सूचन करणारा पूर्णपणे वेगळा निवेदक साकार झालेला दिसतो. कथेचा निवेदक वेगळा आणि कथा संपल्यानंतर कथेच्या निवेदकाचा मृत्यू झाला हे सांगण्यासाठी येणारा निवेदक वेगळा, असा दुहेरी निवेदनाचा खेळ हे 'छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र' या कथेचे वैशिष्ट्ये म्हणता येईल.*

'छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र' तसेच 'एका रोमहर्षक लढ्याचा गाळीव इतिहास' या कथांचे निवेदन करताना जयंत पवार यांनी सिनेतंत्राचा वापर करणारी निवेदनशैली उपयोजिली आहे. काही वेळा जयंत पवारांच्या कथेतील तृतीय पुरुषी निवेदक नात्यागत सूत्रधाराच्या भूमिकेत जाऊन कथ्यवस्तूचे निवेदन करतो. आणि हे निवेदन दीर्घ रंगसूचनांच्या घट्ट गुंफलेल्या साखळीच्या स्वरूपाचे असते. निवेदकाने गर्भित वाचकापेक्षा गर्भित श्रोता आणि गर्भित प्रेक्षक गृहीत धरून केलेले निवेदन असे या निवेदनाचे स्वरूप आहे. अशा प्रकारच्या निवेदनशैलीमुळे, मराठी साहित्यविश्वात नाटककार म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या जयंत पवार यांच्या कथेतील निवेदकाचे कथन हे दाखविण्याकडे अधिक प्रमाणावर झुकले आहे असे म्हणता येते. (शीतल पावसकर-भोसले : २०१३:१०५) निवेदनाच्या वेगवेगळया शक्यतांना आपल्या कथेच्या आवश्यकते नुसार उपयोगात आणणारे जयंत पवार हे नव्वदोत्तर कालखंडातील त्यामुळेच सर्वात यशस्वी आणि वाचनीय लेखक आहेत असे आवर्जून म्हणता येते.

५.५**आशयाचे केंद्र नाकारणे :-**

नव्वदोत्तर कालखंडातील कथाकारांच्या कथांतून एका ठराविक, रूढ कल्पनांना नाकारून कथा लिहिली गेल्याचे आढळून येते. पारंपरिक पद्धतीने निर्माण केलेल्या, मळलेल्या वाटांवरून नव्वदोत्तर मराठी कथा जात नसल्याचे आढळून येते. नव्वदोत्तर मराठी कथा स्वतःचा वेगळा मानदंड निर्माण करतानाच ती रूढीबाज आशयाचे केंद्र नाकारत जाताना दिसते.

नव्वदोत्तर मराठी कथा आशयाला व्यापकतेने कवेत घेतानाच त्या आशयाला ओपन एन्डेड ठेवताना दिसते. त्या आशयाची विविधांगी रूपे

आपणाला अनुभवयास येताना दिसतात. ‘किरण येले’ या अलीकडच्या काळातील कथाकाराने त्याच्या ‘मोराची बायको’ या कथासंग्रहातून आशयाचे केंद्र नाकारत एक वेगळा जीवनानुभव रेखाटलेला दिसून येतो. *अगदी अलीकडच्या काळात, मराठी कथेचे क्षितिज विस्तारणारे जे मोजके कथालेखक स्वतःची वैशिष्ट्ये घेऊन दर्जेदार कथालेखन करीत आहेत, त्यामध्ये किरण येले यांचे नाव घ्यावे लागते. कथा आणि कविता या दोन्ही प्रांतांमध्ये किरण येले यांनी दुर्मिळ असे दुष्कर काही सांगण्यासाठी स्थितीस्थापकत्व साधणारी लवचिक आणि जमिनीखालील आगती पेटवू शकणारे भुयार खोदण्याची क्षमता असणारी तीक्ष्ण लेखणी लेखकाजवळ असावी लागते. त्याच्या देहातील अतिसूक्ष्म रक्तवाहिन्या सर्वकाळ तप्त आणि वाहत्या असाव्या लागतात.*

विषयनिवडीपासून संपूर्ण बजावणीपर्यंत किरण येले यांचा जो कथाप्रवास चालतो, त्याला उत्तम सामाजिक ग्रहणशक्तीचे अधिष्ठान लाभलेले आहे. त्यांच्या कथेतील पात्रे सर्वसामान्य स्तरावरची आणि विशिष्ट परिस्थितीत कुचंबलेली,असहाय्य असली, तरी ती काठाला लागण्यासाठी सकारात्मकतेने धडपडताना दिसतात. एखाद्या पीतस्फटीकातून पिवळ्या रंगाच्या असंख्य छटा निर्माण होतात,तसा विविध स्तरांवरील माणसांच्या, स्त्री-पुरुषांच्या कथा सांगणारा ‘मोराची बायको’ हा कथासंग्रह एक अनोखा ‘टोपाझ’ आहे. (आनंद अंतरकर : २०१८:मलपृष्ठावरून उद्धृत) विशिष्ट आशयाचे केंद्र नाकारणारी, घाटाचे विविध प्रयोग करणारी किरण येले यांची कथा त्यामुळेच सर्वार्थाने नावीन्यपूर्ण ठरताना दिसते. समकाळाने मानवी जगण्यातील वाढवून ठेवलेली गुंतागुंत आणि त्यामुळे एकूणच जिथेतिथे संभ्रमाचे निर्माण झालेले वातावरण आणि त्यामुळे सामान्य माणसाची जगण्यासाठी सुरु असलेली फरफट किरण येले यांची नव्वदोत्तर कथा अत्यंत ताकदीने चित्रित करताना दिसून येते.

जागतिकीकरणाने शिक्षण, नोकरी,व्यापार या सर्वच गोष्टींमध्ये अस्थिरता निर्माण केलेली आहे. मानवी नातेसंबंधसुद्धा यातून सुटलेले नाहीत. नात्यांमध्ये एकप्रकारचा साचलेपणा येवू पाहतो आहे आणि त्यामुळे माणूस माणसापासून दुरावला गेलेला आहे. माणसाच्या जगण्यातील दिवसेंदिवस वाढत असलेला अविश्वास माणसाचे जगणेच उध्वस्त करत चालला आहे. किरण येलेंची कथा यावर फार गंभीरतेने भाष्य करते.

५.६छपाईच्या नव्या शक्यतांचा अवलंब करणे :-

जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावाने सामान्य माणसाचे जीवन कमालीचे आंतर्बाह्य बदलून गेलेले आहे. नव्वदोत्तर मराठी कथाही याला अपवाद नाही. नव्वदोत्तर कालखंडात वस्तूच्या अंतरंगापेक्षाही त्याच्या बाह्यरंगालाही तितकेच किंबहुना जास्त महत्त्व आलेले दिसून येते. बाजारपेठेत तुम्ही जो माल विकायला आणणार आहात तो अत्यंत सुबकतेने सजविलेला असलेला हवा ही इथल्या मार्केटींगची महत्त्वपूर्ण गरज असल्याने त्या पद्धतीने वस्तू सादर करताना ती कशी आकर्षक दिसेल याची परिपूर्ण काळजी घेतली जाते. नव्वदोत्तर मराठी कथाही तिच्या सादरीकरणाच्या बाबतीत अत्यंत सजग असलेली दिसून येते. छपाईच्या विविध तंत्राचा वापर करून आशयाच्या बळकटते बरोबरच ती कथा वाचकाला वाचताना जास्तीत जास्त सोयीची, आकर्षक आकारातील कशी वाटेल याची आवर्जून काळजी घेतली गेलेली दिसून येते.

उदा. *वेडीवाकडी स्वप्नं पडणारा तो कोण आहे ? कैदी आहे ? हे त्याचे संभ्रम आहेत ?बिग बँगनंतरच्या परिस्थितीसारखा उभारलेला सेट, प्रकाशाने डोळे दिपणारे. आणि त्याचबरोबर कृष्णविवरासारखा अंधार. सगळं तसंच. जणू एक महामोठ्ठा काळा तलाव. तो लटकतोय एका वृक्षाला. जणू तो एखादं फळ*

असावा, किंवा पान. त्याच्याभोवती बुळबुळीत असा द्राव. तो जिथे आहे, त्याच्यासाठी तो एखादा ग्रह किंवा तारा किंवा स्फोट झालेला नेब्युलाय. तो हिंदकळतोय. (प्रणव सखदेव :२०१७ :१७२) अशा प्रकारे छपाईच्या नव्या शक्यतांचा कथेच्या रूपबंधात अवलंब करून वाचकांना कथेकडे आकृष्ट तर केले जातेच पण त्याबरोबरीने कथेच्या आशयाला नावीण्यपूर्णता मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. *जगण्यातल्या ताणांचा, पेचांचा-गुंत्यांचा आणि प्रश्नांचा सखोल वेध घेणाऱ्या, वास्तव-कल्पित व मिथककथा यांच्या बांधणीतून तयार झालेल्या कथा* (प्रणव सखदेव :२०१७ : मलपृष्ठावरून उद्धृत) असे प्रणव सखदेव यांच्या कथांचे वेगळेपण अधोरेखित करता येते. कथेच्या आशयासोबातच ‘कथा प्रस्तुतीकरण’ या घटकासही नव्वदोत्तर कालखंडातील कथेत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे असे यावरून आवर्जून म्हणता येऊ शकते.

५.७ **कथेमध्ये शक्यता कवितेच्या :-**

नव्वदोत्तर कालखंडातल्या कथा निर्मितीच्या शक्यतांमध्ये मोठ्या प्रमाणात नाविण्यपूर्णता जोपासली गेलेली दिसून येते. कथेच्या रूपबंधला एका विशिष्ट माध्यमातून, पारंपरिक पद्धतीने सादर न करता मराठी कथाकार तिच्या स्वरूपात आंतर्बाह्य बदलांना स्थान देताना दिसून येतात. पूर्वीच्या कथा निर्मितीच्या टप्प्यांना आहे तसे पुढे घेऊन जाण्याच्या ऐवजी काळाशी सुसंगत असे बदल करण्यासाठी ही कथा उत्सुक असलेली दिसून येते. त्याचाच भाग म्हणून की काय, नव्वदोत्तर मराठी कथा कवितेशी संधान सांधू पहाते. अनेक कथाकारांच्या कथा या काव्यमय झालेल्या तर दिसून येतातच पण, त्याबरोबरच काही कथा या सरळ सरळ कवितेलाच प्रतिबिंबित करताना दिसतात.

उदा. प्रणव सखदेव यांच्या ‘नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य’ या कथासंग्रहातील याच शीर्षकाच्या कथेची सुरूवात कशी काव्यमय झालेली आहे ते पहा,

झटकन डोळे उघडतात तेव्हा अंधार. काळाकुट्ट. तो आहे जणू एखाद्या अंधारकोठडीतला कैदी. त्याला पडताहेत स्वप्नं, वेडीवाकडी, ज्यामुळे त्याचे डोळे उघडलेत सताड.

त्याला होतोय संभ्रम की त्याला जे दिसलं ते खरंय की खोटंय?

अचानक एक प्रकाशमान प्रभा.

जणू स्फोट झाल्यानंतर एखाद्या ताऱ्याचा, जसा उजळून निघतो आसमंत.

जणू बिग बँगनंतरच्या परिस्थितीचा तिथे सेट असावा उभारलेला.

त्याचे डोळे दिपतात. तो लटकतोय. असं वाटतंय त्याला की,

तो लोंबकळतोय. तो अडकलाय किंवा जोडला गेलाय कशालातरी.

त्याच्या भोवती बुळबुळीत द्रव आहे. चिकट. त्यात हिंदकळतोय.

त्याला वाटतंय, तो कोणत्यातरी ग्रहावर किंवा ताऱ्यावर आलाय.

तो आजूबाजूला पाहतो. त्याला अंधारच अंधार दिसतो,

समुद्रासारखा अपरंपार, क्षितिजापार....(प्रणव सखदेव :२०१७ :१२४,१२५)

एखाद्या मुक्त छांदात्मक दीर्घ काव्याची अनुभूती घ्यावी तत्सम नव्वदोत्तर कथेतून बऱ्याचदा आपणाला कवितेच्या शक्यता अनुभवयास येतात. कथा आणि कविता यांच्या अभिव्यक्तीचे मार्ग भिन्न आहेत, शैली भिन्न आहे. असे असूनही नव्वदोत्तर कथेतून आपणास मोठ्या प्रमाणात कवितेच्या रूपबंधाशी साधर्म्य दाखवणारी गोष्ट अनुभवयास येताना दिसते. काव्यात्मकता हा नव्वदोत्तर कथेचा एक महत्त्वाचा गुणधर्म होवू पाहतोय. रूढ कथेचे रूपबंध नाकारणे एवढ्या मर्यादित हेतूंनी नाही तर नव्वदोत्तर कथेचीच स्वयं त्या माध्यमातून व्यक्त

होण्याची धारणा त्यातून व्यक्त होताना दिसते. जी निश्चितच एक वेगळी उपलब्धी आहे असे म्हणता येते.

५.८ गद्याला व्याकरणापासून मुक्त करणे :-

नव्वदोत्तर मराठी कथेची सगळयात आवर्जून लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या कालखंडातल्या कथेने रूढार्थाने पारंपरिक कथेने सांभाळलेल्या गद्यमयतेच्या संकल्पनेला पूर्णतः व्याकरणिक संकल्पनांपासून मुक्त केले. कथेला सुरूवातीपासून शेवटपर्यंत एकाच गद्यमयतेची जी झालर पारंपरिक कथेने पांघरून ठेवलेली होती, ती या काळात जवळ जवळ सर्वच कथाकारांनी झुगारून देवून नवनवीन संकल्पनांची रेलचेल या कालखंडातल्या कथांमध्ये झालेली दिसते. स्त्री कथाकारांच्या कथाही यामध्ये मागे नव्हत्या असे आवर्जून म्हणता येईल. या अनुषंगाने नीरजा यांच्या कथांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. *नीरजा यांच्या कथांमध्ये स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंधाबरोबरच एकूण मानवी नात्यांमधील सत्तारुपाचा वेध घेतलेला आहे. स्त्रीचे दुःख, व्यवस्थेने, पारंपरिक चौकटीने दाबून टाकलेल्या तिच्या सहजप्रेरणा, त्यांची छोटी-छोटी स्वप्ने,यांचे चित्रण विशिष्ट समाजघटकांपुरतं मर्यादित राहत नाही. व्यक्ती आणि समष्टीच्या चित्रणाचे एक प्रकारचे संतुलन त्यांच्या कथांमध्ये दिसते. मुख्य पात्रांच्या मनोव्यव्हारांचे सूक्ष्म चित्रण करतानाच अवतीभवतीचे सामाजिक, आर्थिक घटकांचे सूचक संदर्भ लेखिका त्यात मिसळत जाते. आशयसूत्रांचे वैविध्य आणि गद्याला व्याकरणापासून मुक्त करणे हे त्यांच्या कथांचे बलस्थान आहे. नायक-नायिकांच्या अवतीभवती निर्माण झालेली पूरक पत्रे मात्र बऱ्याचदा, पुरेसे व्यक्तित्व न मिळाल्याने क्षीण व्यक्तिरेखा म्हणूनच आपल्या लक्षात राहतात.* (अरुणा ढेरे :२०१४ : एकतीस) पारंपरिक संकेतांना धक्का देण्याच्या संकल्पनेतूनच कथेतील गद्याला व्याकरणिक चौकटीत

अनावश्यकरित्या बांधून ठेवण्यापेक्षा मुक्त संकल्पनांचा वावर आणि स्वातंत्र्य नव्वदोत्तर कथांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्याचे निरीक्षण येथे आवर्जून नोंदवावेसे वाटते.

५.९ **अनेक भाषांचा वापर एकाच अवकाशात :-**

समकाळाला जसेच्या तसे आविष्कृत करणारी भाषा हे नव्वदोत्तर कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानता येईल. रूढ अर्थाने फक्त प्रमाण मराठी भाषाच या काळातील कथांना पुरेशी वाटत नाही तर, कथेच्या पर्यावरणाशी सुसंगत असणारी बोली, हिंदी,इंग्रजी, संस्कृत आणि आवश्यकता भासल्यास परदेशी भाषांचाही मुक्त वापर आणि वावर नव्वदोत्तर मराठी कथेमध्ये झालेला पहावयास मिळतो.

भाषेतून येणारी निवेदनशैली आणि संवादात्मकता एका वेगळ्या अनुभूतीने वाचकांना थक्क करून जाते. 'मोनिका गजेंद्रगडकर' या नव्वदोत्तर लेखिकेच्या कथांचा या दृष्टीने विचार करणे आवश्यक वाटते. त्यांच्या कथांमध्ये हिंदी आणि इंग्रजीचा भाषांचा कथेतील आशयाच्या मागणीनुसार मुक्तपणे वापर झालेला दिसून येतो. उदा. त्यांच्या 'शरीर' या कथेतील प्रस्तुत हिंदी भाषिक संवाद पाहुयात, *"कभी लागता है, मर जाऊँ मैं...मर जाना यही मेरेको अच्छी जिंदगी मिलना हैं...मुमताज के अब्बू चल बसे, दो लड़कियों की ज़िम्मेदारी मेरे सिर पर-एक लडकी तो गयी-ख़तम किया खुदको, ना किसी का खयाल आया मन में उसके. और ये सुलताना, हरामी! उसका ध्यान भटक जो गया है-एक हिंदू लाडके के साथ घूमती फिरती है साली! बीच में उसके साथ गुल खिलाकर पेट से भी रही थी हरामी!"* (मोनिका गजेंद्रगडकर :२०१२ : ५) कथेच्या आशयाची आवश्यकता विचारात घेऊन अत्यंत नैसर्गिक वाटणाऱ्या हिंदी किंवा तत्सम

भाषांचा समावेश त्यांच्या कथांत इतक्या बेमालूमपणे झालेला दिसून येतो की आपण मराठी कथाच वाचत आहोत याचा विसरही कधीकधी होतो. परंतु ती त्या कथेची अत्यंतिक गरज असते हे ही विसरून चालत नाही.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्याच 'धर्म' नावाच्या कथेत आलेला हा एक इंग्रजी- मराठी मिश्रित संवाद पाहुयात, *"आय नो, यू आर इन लव विथ अ हँडसम गाय! मग असं करेज येणारच...आणि तुम्हां मुलांना हवं असणारं स्वातंत्र्य...त्याची नशा तर बेभानच करणारी असते. आमच्याकडे या स्वातंत्र्यासाठी केवढी किंमत आम्ही मोजतो. माझ्या पिढीनेही ती मोजली आहे. पाहते आहेस नं माझा लोन्लीनेस! माय ओन्ली पेन इज लोन्लीनेस! नो फॅमिली, नो बाँड्स!"* (मोनिका गजेंद्रगडकर :२०१२ : १४३) कथेच्या व्यापक अवकाशात मानवी संवेदनांना शब्दरूप देताना भाषा हा एका अर्थाने दुय्यम (Second) भाग होऊन भावना आणि संवेदना यांना मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेत मध्यवर्ती स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

नव्वदोत्तर असे अनेक कथाकार आहेत त्यांच्या जगण्याची भाषा हीच आता साहित्याची पर्यायाने अभिव्यक्तीची भाषा होवून गेलेली आहे. काळाने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांना भिडताना नव्वदोत्तर लेखकांना बहुभाषिक व्हावे लागते आणि ती त्यांची नैसर्गिक गरज असलेली दिसून येते. भाषेची सरमिसळ प्रामुख्याने महानगरीय कथाकारांच्या कथांमध्ये आढळून येणारी वैशिष्ट्यपूर्णबाब आहे. कथेच्या आशय आणि अभिव्यक्तीची गरज म्हणून नव्वदोत्तर कथाकार कथेच्या एकाच अवकाशात अनेक भाषांचा कौशल्याने वापर करत असलेले दिसून येतात.

५.१० फक्त संवाद किंवा फक्त वर्णन- परिच्छेदाला नकार :-

नव्वदोत्तर मराठी कथांचा आणखी एक स्थायीभाव सांगता येईल आणि तो म्हणजे नव्वदोत्तर मराठी कथेत फक्त संवाद किंवा फक्त वर्णने आढळून येत नाहीत तर एका नवीनच नैकरेषीय निवेदनपद्धतीची कथा आकारात असलेली दिसून येते. ज्यातून संवाद, वर्णने आणि वैशिष्ट्यपूर्ण परिच्छेदांचा समावेश असलेला दिसून येतो.

अलीकडेच प्रकाशित झालेल्या गणेश मतकरी यांच्या ‘कदाचित’ या कथासंग्रहातील ‘व्हिसलरची आई’ या कथेतील पुढील निवेदन एका अर्थाने वरील मुद्याला पुष्टी देणारे आहे. ते कसे ते बघा, *“मी सव्वाबाराला मेन गेटपाशी पोचलो तेव्हा लीना तिथेच उभी होती. गेट लॉक्ड होतं, पण माझं इथल्या सिक्युरिटीशी बरं होतं. तो दार उघडायचा नाही, पण कोणी कंपाऊंडवरून उडी मारली तर दुर्लक्ष करणं त्याच्या हातात होतं.*

“बोल” मी दरवाजाच्या आतल्या बाजूलाच उभा राहून आवाजात शक्य तेवढा कोरडेपणा आणायचा प्रयत्न करत म्हणालो.

“व्हाय डोन्ट यू कम आऊटसाईड ?” ती म्हणाली.

“कशाला ?”

“जस्ट” मग म्हणाली, “फॉर ओल्ड टाईम्स सेक ?”

खरं म्हणजे मला जायचं नव्हतं. इतक्या दिवसांनी मी हा चॅप्टर बऱ्यापैकी क्लोज करत आणला होता. त्यात मला तो पुन्हा किलकिला करायचा नव्हता. त्यात ही काय सांगणार होती कोणाला माहीत. पण मनात एक्साईटमेन्ट होती, जी जागेवर बसू देईना.” (गणेश मतकरी :२०१८ :८९) प्रस्तुत कथेतील या प्रसंगातून एकूणच नव्वदोत्तर कथेच्या बदलत्या रूपबंधाची कल्पना आपणास येताना दिसून येते. फक्त संवाद, वर्णने किंवा निवेदनांनाच या कथांमध्ये

स्थान नाही तर एक सलग अशा आत्मचिंतनपर लेखनांनीही या कथा बंदिस्त झालेल्या दिसून येतील. *गणेश मतकरी यांच्या कथांबाबत आणखी एक विशेषत्वाने जाणवतं, ते म्हणजे या कथांमधले घटना-प्रसंग रोजच्या शहरी जीवनात घडणारे - 'मंडेन' आहेत. त्यात मोठी नाट्यमयता नाही किंवा भव्य-दिव्यता वा दुःख नाही. पण तरी त्यात एक 'गोष्ट' आहे, जी तेच ते शहरी जीवन जगणाऱ्या माणसाची आहे, त्याच्या ताण्याबाण्याची आहे, त्याच्या लहान-मोठ्या समस्यांची आहे. जसं की, 'चूक' या कथेत शाळेत होणारी मारामारी हा साधासा, नेहमी घडणारा प्रसंग प्रमुखस्थानी आहे. पण या घटनेकडे पाहण्याचे चार वेगवेगळे दृष्टिकोन जेव्हा आपल्यासमोर येतात, तेव्हा या साध्याशा घटनेला असलेले विविध कंगोरे आपल्या पुढ्यात येतात. चार निवेदकांच्या स्वतंत्र निवेदनातून ही कथा पुढे सरकत जाते आणि त्यामुळे तिला एक सिनेमॅटिक मूल्यही प्राप्त होतं.* (प्रणव सखदेव, संवाद, महाराष्ट्र टाईम्स पुरवणी, दि.३१/०३/ :२०१९ :४) नाट्यात्मकता, काव्यात्मकता यांच्या बरोबरीनेच नव्वदोत्तर मराठी कथा एका विशिष्ट निवेदनाच्या पद्धतींचा अवलंब करत असलेली दिसून येते. कथेच्या आशयाला उपयुक्त आणि जुळून येणारा रूपबंध निवडण्यासाठी नव्वदोत्तरी मराठी कथाकार सातत्याने नवनवीन प्रयोगांना आत्मसात करतानाच कथेला अधिकाधिक नैकरेषीय बनविण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

५.११ **कोणत्याही मजकुराला कथा म्हणणे :-**

नव्वदोत्तर मराठी कथेतील आणखी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधणे आवश्यक वाटते, ते म्हणजे नव्वदोत्तर मराठी कथेने स्वीकारलेल्या रूपबंधाने कथेच्या रूढ चौकटींच्या पलीकडे जाऊन आपली अशी स्वतःची एक शैली निर्माण केलेली दिसून येते. एकचएक शैलीला अनुसरण्यापेक्षा

सातत्याने नवनवीन शैलींना अनुसरण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथाकारांकडून होत असलेला दिसून येतो.

नव्वदोत्तर कथेचा रूढ म्हणून असा ठराविक आकृतिबंध असलेला दिसून येत नाही. आशयाच्या मागणीनुसार कथेचा रूपबंध ठरत असलेला दिसून येतो. त्यामुळे पारंपरिक कथेचा विचार करता, तिच्या आकृतीबंधाचा विचार करता नव्वदोत्तर कथेच्या एकूणच वेगळेपणामुळे तिला कथा म्हणावे का असा प्रश्न कधी कधी निर्माण होतो. कारण नव्वदोत्तर कथा कोणत्याही साचेबद्ध, रूढ संकेतांना आत्मसात करत साकारत जाताना दिसत नाही. कधी तिच्यात कवितेचे गुणधर्म दिसतात, कधी तिच्यात नाट्यात्मकता जाणवते, कधी फक्त संवादात्माकता तर कधी नुसतीच कथेच्या नावाखाली दीर्घ वर्णनेही आपणास कथेमध्ये पहावयास मिळतात. म्हणूनच नव्वदोत्तर कथेचा विचार करत असताना आपणास कोणत्याही मजकुराला कथा म्हणून मान्यता देण्याशिवाय पर्याय राहत नाही. रूढ अर्थाने कथेला सुरूवात असावी, मध्य असावा, शेवट असावा असे जे नियम ठरवून दिलेले आहेत ते नियम सर्वार्थाने नव्वदोत्तर कथेला लागू होत नाहीत किंबहुना आपणास ते नव्वदोत्तर कथेत दिसत नाहीत. त्यामुळे कोणत्याही मजकुरातून एक सलग अनुभव व्यक्त होण्यास नव्वदोत्तर कथा जास्त प्राधान्य देताना दिसते.

५.१२ **आशयाचं उर्ध्वपातन किंवा कथेची फिगर झिरो करणे :-**

नव्वदोत्तर कथेमधून आणखी एक गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे आशयाचं उर्ध्वपातन किंवा कथेची फिगर झिरो करणे हे होय. नव्वदोत्तर कथेमध्ये आशयापेक्षा मांडणीला म्हणजेच कथेच्या रूपबंधला जास्त महत्त्व असल्याचे दिसून येते. त्यामुळे एका बाजूला रूढ सांकेतिकता नाकारूनही या कथा कमालीच्या वाचनीय असल्याच्या दिसून येतात. शिल्पा कांबळे या

अलीकडच्या आघाडीच्या कथाकाराविषयी सतीश आळेकर एक महत्वपूर्ण निरीक्षण नोंदवताना म्हणतात, *"या काही सरळ चालींच्या कथा नाहीत. यात सुफळ संपूर्ण होणारी राजा-राणीची गोष्ट नाही. आर्थिक उदारीकरणानंतरच्या सामाजिक आणि राजकीय घुसळणीमधून आलेल्या या नागमोडी वळणाच्या, पण अत्यंत वाचनीय अशा कथा आहेत. वास्तव आणि अद्भुताचे मनोरंजक खेळ करीत या कथा वाचकाला खिळवून ठेवतात. या कथांची नजर आणि त्यातील अंतःस्तर यामध्ये निश्चित असे सामाजिक भान आणि ठाण अशी राजकीय भूमिका आहे."* (शिल्पा कांबळे :२०१८ : मलपृष्ठावरून उद्धृत) एकूणच कथामांडणीच्या संदर्भात नव्वदोत्तर कथाकार अत्यंत सजग असल्याचे दिसून येते. आशयाला नव्या आणि आकर्षक रुपात प्रस्तुत करण्यासाठी नव्वदोत्तर मराठी कथाकार कथेला आदर्श रूप प्राप्त करून देताना दिसतात.

कथामांडणीचा एक उत्तम नमुना म्हणून मिलिंद बोकील यांच्या कथांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. त्यांच्या 'झेन गार्डन' कथासंग्रहातील त्याच शीर्षकाच्या कथेची मांडणी पाहुयात,

"प्रवेशद्वारातून लहान मुलांचा घोळका आतमध्ये आला. आधी ती मुले इस्ततः उभी होती, पण त्यांच्या बरोबरच्या शिक्षिकेने मग त्यांची दोघादोघांची एक रांग केली. त्यांच्या अंगावर निळसर-राखाडी आणि पांढरे गणवेश होते. ती सगळी मग शिस्तीत, आवाज न करता, हळूहळू पुढे सरकू लागली.

"लहान मुलांना कशाला आणलंय इथं?" निरंजन म्हणाला. "त्यांना काही समजणार आहे का? ह्या लोकांचं काही समजत नाही."

"किती छान गुबरी गुबरी आहेत, बघ ना." ती म्हणाली, "सगळी एकसारखीच दिसतात. किती शिस्तीनं चालतायेत." (मिलिंद बोकील :२००० :२२८)

कथेच्या मांडणीतूनच कथाआशयाची गुंतागुंत निर्माण करणे आणि कथेशी

वाचकाला बांधून ठेवणे हे तत्त्व यातून समोर येताना दिसते. बोकीलांच्या कथेच्या मांडणीचे वेगळेपण सांगताना सुधा जोशी लिहितात, *"बोकीलांची कथा व्यक्तीवर केंद्रित झालेली असली, तिच्या जीवनातील पेचप्रश्न, माणसाचे एकाकीपण यांचे चित्रण करीत असली तरी तिचा संदर्भ व्यापक असतो; तिच्यात अर्थाची प्रसरणशीलता प्रत्ययाला येते. व्यक्ति आणि व्यक्ति तसेच व्यक्ति आणि समूह, समाज, परिसर यांच्यातील अनुबंधाचा, क्रियाप्रतिक्रियांचा शोध घेणारी ही कथा व्यक्तिगततेत बंदिस्त होत नाही. सामाजिक-सांस्कृतिक वास्तव, समूहाची संज्ञा, भौतिक परिसर, परंपरेचे संचित यांचे संदर्भ तिच्यात स्वभाविकातेनेच सामावले जातात. या कथेत सामाकालीनता आहे, तसाच मानवी प्रश्नांतल्या सनातनतेचाहीवेध आहे. तत्त्वचिंतनाचे परिमाण हे तिच्या अर्थवत्तेचे एक गमक आहे."* (सुधा जोशी:२०१९ :७१) मानवी जीवनातील शक्यतांचे विविधांगी दर्शन घडविण्यासाठी मिलिंद बोकील आणि एकूणच नव्वदोत्तर मराठी कथाकार आशयाबरोबरच रूपबंधालाही वैशिष्ट्यपूर्ण स्थान देत असलेले दिसून येतात, म्हणूनच बदलत्या काळात मराठी कथा एक सर्वांगसुंदर, वाचनीय रूप घेऊन साकार होताना दिसते.

५.१३ **निष्कर्ष :-**

एकूणच प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने नव्वदोत्तर कालखंडातील कथा कोणत्या प्रयोगशील घटकांनी समृद्ध झालेली आहे त्याविषयीचे निष्कर्ष आपणाला पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) समकालीन वास्तवातील माणसाचे जीवन शतखंडित वास्तवामध्ये विभागले गेलेले आहे. कथाकाराला हे वास्तव चिमटीत पकडण्यासाठी नवनवीन प्रयोगांचे सहाय्य घ्यावे लागत असलेले दिसून येते.

२) नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथांमध्ये जुन्या-नव्या व्यवस्थांच्या सत्वशून्यतेतून माणसाच्या वाट्याला येणारे एकाकीपण, पात्रांनी परात्म होण्यास दिलेला नकार, कृषिसंस्कृतीपासून दूर जाऊन शहरी संस्कृती स्वीकाराव्या लागलेल्या पात्रांना अनुभवायला येणारे तुटलेपण, सामाजिक रुढींच्या विळख्यात अडकून पडल्याने परात्मा झालेल्या पात्रांचे दुःख आणि कलावंतापासून ते जागतिक राजकारणापर्यंत पसरलेली उच्च स्तरावरील दांभिकता, ही दांभिकता ओळखूनही कृती करू न शकल्यामुळे संवेदनशील व्यक्तींना येणारी हतबलता आदी घटकांनी बंदिस्त केलेल्या संहितेला नव्वदोत्तरी मराठी कथा वेगवेगळया नव्या शक्यतांधून आविष्कृत करत असलेली दिसून येते.

३) नव्वदोत्तर कथाकार भोवतालच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांना कथाशयात गुंफतानाच त्या कथाशयाला नव्या आणि आश्वासक रूपात बंदिस्त करताना दिसतात. कथाशयाला नवनव्या शक्यतांमध्ये बंदिस्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे नव्वदोत्तर मराठी कथा एका वेगळया कथाविषयांनी समृद्ध झालेली दिसून येते.

४) नव्वदोत्तर मराठी कथाकार आपल्या कथाशयाला प्रभावीपणे आविष्कृत करण्यासाठी विभिन्न निवेदनाच्या कल्पना आणि निवेदकाच्या शक्यता निर्माण करताना दिसतात. प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी निवेदकांनी आजची कथा काळाची समीकरणे जुळविण्याचा प्रयत्न करताना दिसते. समकाळाने निर्माण केलेल्या विविध प्रश्नांना जसेच्या तसे कथेतून प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न अलीकडच्या कथाकारांकडून होताना दिसतो.

५) नव्वदोत्तर कालखंडातील कथाकारांच्या कथांतून एका ठराविक, रूढ कल्पनांना नाकारून कथा लिहिली गेल्याचे आढळून येते. पारंपरिक पद्धतीने निर्माण केलेल्या, मळलेल्या वाटांवरून नव्वदोत्तर मराठी कथा जात नसल्याचे आढळून येते. नव्वदोत्तर मराठी कथा स्वतःचा वेगळा मानदंड निर्माण करतानाच ती रूढीबाज आशयाचे केंद्र नाकारत जाताना दिसते.

६) नव्वदोत्तर मराठी कथाही तिच्या सादरीकरणाच्या बाबतीत अत्यंत सजग असलेली दिसून येते. छपाईच्या विविध तंत्राचा वापर करून आशयाच्या बळकटते बरोबरच ती कथा वाचकाला वाचताना जास्तीत जास्त सोयीची, आकर्षक आकारातील कशी वाटेल याची आवर्जून काळजी घेतली गेलेली दिसून येते.

७) नव्वदोत्तर कथेतून आपणास मोठ्या प्रमाणात कवितेच्या रूपबंधाशी साधर्म्य दाखवणारी गोष्ट अनुभवयास येताना दिसते. काव्यात्मकता हा नव्वदोत्तर कथेचा एक महत्त्वाचा गुणधर्म होवू पाहतोय. रूढ कथेचे रूपबंध नाकारणे एवढ्या मर्यादित हेतूंनी नाही तर नव्वदोत्तर कथेचीच स्वयं त्या माध्यमातून व्यक्त होण्याची धारणा त्यातून व्यक्त होताना दिसते जी निश्चितच एक वेगळी उपलब्धी आहे असे म्हणता येते.

८) पारंपरिक संकेतांना धक्का देण्याच्या संकल्पनेतूनच कथेतील गद्याला व्याकरणिक चौकटीत अनावश्यकरित्या बांधून ठेवण्यापेक्षा मुक्त संकल्पनांचा वावर आणि स्वातंत्र्य नव्वदोत्तर कथांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्याचे निरीक्षण येथे आवर्जून नोंदवावेसे वाटते.

९) समकाळाला जसेच्या तसे आविष्कृत करणारी भाषा हे नव्वदोत्तर कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानता येईल. रूढ अर्थाने फक्त प्रमाण मराठी भाषाच या काळातील कथांना पुरेशी वाटत नाही तर, कथेच्या पर्यावरणाशी सुसंगत असणारी बोली, हिंदी,इंग्रजी, संस्कृत आणि आवश्यकता भासल्यास परदेशी भाषांचा ही मुक्त वापर आणि वावर नव्वदोत्तर मराठी कथेमध्ये झालेला पहावयास मिळतो.

१०) नाट्यात्मकता, काव्यात्मकता यांच्या बरोबरीनेच नव्वदोत्तर मराठी कथा एका विशिष्ट निवेदनाच्या पद्धतींचा अवलंब करत असलेली दिसून येते. कथेच्या आशयाला उपयुक्त आणि जुळून येणारा रूपबंध निवडण्यासाठी नव्वदोत्तरी मराठी कथाकार सातत्याने नवनवीन प्रयोगांना आत्मसात करतानाच कथेला अधिकाधिक नैकरेषीय बनविण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

११) नव्वदोत्तर कथेच्या एकूणच वेगळेपणामुळे तिला कथा म्हणावे का असा प्रश्न कधी कधी निर्माण होतो. कारण नव्वदोत्तर कथा कोणत्याही साचेबद्ध, रूढ संकेतांना आत्मसात करत साकारत जाताना दिसत नाही. कधी तिच्यात कवितेचे गुणधर्म दिसतात, कधी तिच्यात नाट्यात्मकता जाणवते, कधी फक्त संवादात्माकता तर कधी नुसतीच कथेच्या नावाखाली दीर्घ वर्णनेही आपणास कथेमध्ये पहावयास मिळतात. म्हणूनच नव्वदोत्तर कथेचा विचार

करत असताना आपणास कोणत्याही मजकुराला कथा म्हणून मान्यता देण्याशिवाय पर्याय राहत नाही.

१२) नव्वदोत्तर कथेमधून आणखी एक गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे आशयाचं उर्ध्वपातन किंवा कथेची फिगर झिरो करणे हे होय. नव्वदोत्तर कथेमध्ये आशयापेक्षा मांडणीला म्हणजेच कथेच्या रूपबंधला जास्त महत्त्व असल्याचे दिसून येते. त्यामुळे एका बाजूला रूढ सांकेतिकता नाकारूनही या कथा कमालीच्या वाचनीय असल्याच्या दिसून येतात.

१३) एकूणच नव्वदोत्तर मराठी कथाकार आशयाबरोबरच रूपबंधालाही वैशिष्ट्यपूर्ण स्थान देत असलेले दिसून येतात, म्हणूनच बदलत्या काळात मराठी कथा एक सर्वांगसुंदर, वाचनीय रूप घेऊन साकार होताना दिसते.

❖ संदर्भ व टीपा

१) पाटणकर, वसंत:२०१७ :**साहित्यशास्त्र: स्वरूप आणि समस्या,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२) शिंदे, रणधीर :२०१७ :**जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य** (संपा. कोत्तापल्ले नागनाथ,भागात दत्ता):सायन प्रकाशन,पुणे

३) निरगुडकर, भारती :२०१३: नव्वदनंतरची कथा **, ललित-कथा विशेषांक,** मुंबई

४) तेंडुलकर, भारती :२०१३: नव्वदनंतरची कथा **, ललित-कथा विशेषांक,** मुंबई

५) पावसकर-भोसले,शीतल :२०१३: नव्वदनंतरची कथा **, ललित कथा विशेषांक,** मुंबई

६) अंतरकर, आनंद :२०१८: **मोराची बायको**:(किरण येले)**,** ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

७) विसपुते,गणेश:२०१५: **निळ्या दाताची दंतकथा**:(प्रणव सखदेव), मुंबई

८) ढेरे, अरुणा :२०१४:**स्त्री-लिखित मराठी कथा (१९५० ते २०१०),** पद्मगंधा प्रकाशन, पुणे

९) गजेंद्रगडकर, मोनिका :२०१२ :**शिल्प**: मौज प्रकाशन**,** मुंबई

१०) मतकरी, गणेश :२०१८:**(कदाचित) इमॅजिनरी**:मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई

११) सखदेव,प्रणव:२०१९: **संवाद, महाराष्ट्र टाईम्स पुरवणी**,पुणे

१२) आळेकर, सतीश:२०१९: **नऊ चाळीसची लोकल**: (शिल्पा कांबळे), शब्द पब्लिकेशन,मुंबई

१३) बोकील, मिलिंद :२०००:**झेन गार्डन**: मौज प्रकाशन**,** मुंबई

१४) जोशी,सुधा:२०१९:**मराठी कथा:१९४० ते २००० एक परामर्श**:मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई

प्रकरण सहावे

उपसंहार

....

मानवी जीवनाच्या अस्सल गाभ्याला स्पर्शून येणारी कथा ही मराठी साहित्यातील तत्कालीन आणि समकालीनही अनन्यता आहे. माणसाच्या जीवनाचे इतके विविधांगी आणि थक्क करणारे दर्शन कदाचितच इतर कुठल्या अभिव्यक्ती प्रकारातून अनुभवयास येताना दिसेल. काळ बदलताना माणसाच्या इच्छा, अपेक्षा आणि धरणांनाही तो आपल्या कवेत घेण्याचा यशस्वी प्रयत्न करताना दिसतो. नव्वदोत्तर कथाही माणसाच्या या बदलत्या धरणांना अंतर्बाह्य स्पर्शून येताना दिसते. माणूस हसतो म्हणजे काय?, माणूस रडतो म्हणजे काय? आणि माणूस सुखाच्या पाठीमागे ऊर फुटेपर्यंत धावतो म्हणजे काय? या साऱ्या प्रश्नांना भिडण्याचे काम नव्वदोत्तर कथा फार ताकदीने करते आहे असे प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या संशोधनातून अत्यंत आत्मविश्वासाने म्हणता येईल. प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या माध्यमातून 'नव्वदोत्तर मराठी कथेचा रूपबंध' तपासताना कोणकोणते निष्कर्ष हाती लागले ते साररूपाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लघुशोध प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात 'रूपबंध संकल्पना आणि स्वरूप' याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. कलाकृतीला विशिष्ट आकार प्राप्त होण्यासाठी तिच्यातील अंतर्गत घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. अंतर्गत घटकांच्या स्थाननिश्चीतीवरच त्या कलाकृतीला विशिष्ट रूपबंध प्राप्त होत असतो. साहित्याचा अनुभव घेण्याच्या प्रक्रियेतूनच तिचा विशिष्ट स्वभाव, गुणधर्म आपल्या मनावर प्रतिबिंब उमटवत असतात. कोणत्याही

साहित्य कलाकृतीचा रूपबंध काळाच्या बदलानुसार ठरत असतो. काळाच्या बदलत्या परिमाणांना सामावून घेण्याचा प्रयत्न प्रत्येक कलाकृती करत असते.

मराठी साहित्यात कलाकृतीला विशिष्ट आकार प्रदान करणारी संघटना म्हणून 'रूपबंध' ही संकल्पना वापरली जाते. एखादी कलाकृती कोणत्या घटकांच्या संयोगातून निर्माण झालेली आहे याविषयीची प्रक्रिया स्पष्ट करणारी संकल्पना 'रूपबंध' म्हणून ओळखली जाते.

साहित्य कलाकृतीला प्राप्त झालेला विशिष्ट 'घाट' हा त्या कलाकृतीचा एका अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण रूपबंधच असतो. कलाकृती अंतर्गत जी एक विशिष्ट सुसंघटना प्रस्थापित केलेली असते, जी एक घडण जोपासलेली असते त्याचाही समावेश 'रूपबंध' या संकल्पनेमध्येच होत असलेला दिसून येतो.

वाङ्मयीन कलाकृती साकारात असताना तिच्या अंतरंगात सामावलेल्या आशयाच्या क्षमतेवर, तिच्या कसावर जसा त्या कलाकृतीचा दर्जा अवलंबून असतो, तसाच त्या कलाकृतीच्या आशयाने अभिव्यक्त होताना कोणता 'रूपबंध' स्वीकारलेला आहे यावरही तिचा वेगळेपणा, तिच्यातील सक्षमपणा, नावीण्यापूर्णता अवलंबून असते.

साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकास कलाकृतीचा प्रकार निश्चित करण्याची अनुमती असते. परंतु कलाकृती कोणता आकार घेऊन अवतरणार आहे, हे बहुतांश वेळा त्या कलाकृतीने धारण केलेल्या रूपाबंधावर, तिच्यातील अंतर्गत घटकांवर अवलंबून असल्याचे ठामपणे म्हणता येते.

साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकास कलाकृतीचा प्रकार निश्चित करण्याची अनुमती असते. परंतु कलाकृती कोणता आकार घेऊन अवतरणार आहे, हे बहुतांश वेळा त्या कलाकृतीने धारण केलेल्या रूपाबंधावर, तिच्यातील अंतर्गत घटकांवर अवलंबून असल्याचे ठामपणे म्हणता येते.

लेखकाच्या निर्मितीप्रक्रीयेलाच जाणून घेण्याचा मार्ग म्हणून कलाकृतीच्या घाटाचा अर्थात रूपबंधाचा सूक्ष्मतर अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लेखकाची, त्याच्या लेखन प्रक्रियेची जडणघडण जाणून घेण्यासाठी त्याच्या रूपबंधाकडेच जावे लागते.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात 'नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे' याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे केवळ नावीन्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी, काळाचे भान असणारी आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

नव्वदोत्तर अनेक कथाकारांच्या कथांतून नागावलेल्या माणसाची चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. भोवताली कायम निर्माण होणाऱ्या दाहक अनुभवांतून आणि सर्वसामान्य माणसाच्या वास्तवाला छेद देण्याच्या सहनुभावातून नव्वदोत्तर कथा आकारास आलेली दिसून येते. मानवी जीवनाला सदैव वेढून राहिलेल्या दुःखमयतेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांकडून होताना दिसतो.

सामान्य माणूस आणि त्याच्या जीवनाची व्यवस्थेकडून होणारी शोकांतिका नव्वद नंतरच्या कालखंडातील कथाकारांच्या कथेतील आशयसूत्रांमधील एक महत्त्वाचा घटक असलेला दिसून येतो.

मानवी मूल्ये हीच समान नागरिकत्व, एकरूप समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची संकल्पना आहे, हे अनेक नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून आपणास अनुभवयास मिळते. माणूस आणि त्याला जगण्यासाठी पूरक असणारी मानवी मूल्ये नव्वदोत्तर कथाकारांच्या कथांतील आशयसूत्रे असलेली दिसून येतात.

प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात ‘नव्वदोत्तरी मराठी कथेची निवेदनशैली’ याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. नव्वदोत्तरी मराठी कथा समूहविषयक सहानुभवाच्या प्रेरणेतून निर्माण झाली आहे. अनोख्या निवेदन शैलीच्या द्वारे समूहमन आणि समूहजीवन यांना बांधून ठेवण्याचा, त्यांना सतत्याने स्पर्श करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी मराठी कथा करताना दिसते.

नव्वदोत्तर मराठी कथेच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असून त्याच्या व्यामिश्र जीवनानुभवाचा खोलवर वेध घेण्याच्या प्रयत्नातून मराठी कथा निर्मिली जाताना दिसते.

चिरंतन मानवी मूल्यांची जोपासना, दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाची निर्मिती या मूल्यांबाबत नव्वदोत्तरी मराठी कथा अत्यंत गंभीर असून या मूल्ययुक्त समाजनिर्मितीसाठी नव्वदोत्तरी मराठी कथा विशेष प्रयत्नशील असलेली दिसून येते.

व्यक्तीजीवनाकडून समाजजीवनाकडे प्रवास करणारी मराठी कथा अत्यंत सजग, सावध व समकालीन घटनांची साक्षेपाने नोंद करताना दिसून येते.

नव्वदोत्तर मराठी कथा भोवतालच्या वास्तवाचे अचूक आणि अस्सल भान व्यक्त करण्यासाठी कथेच्या निवेदनशैलीचा नेमकेपणाने उपयोग करताना दिसते.

लघुशोध प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात ‘नव्वदोत्तरी मराठी कथेच्या भाषिक वैशिष्ट्यांचा अभ्यास’ याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. नव्वदोत्तर मराठी कथा समकालीन सामाजिक व्यवस्थेची भाषा आणि कल्पनाशक्तीला जिवंत ठेवण्याचे काम करताना दिसून येते. अनेक भाषिक वैशिष्ट्यांना स्वतःमध्ये सामावून घेत नव्वदोत्तर कालखंडातील भाषा आत्मविश्वासाने मार्गक्रमण करताना दिसून येते.

नव्वदोत्तर कालखंडातील अनेक लेखक आपले भाषिक वेगळेपण जोपासताना जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांची सूक्ष्मपणे नोंदही घेताना आढळतात. वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांच्या माध्यमातून एखाद्या प्रसंगाचे, काळाचे नेमके चित्र आपल्या डोळयांसमोर उभारत जातात.

नव्वदोत्तर मराठी कथेत समाजभान अधिक टोकदारपणे प्रतिबिंबित होताना दिसते. नव्वदोत्तर कालखंडात माणूस शतखंडित वास्तवामध्ये विभागाला गेलेला दिसून येतो. मानवी वृत्ती-प्रवृत्तींमध्ये झालेल्या बदलांचे चित्रण करण्यास पारंपरिक भाषाविशेष वेगळ्या पातळीवरून विचार करता तोकडे पडत होते असे दिसून येते. नव्वदोत्तर मराठी कथेने हे तोकडेपण संपुष्टात आणतानाच भाषाविषयक विविध प्रयोगांच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण मांडणीच्या द्वारे मानवी जीवनानुभावांचे एक संपन्न भावविश्व साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडात झालेले दिसून येतो. म्हणूनच या कालखंडातील कथेची अभिव्यक्तीकरणाची भाषा सर्वार्थाने वेगळी आणि मानवी मनाचे तळ धुंडाळणारी असलेली दिसून येते. मानवी जगण्याचे विविधांगी दर्शन घडविणे हे तिचे सगळयात महत्त्वाचे लक्षण असलेले दिसून येते.

नव्वदोत्तर कालखंडातील कथालेखक मानवी जीवनानुभवांच्या बदलत्या समकालीन भयावह वास्तवाला अचूकपणे अधोरेखित करताना दिसतो. बाह्य वस्तुंच्या तृष्णेमुळे पृष्ठपातळीवर जीवनाला समृद्धी येण्यासारखे वाटणे परंतु अंतर्यामी माणसाचे समाजापासून, स्वतःपासून तुटत जाणे, एकाकी होऊन उरणे इत्यादी भावनांचा उत्कट आविष्कार वैशिष्ट्यपूर्ण शब्दानुभावांच्या माध्यमातून प्रस्तुत कालखंडातील कथा आश्वासकपणे मांडत असलेली दिसून येते.

आर्थिक उदारीकरनातून खुली झालेली जागतिक बाजारपेठ, आर्थिक सत्ता मिळविण्याची उपलब्ध झालेली मुबलक संधी, परंतु त्याच वेळी त्या संधीपर्यंत पोहोचण्यासाठी विविध क्षेत्रांत असलेली जीवघेणी स्पर्धा, या स्पर्धेत माणसाचे, त्याच्या शारीर, बौद्धिक कौशल्याचे झालेले टोकाचे 'वस्तुकरण', तसेच कोणत्याही गोष्टीचे बाजारीकरण होऊ शकते हे समकालीन समाजवास्तव व्यक्त करण्यासाठी नव्वदोत्तर कथालेखक भाषिक प्रयोगशीलतेचा कौशल्याने अवलंब करताना दिसतात.

लघुशोध प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात 'नव्वदोत्तरी मराठी कथेतील प्रयोगशीलता' याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. समकालीन वास्तवातील माणसाचे जीवन शतखंडित वास्तवामध्ये विभागले गेलेले आहे. कथाकाराला हे वास्तव चिमटीत पकडण्यासाठी नवनवीन प्रयोगांचे सहाय्य घ्यावे लागत असलेले दिसून येते.

नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथांमध्ये जुन्या-नव्या व्यवस्थांच्या सत्वशून्यतेतून माणसाच्या वाट्याला येणारे एकाकीपण, पात्रांनी परात्म होण्यास दिलेला नकार, कृषिसंस्कृतीपासून दूर जाऊन शहरी संस्कृती स्वीकाराव्या लागलेल्या पात्रांना अनुभवायला येणारे तुटलेपण, सामाजिक रुढींच्या विळख्यात अडकून पडल्याने परात्मा झालेल्या पात्रांचे दुःख आणि कलावंतापासून ते जागतिक राजकारणापर्यंत पसरलेली उच्च स्तरावरील दांभिकता, ही दांभिकता ओळखूनही कृती करू न शकल्यामुळे संवेदनशील व्यक्तींना येणारी हतबलता आदी घटकांनी बंदिस्त केलेल्या संहितेला नव्वदोत्तरी मराठी कथा वेगवेगळया नव्या शक्यतांधून आविष्कृत करत असलेली दिसून येते.

नव्वदोत्तर कथाकार भोवतालच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांना कथाशयात गुंफतानाच त्या कथाशयाला नव्या आणि आश्वासक रूपात बंदिस्त करताना दिसतात. कथाशयाला नवनव्या शक्यतांमध्ये बंदिस्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे नव्वदोत्तर मराठी कथा एका वेगळ्या कथाविषयांनी समृद्ध झालेली दिसून येते.

नव्वदोत्तर मराठी कथाकार आपल्या कथाशयाला प्रभावीपणे आविष्कृत करण्यासाठी विभिन्न निवेदनाच्या कल्पना आणि निवेदकाच्या शक्यता निर्माण करताना दिसतात. प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी निवेदकांनी आजची कथा काळाची समीकरणे जुळविण्याचा प्रयत्न करताना दिसते. समकाळाने निर्माण केलेल्या विविध प्रश्नांना जसेच्या तसे कथेतून प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न अलीकडच्या कथाकारांकडून होताना दिसतो.

नव्वदोत्तर कालखंडातील कथाकारांच्या कथांतून एका ठराविक, रूढ कल्पनांना नाकारून कथा लिहिली गेल्याचे आढळून येते. पारंपरिक पद्धतीने निर्माण केलेल्या, मळलेल्या वाटांवरून नव्वदोत्तर मराठी कथा जात नसल्याचे आढळून येते. नव्वदोत्तर मराठी कथा स्वतःचा वेगळा मानदंड निर्माण करतानाच ती रूढीबाज आशयाचे केंद्र नाकारत जाताना दिसते.

नव्वदोत्तर मराठी कथा ही तिच्या सादरीकरणाच्या बाबतीत अत्यंत सजग असलेली दिसून येते. छपाईच्या विविध तंत्राचा वापर करून आशयाच्या बळकटते बरोबरच ती कथा वाचकाला वाचताना जास्तीत जास्त सोयीची, आकर्षक आकारातील कशी वाटेल याची आवर्जून काळजी घेतली गेलेली दिसून येते.

नव्वदोत्तर कथेतून आपणास मोठ्या प्रमाणात कवितेच्या रूपबंधाशी साधर्म्य दाखवणारी गोष्ट अनुभवयास येताना दिसते. काव्यात्मकता हा नव्वदोत्तर

कथेचा एक महत्त्वाचा गुणधर्म होवू पाहतोय. रूढ कथेचे रूपबंध नाकारणे एवढ्या मर्यादित हेतूंनी नाही, तर नव्वदोत्तर कथेचीच स्वयं त्या माध्यमातून व्यक्त होण्याची धारणा त्यातून व्यक्त होताना दिसते जी निश्चितच एक वेगळी उपलब्धी आहे असे म्हणता येते.

पारंपरिक संकेतांना धक्का देण्याच्या संकल्पनेतूनच कथेतील गद्याला व्याकरणिक चौकटित अनावश्यकरित्या बांधून ठेवण्यापेक्षा मुक्त संकल्पनांचा वावर आणि स्वातंत्र्य नव्वदोत्तर कथांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्याचे निरीक्षण येथे आवर्जून नोंदवावेसे वाटते.

समकाळाला जसेच्या तसे आविष्कृत करणारी भाषा हे नव्वदोत्तर मराठी कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानता येईल. रूढ अर्थाने फक्त प्रमाण मराठी भाषाच या काळातील कथांना पुरेशी वाटत नाही तर, कथेच्या पर्यावरणाशी सुसंगत असणारी बोली, हिंदी,इंग्रजी, संस्कृत आणि आवश्यकता भासल्यास परदेशी भाषांचाही मुक्त वापर आणि वावर नव्वदोत्तर मराठी कथेमध्ये झालेला दिसतो.

नाट्यात्मकता, काव्यात्मकता यांच्या बरोबरीनेच नव्वदोत्तर मराठी कथा एका विशिष्ट निवेदनाच्या पद्धतींचा अवलंब करत असलेली दिसून येते. कथेच्या आशयाला उपयुक्त आणि जुळून येणारा रूपबंध निवडण्यासाठी नव्वदोत्तरी मराठी कथाकार सातत्याने नवनवीन प्रयोगांना आत्मसात करतानाच कथेला अधिकाधिक नैकरेषीय बनविण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

नव्वदोत्तर कथेच्या एकूणच वेगळेपणामुळे तिला कथा म्हणावे का असा प्रश्न कधी कधी निर्माण होतो. कारण नव्वदोत्तर कथा कोणत्याही साचेबद्ध, रूढ संकेतांना आत्मसात करत प्रत्यक्षात साकारत जाताना दिसत नाही. कधी तिच्यात कवितेचे गुणधर्म दिसतात, कधी तिच्यात नाट्यात्मकता जाणवते, कधी

फक्त संवादात्माकता तर कधी नुसतीच कथेच्या नावाखाली दीर्घ वर्णनेही आपणास कथेमध्ये पहावयास मिळतात. म्हणूनच नव्वदोत्तर कथेचा विचार करत असताना आपणास कोणत्याही मजकुराला कथा म्हणून मान्यता देण्याशिवाय पर्याय राहत नाही.

नव्वदोत्तर कथेमधून आणखी एक गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे आशयाचं उर्ध्वपातन किंवा कथेची फिगर झिरो करणे हे होय. नव्वदोत्तर कथेमध्ये आशयापेक्षा मांडणीला म्हणजेच कथेच्या रूपबंधला जास्त महत्त्व असल्याचे दिसून येते. त्यामुळे एका बाजूला रूढ सांकेतिकता नाकारूनही या कथा कमालीच्या वाचनीय असल्याच्या दिसून येतात.

एकूणच नव्वदोत्तर मराठी कथाकार आशयाबरोबरच रूपबंधालाही वैशिष्ट्यपूर्ण स्थान देत असलेले दिसून येतात, म्हणूनच बदलत्या काळात मराठी कथा एक सर्वांगसुंदर, वाचनीय रूप घेऊन साकार होताना दिसते.

ग्रंथ सूची

....

आधारभूत ग्रंथ

....

कथासंग्रह

१ फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, जयंत पवार,लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई,२०१०

२ वरणभात लोन्चा,कोण नाही कोन्चा,जयंत पवार,लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई,२०१३

३ शिल्प,मोनिका गजेंद्रगडकर,मौज प्रकाशन, मुंबई,२०१२

४ झेन गार्डन,मिलिंद बोकिल,मौज प्रकाशन, मुंबई,२०१५

५ रसातळाला ख.प.च., सतीश तांबे, अक्षर प्रकाशन, मुंबई

६ आलोक, आसाराम लोमटे, शब्द पब्लिकेशन,मुंबई,२०१५

७ ब्लॉगच्या आरश्यापल्याड, मनस्विनी लता रविंद्र,शब्द पब्लिकेशन,मुंबई,२०१६

८ बकऱ्याची बॉडी,समर खडस, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर,२०११

९ खिडक्या अर्ध्या उघड्या, गणेश मतकरी, समकालीन प्रकाशन,पुणे,२०१४

१० इन्सटॉलेशन्स, गणेश मतकरी, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस,मुंबई,२०१६

११ (कदाचित) इमॅजिनरी, गणेश मतकरी, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस,मुंबई,२०१८

१२ नऊ चाळीसची लोकल, शिल्पा कांबळे, शब्द पब्लिकेशन,मुंबई,२०१९

१३ निळ्या दाताची दंतकथा, प्रणव सखदेव,वॉटरमार्क पब्लिकेशन,पुणे,२०१५

१४ नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य, प्रणव सखदेव, रोहन प्रकाशन, पुणे,२०१७

१५ भूप, मोनिका गजेंद्रगडकर,मौज प्रकाशन, मुंबई,२००६

१६ तो भितो त्याची गोष्ट,महेंद्र कदम,अक्षर मानव प्रकाशन,पुणे,२०१२

१७ एक होता उंदीर,मलिका अमरशेख, शब्द पब्लिकेशन,मुंबई,२००६

१८ स्वप्नस्थ,संजय भास्कर जोशी,पद्मगंधा प्रकाशन,पुणे,२०१२

१९ मॉलमध्ये मंगोल,सतीश तांबे,अक्षर प्रकाशन,मुंबई,२०१३

२० राखीव सावल्यांचा खेळ, किरण गुरव, शब्द पब्लिकेशन,मुंबई,२०१३

२१ दोन शतकाच्या सांध्यावरच्या नोंदी,बालाजी सुतार, शब्द पब्लिकेशन,मुंबई,२०१९

२२ झिंझुरडा,जी.के.ऐनापुरे, विजय प्रकाशन,नागपूर,२०१५

संदर्भ ग्रंथ

१ इनामदार एस.डी., २०१५ : **रूपबंध**, प्रतिमा प्रकाशन, पुणे

२ जोशी, सुधा, २००० : **कथा : संकल्पना आणि समीक्षा**, मौज प्रकाशन, मुंबई

३ थोरात, हरिश्चंद्र, २०११ : **कथनात्म साहित्य आणि समीक्षा**, शब्द प्रकाशन, मुंबई

४ तांबे, सतीश, २००७ : **लेखाजोखा**, लोकवाङ्मय गृह, प्रकाशन, मुंबई

५ कुळकर्णी, मधु, १९८७ : **ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण**, शुभदा प्रकाशन, पुणे

६ सासणे, भारत, २००९ : **वाटा आणि मुक्काम**, मौज प्रकाशन, मुंबई

७ पाटणकर, रा. भा., १९७४ : **सौंदर्यमीमांसा** , मौज प्रकाशन, मुंबई

८ केळकर, अशोक, १९७६ : **सौंदर्यमीमांसा : तीन टिपणे** , संदर्भ, नागपूर

९ चुनेकर, सु.रा., १९६४ : **प्रा. रा. श्री. जोग गौरव ग्रंथ**, व्हीनस प्रकाशन, पुणे

१० कर्णिक,प्रदीप व भोंजाळ, चंद्रकांत, २०१२ **: निवडक भारत सासणे – तप्तप्रवाह,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

११ जोशी,सुधा:२०१९:**मराठी कथा:१९४० ते २००० एक परामर्श**:मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई

१२ ढेरे, अरुणा :२०१४:**स्त्री-लिखित मराठी कथा (१९५० ते २०१०)**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

१३ कोत्तापल्ले नागनाथ,भगत दत्ता, **जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य** (संपा.):सायन प्रकाशन,पुणे

१४ जी.के.ऐनापुरे, **मराठी कथा : मूल्य आणि ऱ्हास**, ललित पब्लिकेशन,मुंबई,२०१६

....

लेख

५) सासणे, भारत, २०१२ : **नव्वदोत्तर मराठी कथा,** खेळ, पुणे

६) भोसले, शीतल, २०१३ : **नव्वदनंतरची कथा ,** ललित-कथा विशेषांक, मुंबई

७) देशपांडे,अजय, २०१७ : **आजची मराठी कथा : काही नोंदी, काही निरीक्षणे,** सर्वधारा- नव्वदोत्तर मराठी कथा विशेषांक , अमरावती

८) जोशी, संजय, २०१५ : **दशकातील साहित्यिक**, ललित, मुंबई

९) कुळे, मुकुंद, २०१६ : **एक मनस्विनी लेखक**, रविवार महाराष्ट्र टाईम्स संवाद पुरवणी, मुंबई

१०) कदम, महेंद्र, २०१३ : **जयंत पवारांची कथा**, परिवर्तनाचा वाटसरू, पुणे

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER - 2017

नव्वदोत्तर मराठी कथेचा रूपबंध

प्रा. डॉ. रविकांत शिंदे
मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

वना:-

१९९० नंतर देशात मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. व्यापार, उद्योगधंदे यांबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात तिकीकरणाचा याच कालखंडात शिरकाव झाला. मानवी जीवन त्यामुळे आंतर्बाह्य बदलून गेले. साहित्याची निर्मिती प्रक्रियाही यापासून अलिप्त राहू शकली नाही. संकेतांना, निर्मिती प्रक्रियांना, परंपरांना, रूपबंधांना छेद देण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडात झालेला दिसून येतो. मराठी कथेतही याबाबतीत सर्वार्थाने बदल झालेले न येतात. परंपरेने आखून दिलेल्या रूपबंधात मराठी कथा अडकून पडल्यामुळे त्यातून बाहेर पडण्याची आवश्यकता या कालखंडात निर्माण झाली होती. हा रूपबंध न काढण्याच्या आवश्यकतेतूनच नव्या आशयाची, नव्या रूपबंधाची कथा या कालखंडात निर्माण झाली. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून 'नव्वदोत्तर मराठी या रूपबंध' याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

दोत्तर मराठी कथाकार :-

नव्वदोत्तरकालखंडातील प्रमुख कथाकार म्हणून आपणला रंगनाथ पठारे, भारत सासणे, मिलिंद बोकील, प्रवीण पाटकर, प्रतिमा जोशी, सदानंद देशमुख, न गवस, मधुकर धर्मापुरीकर, पंकज कुरूलकर, राजन खान, मेघना पेठे, प्रिया तेंडूलकर, मलिका अमर शेख, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा, मनस्विनी लता रविंद्र, पवार, आसाराम लोमटे, किरण गुरव, अभिराम भडकमकर, प्रशांत बागड, संजय भास्कर जोशी, गणेश मतकरी, सतीश तांबे, प्रणव सखदेव, जी. के. ऐनापुरे, खडस इ. कथाकारांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मानवी जीवन बदलाच्या आंतर्बाह्य चित्रणा बरोबरच प्रस्तुत कालखंडातील कथाकारांच्या कथा ालचे वर्तमान अत्यंत टोकदारपणे चित्रित करताना दिसतात.

डीत वास्तवाला प्रतिबिंबित करणारी कथा :-

नव्वदोत्तरकालखंडात अस्तित्वात आलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने मानवासमोर अनेक गंभीर प्रश्न उभा केले. या प्रक्रियेने निर्माण केलेल्या विभिन्न ना थेटपणे सामोरे जाण्याचे प्रयत्न प्रस्तुत कालखंडातील अनेक कथालेखकांनी केलेला दिसून येतो. मानवी जीवन जाणिवांचे अत्यंत खोलवरचे चित्रण या खंडातील बहुतांश कथाकारांच्या कथांतून येताना दिसून येते. नव्वद पूर्वीच्या कालखंडातील कथेपेक्षा सर्वार्थाने नव्या आशय, विषय, रूपाची कथा साकारण्याचा या कालखंडात मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. भोवतालच्या संभ्रमित करणाऱ्या वर्तमानाने माणसाचे जगणे शतखंडीत वास्तवात रूपांतरीत झालेले दिसून येते. त्या शतखंडीत वास्तवाला टोकदारपणे चित्रित करण्याचा प्रयत्न या कालखंडातील सर्वच कथाकार करताना दिसून येतात. मानवी व्यक्तिमत्त्वाचे शतखंडीत प्रतिमांमध्ये झालेले रूपांतरण समजून घेतानाच त्या शतखंडीत वास्तवाने निर्माण केलेल्या प्रश्नांच्या सोडवणूकीचे अनेक पर्याय व प्रत्युत्तर प्रस्तुत कालखंडातील कथाकार अत्यंत समर्थपणे करताना दिसून येतात. म्हणूनच या कालखंडातील कथा केवळ नावीन्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी असलेली दिसून येते.



नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे :-

नव्वदोत्तरकालखंडातील कथांतून भोवतालच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे समग्र चित्रण आलेले दिसून येते. व्यक्ती ते समष्टी हा नव्वदोत्तरकालखंडाचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रभावाने सामाजिक जीवनात निर्माण केलेल्या प्रश्नांना प्रस्तुत कालखंडातील कथा गंभीरपणे सामोरी जाताना दिसते. कथाशयाचे बहुविध स्तर या कालखंडातील अनेक कथाकारांकडून हाताळले जाताना दिसतात.

'जयंत पवार'हे नव्वदोत्तरी कालखंडातील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' आणि 'वरनभात लोन्चा कोन

नाय कोन्चा' या कथासंग्रहांतून जागतिकीरणाने महानगरीय परिसरात राहणाऱ्या लोकांसमोर निर्माण केलेल्या संघर्षमय जीवनाचे नाट्यमय चित्रण अत्यंत तटस्थप आपल्यासमोर येताना दिसते. ''जयंत पवार हे 'कथा' या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे गंभीर लेखक आहेत. कोणत्याही चांगल्या लेखकाला पछाडणार जन्म, मृत्यू, दुःख, क्रौर्य, हिंसा या गोष्टी पवारांच्या कथेत निव्वळ 'थीम्स' पुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर लेखकाच्या सतत सुरू असलेल्या चिंतनाचे विषय म्हणू समोर येतात. पवारांची कथा वाचकाला जगण्याच्या धुमश्चक्रीत मध्यभागी आणून उभी करते. या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दसतऐवज आहेत समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकापुढे मांडतात. आजच्या मराठी साहित्यात पवारांची उपस्थिती आश्वास आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारी आहे.''१ सामान्य माणसासमोर जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्यांवर जयंत पवारांची कथा गंभीर भाष्य करतान दिसते. आशयाच्या विभिन्न वैशिष्ट्यांनी त्यांची कथा समृद्ध झालेली दिसून येते. माणूस आणि त्याचा जगण्यासाठी विभिन्न पातळीवर सुरू असलेला जीवघेणा संघर्ष जयंत पवार यांच्या कथेचा स्थायीभाव असलेला दिसून येतो.

आशयाची दीर्घात्मक मांडणी हे जयंत पवार यांच्या कथेची नैसर्गिक मागणी असल्याचे दिसून येते. त्यांच्या जवळजवळ सर्वच कथा या दीर्घ स्वरूपाच असलेल्या दिसून येतात. ''रूपबंधाच्या नव्या शक्यता शोधताना स्वप्न, वास्तव, अद्‌भूतता यांच्या पायावर कथा उभी करताना जयंत पवार महानगरी संवेदनेबरोबरच भारतीय संवेदना पकडण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. ऐंशी नंतर मराठी कथेला ओहोटी लागलेली असताना आणि महानगरीय कथा तर जवळपा हद्दपार झालेली असताना जयंत पवारांच्या कथेने एक आश्वासक पाऊल टाकले आहे. जागतिकीकरण, महानगरीय संवेदना, भाषिक संवेदन आणि या सगळ्यांमधू पिचत चाललेला व पिछाडीवर पडत चाललेला सामान्य माणूस कथेच्या केंद्रस्थानी ठेवून त्याच्या शोषणाच्या सगळ्या शक्यता तपासून पाहणारी ही कथा मराठ कथावाङ्‌मयात महत्त्वाची ठरणार आहे.''२ मानवी जीवन जाणिवांना समृद्ध करणारे अनेक प्रवाहच जणू आटत जावेत आणि माणुसकी नावालाही ऊरू न याविषयीची खंत जयंत पवार यांच्या कथेतून प्रभावीपणे प्रतिबिंबित झालेली दिसून येते. माणसाच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचे विविध कंगोरे उलगडत जाणारी त्यांच कथा नव्वद नंतरच्या दशकातील कथेचा आश्वासक चेहरा असलेला दिसून येतो.

मानवी नातेसंबंधात दिवसेंदिवस येत चाललेला शुष्कपणा काटेकोरपणे प्रतिबिंबित करण्यासाठी नव्वदोत्तर अनेक कथालेखक चाकोरीबाहेर जाऊन आश आणि आविष्काराच्या बाबतीत नावीन्यपूर्ण मार्ग हाताळताना दिसतात. जयंत पवार या कथाकारांच्या मांदियाळीत अग्रस्थानी असलेले दिसून येतात. माणूस आणि त्याचा बदलता भवताल अत्यंत सूक्ष्मपणे अधोरेखित करतानाच त्यांची कथा मानवी नात्यांच्या अस्तित्व संघर्षाचा वैशिष्ट्यपूर्ण कॅनव्हास चित्रित करताना दिसते 'छटाकभर रात्र तुकडातुकडा चंद्र' यांसारखी त्यांची वास्तव आणि कल्पिताचे वेगळे चित्र डोळ्यांसमोर उभारणारी कथा असो अथवा, 'साशे भात्तर रूपयांचा सवा अर्थात युद्ध आमुचे सुरू !' ही मानवी स्वभाववैशिट्यांच्या संघर्षाचे अस्वस्थ करणारे चित्र उभी करणारी कथा असो. नावीन्यपूर्ण आशयसूत्रांसह रूपबंधाच वैशिष्ट्यपूर्ण बाज त्यांच्या कथांत आपणास अनुभवयास मिळतो. एक परीपूर्ण वास्तव जीवन कहाणीच त्यांच्या कथांच्या माध्यमातून पात्रांच्या प्रयोगशील, नाट्यात्म गुणधर्मांच्या अनुषंगाने आपणासमोर साकारत जाते.

सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या जगण्यातील हतबलतेला, अस्वस्थतेला, अपरिहार्यतेला, अपयशाला प्रभावीपणे आविष्कृत करण्याचा प्रयत नव्वदोत्तर कथा करताना दिसते. 'निळ्या दाताची दंतकथा' या प्रणव सखदेव यांच्या कथासंग्रहातून समकालाचे अचूक भान गोळीबंद आशयाच्या कथांतून, प्रयोगशील रूपबंधाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर या कथा सर्वार्थाने नावीन्यपूर्ण असलेल्या दिसून येतात. ''प्रणव सखदेव यांच्या कथांनी जागतिक वाङ्‌मयातील विविध प्रवाह, इतिहास, सामाजिक व राजकीय घटित आणि मानवी भूगोलशास्त्रातील उलथापालथी यांची जाण पचवलेली आहे. जटील व भयकारक वास्तव दाखवण्यासाठी त्या विविध आयुधांचं समर्पक उपयोजन प्रणव करतात आणि समकाळातल्या व्यक्तीचा चिरफाळलेपणा चितारतात.''३ मानवी भावभावनांचे, तिच्यातील गुंतागुंतीचे, कोरडेपणाचे चित्रण असलेल्या समकालीन वैविध्यपूर्ण संदर्भनिष्ठ आशयांनी प्रणव सखदेव यांची कथा वाचनीय ठरताना दिसते मानवी जगण्याच्या गाभ्याला स्पर्शून येणारी त्यांची कथा समकालीन कथावाङ्‌मयातील एक महत्त्वपूर्ण कथा ठरताना दिसते. 'राज्य राणीचं होतं', 'रसातळाला ख.प. च.', 'माझी लाडकी पुतनामावशी', 'मॉलमध्ये मंगोल' यांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रहांच्या माध्यमातून सतीश तांबे यांनी मानवी जगण्यातील अनेक अलक्षित विषयांना पृष्ठस्तरावर आणण्याचा सफल प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनातील संघर्षाचा, लैंगिक जाणीवांचा, नात्यांतील गुंतागुंतीचा अत्यंत खोलवरचा वेध सतीश तांबे यांच्या कथांतून घेतला गेलेला दिसून येतो.

एकूणच नव्वदोत्तर कालखंडात बदलत्या रूपबंधाची, काळाची विभिन्न परिमाणे सामावून घेणारी आश्वासक कथा लिहिली गेली आहे. या कथा मानवी नात्यांच्या बदलत्या अनुबंधावर खोलवर भाष्य करणाऱ्या आणि मराठी कथावाङ्‌मयाला समृद्ध करणाऱ्या आहेत असे निश्चितपणे म्हणता येते.

संदर्भः-

चित्रे, निखिलेश, फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, जयंत पवार, लोकवाङ्‌मय गृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०११, मलपृष्ठावरून उद्‌धृत.
कदम, महेंद्र, जयंत पवारांची कथा, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जानेवारी, २०१३, पृ.५५
वसपुते, गणेश, निळ्या दाताची दंतकथा, प्रणव सखदेव, वॉटरमार्क पब्लिकेशन, पुणे, प.आ. २०१५, मलपृष्ठावरून उद्‌धृत.

Scanned by CamScanner

ISSN - 2278-9308

नव्वदोत्तर मराठी कथा : प्रेरणा आणि प्रवृत्ती

प्रा.डॉ. रविकांत शिंदे
साहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

प्रस्तावना :-

मराठी साहित्याच्या विकासात विविध कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय स्थित्यंतरांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेवर वंश, काळ आणि परिस्थितीचा फार मोठा प्रभाव असतो, हे तेनचे निरीक्षण बहुतांश अचूक ठरताना दिसते. कारण कुठलाही लेखक त्याच्या भोवतालच्या अनेक सामाजिक घटकांनी नियंत्रित अथवा प्रभावीत झालेला असतो. विशिष्ट कालखंडातील समाजाची ध्येयधोरणे, रूढी-परंपरा, प्रेरणा-प्रवृत्ती कोणत्या आहेत यावरच विशिष्ट साहित्यप्रकाराला दिशा लाभताना दिसून येते.

१९९० पर्यंत आधुनिक युगाचा अस्त झाला व १९९० नंतर उत्तराधुनिक कालखंडाची सुरूवात झाली असे मानण्यात येते. १९९० नंतरच्या कालखंडात भारताने स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेने सर्वच क्षेत्रांत जागतिकीकरणाचा प्रवेश झाला. व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना सीमाविरहीत बनवत, एकमेकांच्या भूमित कायदेशीररित्या खुलेपणाने व्यापार करण्याची व्यवस्था या माध्यमातून निर्माण केली. वरवर पाहताना आपणाला ही प्रक्रिया खूप सरळ, सोपी आणि व्यापारी वाटते. परंतु तितकीच ती गुंतागुंतीची, जटील आणि सामाजिक, सांस्कृतिक परिघांना छेद देणारी असलेली दिसून येते.

१९९० च्या कालखंडात मानवी समाजाला आंतर्बाह्य व्यापलेल्या जागतिकीकरणाचे परिणाम साहित्याच्या निर्मिती प्रकियेवरही होऊ लागले. साहित्याच्या सर्वच प्रकारांत त्याचे बरे-वाईट परिणाम जाणवू लागले. जागतिकीकरणाचे आणि त्यामुळे बदललेल्या वास्तवाचे दूरगामी परिणाम मराठी कथेवरही मोठ्या प्रमाणात झाले. मराठी कथेच्या प्रेरणा आणि प्रवृत्तींमध्येही अमूलाग्र बदल झाला. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून नव्वदोत्तर मराठी कथेच्या प्रेरणा आणि प्रवृत्तींचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

नव्वदोत्तर मराठी कथा आणि कथाकार :-

१९९० नंतरचा कालखंड हा अतिशय संवेदनशील, महत्त्वाचा व काही प्रमाणात सगळीकडेच उलथापालथ करणारा असा होता. कथेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास कथेतील आलेली मरगळ कथाकारांना जाणवत होती. कथा स्तब्ध आणि ग्लानीग्रस्त झाल्यामुळे लघुकथा म्हणून जो कोणता रूढ असा आकृतीबंध परंपरेने स्वीकारला होता. तो आकृतीबंध मोडून काढायची आवश्यकता कथाकारांना वाटायला लागली होती. त्यातूनच नव्या आशयाची, नव्या रूपाची कथा नव्या प्रेरणा आणि प्रवृत्तींसह १९९० नंतरच्या कालखंडात विकसित झालेली दिसून येते.

१९९० नंतरच्या कालखंडातील प्रमुख कथाकार म्हणून आपणाला रंगनाथ पठारे, मिलींद बोकील, प्रवीण पाटकर, प्रतिमा जोशी, भारत सासणे, सुबोध जावडेकर, सदानंद देशमुख, राजन गवस, मधुकर धर्मापुरीकर, पंकज कुरूलकर, राजन खान, मेघना पेठे, प्रिया तेंडूलकर, मलिका अमर शेख, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा, मनस्विनी लता रविंद्र, जयंत पवार, आसाराम लोमटे, किरण गुरव, अभिराम भडकमकर, प्रशांत बागड, संजय भास्कर जोशी, गणेश मतकरी, सतीश तांबे, प्रणव सखदेव, जी.के.ऐनापुरे, समर खडस, इ.कथाकारांचा आवर्जून नामोल्लेख करावा लागेल. मानवी जीवन बदलाच्या वास्तवतेचा आर्कचित्र रेखाटणाऱ्या या कथाकारांच्या कथांनी नव्वदोत्तर मराठी कथेचे दालन समृद्ध झालेले दिसून येते.

जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या विविध प्रश्नांना भिडण्याचे प्रयत्न उपरोक्त कथालेखकांच्या कथा करताना दिसून येतात. सामाजिक बदलांचा, मानवी जीवनातील स्थित्यंतरांचा अत्यंत सूक्ष्मपणे वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांनी केलेला दिसून येतो. पूर्वीच्या कालखंडातील कथेपेक्षा सर्वार्थाने नवीन आशय, विषयाची, सूत्रांची, रूपबंधाची कथा साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. मानवी जगण्याचे भोवतालच्या शतखंडीत वास्तवात झालेले रूपांतरण समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखक करत आहेत. नव्वदोत्तर कथा केवळ नावीण्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी आहे.

Scanned by CamScanner

नव्वदोत्तर मराठी कथेच्या प्रेरणा:-

लेखकाचा आत्मोद्‌गार जेव्हा अपरिहार्य होऊन प्रकटण्यासाठी धडपडू लागतो, तेव्हा श्रेष्ठ कलाकृतीचा जन्म होताना दिसून येतो. भोवतालच्या घटकांकडून त्यासाठी त्याला प्रेरणा मिळत राहतात. आपल्या भोवताली असणाऱ्या सामाजिक पातळीवर विविध संघर्षांना तोंड देत जगत राहणाऱ्या माणसांची यासाठी त्याला प्रेरणा मिळत राहते. माणूस हसतो म्हणजे काय?, माणूस रडतो म्हणजे काय?, माणूस सुखाच्या पाठीमागे ऊर फुटेपर्यंत धावत राहतो म्हणजे काय? या आणि यांसारख्या अनेक प्रश्नांच्या अन्वयार्थशोधाच्या प्रेरणेतून कथाकारांची कथा आकारत असते. भारत सासणे लेखकाच्या प्रेरणेविषयी लिहिताना सांगतात, "भोवताली अनेक पातळ्यांवरून, अनेक पध्दतीने, अनेक प्रकारे संघर्ष करीत जगत राहणाऱ्या जीवांकडे पाहून जी काही एक वैश्विक करूणा निर्माण होत असेल त्या करूणेतून काहीएक प्रेरणा घेऊन, लेखक लिहायला लागतो व अनेकांच्या वेदना स्विकारून आणि सहकंपित होऊन जीवनदर्शी लेखन करतो. चिंतनशील व प्रामाणिक अशा लेखकाचे हे असे भागधेय असते. मनोरंजन किंवा बुद्धिरंजन हा लेखनामागचा हेतू उरत नाही तर सर्वसामान्य माणसाचा शोध हा हेतू लेखनामागे शिल्लक राहतो."[१] मानवी जीवन संघार्षाचा, त्याच्या सुख-दुःखाच्या कारणांचा शोध हा लेखकाच्या निर्मितीप्रक्रियेचा मध्यबिंदू असतो. त्या प्रेरणेतूनच तो सर्वात्मक मानवी जीवनाला व्यापून उरणाऱ्या संकल्पनेचा शोध घेत राहतो. १९९० नंतरच्या कालखंडातील कथालेखकांनाही नानाविध घटकांनी लिहिते राहण्याची प्रेरणा दिलेली आहे. त्या प्रेरणांचा विस्ताराने शोध घेण्याचा आपण प्रयत्न करूयात.

१)समुहविषयक सहानुभाव :-

नव्वद नंतरच्या दशकात जागतिकीकरणाच्या अपरिमित प्रभावाने सामान्य माणसाचे जगणे बंदिस्त होऊ लागले. सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्षाची तीव्रता आणखी धारदार होऊ लागली. भोवतालच्या समाजात त्याचे जगणे कठिणच नव्हे तर टोकदार होऊ लागले. जागतिकीकरणाने माणसाच्या जगण्यात अशाश्वता मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागली. स्पर्धा तीव्र झाली. अनेकांच्या हातातील काम जाऊन ती माणसे बेकार होऊ लागली. एकेकाळी समृद्धतेचे आयुष्य जगणारी माणसे एका फटक्यात फाटके आयुष्य जगू लागली. या फाटके आयुष्य जगणाऱ्या सामाजिक व्यवस्थेतील अनेक घटकांविषयी सहानुभाव व्यक्त करण्याच्या भूमिकेतून, प्रेरणेतून नव्वदोत्तर कालखंडातील अनेक लेखक लिहिते झालेले दिसून येतात.

'जयंत पवार' या अलिकडच्या काळातील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथाकाराच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहातील याच शीर्षकाच्या कथेतून जागतिकीकरणामुळे मुंबईसारख्या महानगरातील अनेक गिरण्यांच्या ठिकाणी उभे राहिलेल्या आधुनिक मॉल्समुळे गिरणी कामगारांच्या वाट्याला आलेल्या विस्थापनाची, शोषणाची गंभीर कहाणी आपणासमोर येते. माणसाच्या शूद्रतेविषयीची प्रस्तुत लेखकाला येणारी चीड आणि त्यातून सामान्य माणसांविषयी त्याच्या कथेतून व्यक्त होणारा सहानुभाव लेखक प्रत्ययकारीपणे आपणासमोर मांडतो.

नव्वद नंतरच्या दशकात मानवी जीवनाला अनेक संघर्षाच्या पातळीवर लढत रहावे लागताना दिसून येते. जातीविषयक, धर्मविषयक संकल्पनांच्या तीव्रतेतून वाट्यास येणारी विषमता असेल किंवा आर्थिक शोषणातून, कमीपणातून सर्वसामान्य माणसाला टोकदार अनुभवातून जावे लागत आहे. नव्वदोत्तर अनेक कथाकारांच्या कथांतून नागावलेल्या माणसाची चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. भोवताली कायम निर्माण होणाऱ्या दाहक अनुभवांतून सामान्य माणसाच्या वाट्याला येणाऱ्या तीव्र दुःखाचे वार्तांकन करण्याच्या प्रेरणेतून, व्यवस्थेला जाब विचारण्याच्या आणि सर्वसामान्य माणसाच्या दाहक वास्तवाला छेद देण्याच्या सहानुभवातून नव्वदोत्तर कथा आकारास आलेली दिसून येते. मानवी जीवनाला सदैव वेढून राहिलेल्या दुःखमयतेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांकडून होताना दिसतो.

२) सामान्य माणसाचा शोध :-

कोणताही लेखक साहित्याच्या माध्यमातून समुहजीवनातील सामान्य माणसाच्या जगण्याचा शोध घेण्याच्या हेतूने, प्रेरणेने लिहिण्याचा प्रयत्न करत असतो. नव्वदोत्तर कथालेखकही याला अपवाद नाही. सामान्य माणसाच्या दुःखाची, अवहेलनेची, शोषणाची, पिचलेपणाची जाण आणि त्याविषयक सहवेदना, सहानुभाव नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून व्यक्त होताना दिसतो. किंबहुना सामान्य माणसाची वेगवेगळ्या सामाजिक पटलावर विविध माध्यमातून होणारी अवहेलना, कुचंबणा रेखाटण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथाकार करत असलेले दिसून येतात. मानवी जीवनातील क्षणभंगूरतेविषयी, माणसाच्या अलौकिक ध्यासाविषयी आपल्या कथेच्या माध्यमातून भिडण्याचा प्रयत्न 'मलिका अमर

Scanned by CamScanner

शेख' यांच्या 'एक होता उंदीर','कोऽहम? कोऽहम?' आणि 'झाडपणाची गोष्ट' या कथासंग्रहांच्या माध्यमातून केलेला दिसून येतो. महानगरीय माणसाचे कणाकणाने तुटत जाणे त्यांच्या कथेतून तीव्रतेने अनुभवयास येते.

नव्वद नंतरच्या दशकात केवळ माणसाचे जीवनमानच बदलले नाही, तर त्याच्या भोवतालचे सगळे सामाजिक सदंर्भच बदलून गेले. पूर्वीच्या काळी दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारी माणसे, दुसऱ्याच्या नुकसानीने हळहळणारी माणसे जागतिकीकरणाने हिरावून घेतली. दुसऱ्याचे नुकसान म्हणजे आपला फायदा अशी विचार करणाऱ्या माणसांनी इथलीं सगळी सामाजिक व्यवस्थाच काठोकाठ भरून गेली. मग आपोआपच ज्याच्याकडे सामर्थ्य तो दुसऱ्यावर अन्याय करू लागला. न्यायीपणाला केव्हाच तिलांजली दिली गेली. आणि मग आपोआपच स्वार्थीपणा प्रत्येक क्षेत्रात वाढू लागला. असत्याने सत्यावर जागोजाग विजय मिळविला. सामान्य माणसाचा कोणी वालीच राहिला नाही. नव्वदोत्तर कथाकारांनी या सामान्य माणसालाच त्यांच्या कथानकाचा निवेदक केला, प्रोटॅगॉनिस्ट केला आणि त्याच्या नजरेतून सामान्य माणसाच्या जगण्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. 'समर खडस' यांचा 'बकऱ्याची बॉडी' नावाचा कथासंग्रह अशाच सामान्य माणसांची व्यवस्थेविरूद्ध धर्म, हक्क यांविषयी सुरू असणारा संघर्ष अत्यंत टोकदारपणे चित्रित करते. सामान्य माणूस आणि त्याच्या जीवनाची व्यवस्थेकडून होणारी शोकांतिका नव्वद नंतरच्या कालखंडातील कथाकारांच्या प्रेरणेचा विषय असलेली दिसून येते.

३) चिरंतन मूल्यांबाबतची आस्था :-

मानवाच्या कल्याणाबाबत आस्था दाखविणाऱ्या काही मूल्यांची समाज नेहमीच अपेक्षा करत असतो. किंबहुना त्यांना जोपासण्याचा प्रयत्न करत असतो. लेखक या मूल्यांच्या माध्यमातून समाजात एक आदर्श रामराज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतो. साहित्याचा व्यवहारच मुळात दया, क्षमा, सहानुभूती, प्रेम, निष्ठा, स्वातंत्र्य, समता, त्याग, सेवा, मानवता अशा चिरंतन मूल्यांशी संबंधित असतो. श्रेष्ठ साहित्य नेहमीच या मूल्यांच्या शोधात आणि जतन करून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असते.

मानवी मूल्यांचा क्रमशः होत गेलेला ऱ्हास ही नव्वद नंतरच्या दशकात जागतिकीकरणाने मानवी समाजाला दिलेली विदारक भेट आहे. मानवी मूल्ये टिकून राहावीत आणि त्यातूनच सामाजिक संकेत सांभाळत मानवी जीवनाचा प्रवास अधिकाधिक सुखदायी व्हावा ही पुरातन आणि समकालीन साहित्यातूनही मोठ्या प्रमाणात अपेक्षा बाळगली गेलेली होती आणि आहे.

मानवी मूल्यांची साहित्याच्या माध्यमातून जोपासना करण्याच्या प्रेरणेतूनच नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकार लिहित असलेले दिसून येतात. मानवी मूल्यांवरच कुठल्याही समाजाची नैतिक इमारत उभी रहात असल्याने या मूल्यांना चांगले साहित्य नेहमीच केंद्रस्थानी ठेवून निर्मिती प्रक्रिया अनुसरत असल्याचे दिसून येते.

नव्वद नंतरच्या दशकात मानवी जीवनातून ही मूल्यव्यवस्थाच हद्दपार होऊन गेल्याचे दिसून येते. अनेक मानवी मूल्ये स्वार्थासाठी पायदळी तुडविले जाताना दिसतात. त्यातूनच या मानवी मूल्यांना पुन्हा नव्याने मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याच्या भूमिकेतून नव्वदोत्तर अनेक कथाकार प्रयत्नशील असलेले दिसून येतात. उदात्त मानवी जीवन उदात्त मानवी मूल्यांच्या आधारावरच उभारले जाऊ शकते हे सांगण्याचा प्रयत्न रंगनाथ पठारे, राजन खान, भारत सासणे आदि लेखकांच्या कथांतून होताना दिसते. मानवी मूल्ये हीच समान नागरीकत्व, एकरूप समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची संकल्पना आहे हे या आणि इतर अनेक नव्वदोत्तर कथाकारांच्या कथेतून आपणास अनुभवायस मिळते. माणूस आणि त्याला जगण्यासाठी पूरक असणारी मानवी मूल्ये नव्वदोत्तर साहित्याच्या प्रेरणा असलेल्या दिसून येतात.

४) मानवी जीवनातील व्यामिश्रतेचा शोध :-

जागतिकीकरणाने मानवी जीवन संकल्पना व्यामिश्र आणि गुंतागुंतीची बनून गेल्याचे दिसून येते. नव्वदोत्तर कथाकारांनी आपल्या कथांच्या माध्यमातून मानवी जीवनातील व्यामिश्रतेचा शोध अत्यंत अंतःस्तरावर जाऊन घेतल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाने वेगवान झालेले आयुष्य, पैशाला आलेले अमाप महत्त्व, नात्यांमधील स्वार्थीपणात सातत्याने होणारी वाढ, सतत पाठीवर घेऊन फिरावे लागणारे अपेक्षांचे ओझे, त्यातून वाट्याला येणारी पराभूतता या आणि अशा अनेक कारणांनी नव्वदोत्तर कालखंडातील माणसाचे जगणे गुंतागुंतीचे होऊन गेले आहे. 'गणेश मतकरी' यांच्या 'खिडक्या अर्ध्या उघड्या' या कथासंग्रहातील नायक, नायिका अशाच अनुभवांच्या, अपेक्षांच्या, अपयशीपणाच्या खोल गर्तेत रूतत गेल्यासारखे वाटत राहतात. आपला भविष्यकाळ सिक्युअर आणि वेल सेटल्ड करण्याच्या मोहात

Scanned by CamScanner

ISSN - 2278-9308

वर्तमान आणि भूतकाळाच्या सगळ्या बंधनांना क्रूरपणे नष्ट करत जातात. संभ्रमाच्या, अस्थिरतेच्या, असहाय्यतेच्या अनेक खुणांनी नव्वदोत्तर माणसांचे जगणे कसे सैरभैर झालेले आहे याचे अस्वस्थ करणारे चित्रण 'गणेश मतकरी' आणि त्यांच्या समकालीन नव्वदोत्तर सर्वच कथाकारांच्या कथांतून आपणास तीव्रतेने अनुभवयास येते.

५) मानवतेची वैश्विक संकल्पना प्रस्थापित करणे :-

माणसाला किमान माणसाप्रमाणे वागणूक मिळावी. जगातील कुठल्याही कोपऱ्यातील माणसाचे माणूसपण हिरावून घेतले जाऊ नये या भूमिकेतून वा प्रेरणेतून कुठल्याही कालखंडातील लेखक लिहीत असलेला दिसून येतो. नव्वदोत्तर काळात मानवतेचा सातत्याने सामाजिक परंपरेत होणारा ऱ्हास थांबविण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडातील लेखकांनी केलेला दिसून येतो. मानवतेच्या वैश्विक संकल्पनेचा पुरस्कार आणि प्रत्यक्ष जीवनातील त्याच्या उपयुक्ततेसंबंधी नव्वदोत्तर कथालेखक सजग असलेले दिसून येतात. 'राजन गवस' सारखा कथालेखक त्याच भूमिकेतून आपल्या 'आपण माणसात जमा नाही', 'रिवणायावली मुंगी' या कथासंग्रहाच्या माध्यमातून सभोवतालच्या सामाजिक वास्तवाला भिडण्याचा आणि मानवतेच्या संकल्पनेला उदात्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. समाजातील मानवी नात्यांच्या गुंतवळीतून सुटून जाणारा मानवतेचा धागा घट्ट विणण्याच्या प्रेरणेतून नव्वदोत्तर कालखंडातील जवळजवळ सर्वच लेखक प्रयत्नशील असलेले दिसून येतात.

६) दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाची निर्मिती :-

मानवी जीवनातील दुःखाच्या परिहारासाठी लेखक सतत आपल्या लेखनातून प्रयत्नशील असतो. मानवी जीवन सुंदर, मंगल आणि सुखदायी व्हावे ही प्रेरणा सतत त्याच्या लेखनाच्या पाठिशी असते. मानवी जीवनाच्या शुभंकरतेचा कथालेखक नेहमीच ध्यास घेत असतो. नव्वदोत्तर कालखंडात जागतिकीकरणाने मानवी जीवनात कमालीची निराशा, दुःखाने जी काजळी भरून राहिलेली आहे ती दूर करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकार करत असलेले दिसून येतात.

मानवी समाजातील धर्म, अर्थ आणि ईश्वरावरून वाढत जाणारी दरी आणि त्यातून संपूर्ण जगाच्या वाट्याला आलेली युद्धे, दहशतवाद, बॉम्बस्फोट ही नव्वद नंतरच्या कालखंडातील भयाने बंदिस्त झालेल्या समाजाच्या निर्मिती मागची कारणे आहेत. टोकाच्या धर्मांधतेवरून माणसा-माणसातील वाढत चाललेली दरी, भयाने व्यापलेला समाज, असहिष्णू वृत्तीचा होणारा पुरस्कार हा नव्वदोत्तर काळातील लेखकांना सतत विचारमग्न करायला लावणारा प्रश्न आहे. या प्रश्नाला आपल्या कथांच्या माध्यमातून सामोरे जाण्याचा प्रयत्न 'शिल्प' या कथासंग्रहाच्या माध्यमातून 'मोनिका गजेंद्रगडकर' यांनी केलेला आहे. 'भारत सासणे' यांच्या 'ऐसा दुस्तर हा संसार' या कथासंग्रहातूनही दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न होताना दिसतो.

एकूणच नव्वदोत्तर कालखंडातील कथालेखक या आणि अशा विविध प्रेरणांनी प्रेरीत होऊन सामाजिक व्यवस्थेतील अनेक प्रश्नांना कथेच्या माध्यमातून आरपार भिडण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

नव्वदोत्तर कथेची प्रवृत्ती :-

माणसाच्या गाभ्याशी नाळ जोडून असणारी आणि बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक बदलांबरोबर आंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी अशा दोन्ही प्रवृत्तींमध्ये नव्वदोत्तर कथा आंदोलित होताना दिसते: माणसाच्या सामाजिक संकेताच्या परिघाला कवेत घेतानाच निर्मितीचे विभिन्न मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथेने केलेले आहेत. प्रस्तुत घटकाच्या माध्यमातून नव्वदोत्तर कथेच्या विविध प्रवृत्तींना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

१) व्यक्तीजीवनाकडून समुहजीवनाकडे प्रवास करणारी कथा :-

नवकथेच्या कालखंडातील आणि नव्वदोत्तर कालखंडपूर्व कथा म्हणजेच आधुनिक कालखंडातील कथेचा प्रवास समुहजीवनाकडून व्यक्तीजीवनाकडे झालेला दिसून येतो. गंगाधर गाडगीळांच्या मनोविश्लेषणात्मक कथा या त्याच्या उत्तम नमुना होत्या. सुधा जोशी गाडगीळांच्या कथेचा प्रकृतीधर्म वर्णिताना लिहितात, "युध्दोत्तर जगातील वेगाने बदलत जाणाऱ्या वास्तवाचे व्यापक भान तसेच मानवी मनाच्या व जीवनाच्या व्यामिश्र स्वरूपाची, त्यातील अंतर्विरोधाची, असंगतीची भेदक प्रतीती हे गाडगीळांच्या कथेचे अंतःस्त्रोत आहेत."[२] मानवी मनाच्या विविध विभ्रमाचे आविष्करण आपणास गाडगीळ आणि त्यांच्या समकालीन कथाकारांमध्ये पाहवयास मिळते. मानवी मनाच्या खोल-खोल तळाचे दर्शन त्यांच्या कथांत आपणाला घडताना दिसून येते. मनोविश्लेषणात्मकता हा त्यांच्या कथेचा स्वभावधर्म होता. तत्कालीन कथा समुहजीवनाकडून व्यक्तीजीवनाच्या अंतरंगात प्रवेशताना दिसते.

Scanned by CamScanner

नव्वदोत्तर कालखंडातील कथा पुन्हा एकदा व्यक्तीजीवनाकडून समुहजीवनाकडे प्रवास करताना दिसते. प्रस्तुत कालखंडातील कथेत समुहजीवनाच्या वेदनेचे हुंकार उमटत असलेले दिसून येतात. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणाऱ्या, अनुकंपा निर्माण होणाऱ्या माणसांची या भयंकर स्वार्थी जगात अजूनही उपलब्धता आहे हे सांगण्याचा प्रयत्न 'सतीश तांबे' यांच्या 'मॉलमध्ये मंगोल' या कथासंग्रहातून होताना दिसतो. 'संजय भास्कर जोशी' यांच्या 'स्वप्नस्थ' कथासंग्रहातूनही समुहजीवनाविषयक आपलेपण अनुभवयास येताना दिसते.

ग्रामीण संस्कृतीचा, कृषी, कृषक परंपरेचा ऱ्हास, मानवी मूल्यांचे पायदळी तुडवले जाणे यांसारख्या घटकांना नव्वदोत्तर कालखंडातील ग्रामीण कथेद्वारे आविष्कृत करण्याचा प्रभावी प्रयत्न 'आसाराम लोमटे' यांच्या 'आलोक','इडा पीडा टळो' आणि 'किरण गुरव' यांच्या 'राखीव सावल्यांचा खेळ', श्रीलिपी' यांसारख्या कथासंग्रहांच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. गावातील न संपणारी जातीयता, राजकारणाच्या माध्यमातून सामान्य माणसाचे होणारे शोषण, नव्याच्या आकर्षणातून शाश्वत मूल्यांपासून दुरावलेला सामान्य माणूस, कर्जबाजारीपणाने खचलेला शेतकरी या आणि अशा अनेक घटकांना जागतिकीकरणाच्या कोनातून चित्रित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथालेखकांच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. नव्वदोत्तर कालखंडातील बदलते ग्रामवास्तव, त्यातील सामान्य माणसाची होणारी असहाय्य फरफट या कथालेखकांच्या कथांतून प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसून येते.

२) सजग, सावध व समकालीन घटनांची नोंद घेणारी कथा :-

कोणे एके काळी भोवताली घडणाऱ्या घटनांची नोंद मराठी कथेच्या माध्यमातून नेमकेपणाने घेतली जात नाही असे म्हटले जायचे आणि ते काही प्रमाणात खरे आणि दुर्दैवीही होते. महात्मा गांधीजींची हत्या किंवा आणीबाणी यांसारख्या तत्कालीन राजकीय आणि सामाजिक पटलावर दीर्घकालीन परिणाम घडवून आणणाऱ्या घटनांची नोंद मराठी कथेने कुठेही घेतल्याचे दिसत नाही.

नव्वद नंतरच्या दशकात मात्र समकालीन घटनांविषयीची अनभिज्ञता अपवादानेच आढळून येते. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाला हादरवून टाकरणारा दहशतवाद, जातीय ताणतणाव, दंगली, बॉम्बस्फोट यांचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर, राजन खान, भारत सासणे आदि कथालेखकांच्या कथेतून सूक्ष्मपणे आविष्कृत झालेले दिसते.

पंकज कुरूलकर, योगिनी वेंगुर्लेकर यांसारख्या कथाकारांच्या कथांतून कार्पोरेट जगतातील कुरघोड्या, मालक-नोकर संघर्ष, विपणनातील आक्रमकता आदि घटकांचे तपशीलवार विवेचन येताना दिसते. "पंकज कुरूलकरांची कथा श्रेष्ठ, अभिजात साहित्यकृती असते का नाही, हा मुद्दा बाजूला ठेवला तरी त्यांच्या कथांत पर्यावरणाचे आणि समकालाचे अस्सल चित्रीकरण असते हे आवर्जून नमूद करायला हवे."[३] कथाकाराला समकालाचे अस्सल भान हवे आणि त्याच्या आधारानेच त्याच्या कथेचे बांधकाम व्हायला हवे. पंकज कुरूलकरांच्या अनेक कथांतून समकालाचे अनेक संदर्भ कथेच्या आवश्यकतेनुसार येताना दिसून येतात.

'अफवा खरी ठरावी म्हणून' या 'प्रज्ञा लोखंडे' या कथासंग्रहाच्या माध्यमातून समकालीन स्त्री आणि तिच्या भोवतालचे जग प्रामाणिकपणे चित्रित करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. औद्योगिक क्षेत्र आणि तिच्यातील ताणे-बाणे आजच्या काळाच्या पार्श्वभूमीवर 'सुबोध जावडेकर' यांच्या कथांच्या माध्यमातून नेमकेपणाने समोर येतात. त्यांची 'कुरूक्षेत्र' ही कथा या अनुषंगाने महत्त्वाची ठरते. भोवतालच्या बदलत्या सामाजिक संकेतांना आपल्या कथांच्या माध्यमातून आविष्कृत करण्याचा यशस्वी प्रयत्न नव्वदोत्तर कालखंडातील अनेक कथाकारांकडून होताना दिसतो. 'मनस्विनी लता रविंद्र' यांच्या 'ब्लॉगच्या आरश्यापल्याड' या कथासंग्रहामधून समकालीन जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या समाज माध्यमांचा व्यक्तीच्या जीवनावर होणाऱ्या बऱ्या वाईट परिणमांचे चित्रण सूक्ष्मतेने येताना दिसते. समकालीन जीवनाच्या अनेक संदर्भांच्या मुळांना ही कथा स्पर्श करताना आढळते.

३) नव्या रूपबंधाची, भोवतालच्या वास्तवाचे भान व्यक्त करणारी कथा :-

नव्वदोत्तरी कथा भोवतालच्या घटकांचे, वास्तवाचे सजग भान व्यक्त करणारी आहे. भोवतालच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक संकेतांना कधी कवेत घेत तर कधी त्याला भिडण्याचा प्रयत्न करतानाच निवेदनाचे, आशयसूत्रांचे, प्रतिमांचे, भाषाशैलीचे, घाटाचे अर्थात रूपबंधाचे विभिन्न प्रयोग ती करत जाते.

उत्तराधुनिक कालखंडात जीवनपद्धतीमध्ये झालेले विविध बदल, व्यामिश्र जीवनपद्धतीचा बहुतांनी केलेला अंगीकार त्यामुळे कथेच्या रूपबंधाला, तिच्या आशयाच्या विस्तारालाही व्यामिश्रता वा व्यापकता लाभलेली दिसून येते. कथेचे तंत्र लघुकथा-कथा ते दीर्घकथा असे विस्तारत गेलेले दिसून येते. बहुतांश नव्वदोत्तरी कथेने दीर्घकथेचा रूपबंध

Scanned by CamScanner

स्वीकारलेला दिसून येतो. जयंत पवारांच्या जवळजवळ सर्वच कथा या दीर्घकथा प्रकारात समाविष्ट होणाऱ्या आहेत. कथाशयाच्या मागणीला अनुसरणारी तिच्यातील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांना जवळची वाटणारी रूपबंधात्मकता लेखक स्वीकारत असतो. जयंत पवारांच्या कथेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, "रूपबंधाच्या नव्या शक्यता शोधताना स्वप्न, वास्तव, अद्‌भुताच्या पायावर कथा उभी करताना जयंत पवार महानगरीय संवेदनेबरोबर भारतीय संवेदना पकडण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. १९८० नंतर मराठी कथेला ओहोटी लागलेली असताना आणि महानगरीय कथा तर जवळपास हद्दपार झाली असताना जयंत पवारांच्या कथेने एक आश्वासक पाऊल टाकले आहे. जागतिकीकरण, महानगरीय संवेदना, भाषिक संवेदन आणि या सगळ्यांमधून पिचत चाललेला व पिछाडीवर पडत चाललेला सामान्य माणूस कथेच्या केंद्रस्थानी ठेवून त्याच्या शोषणाच्या सगळ्या शक्यता तपासून पाहणारी ही कथा मराठी कथावाङ्‌मयात महत्त्वाची ठरणार आहे."[४] नव्या रूपबंधाच्या साहाय्याने मानवी जीवनाच्या सनातन दुःखाला पुन्हा नव्या रूपात, आशयसूत्रात गुंफतानाच मानवाच्या वैश्विक कल्याणाची, सर्वात्मिक संतोषाची याचनाच जयंत पवार वेगळ्या वाटेने जाऊन करतात. त्यांची कथा, तिचा नाटकाशी साधर्म्य राखून असणारा प्रवाही रूपबंध मराठी कथेला सर्वार्थाने समृद्ध करताना दिसतो.

सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या जगण्यातील हतबलतेला, अस्वस्थतेला, अपरिहार्यतेला, अपयशाला प्रभावीपणे आविष्कृत करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथा करताना दिसते. 'निळ्या दाताची दंतकथा' या प्रणव सखदेव यांच्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहातून समकालाचे अचूक भान गोळीबंद आशयाच्या कथांतून,प्रयोगशील रूपबंधाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर या कथा सर्वार्थाने नावीण्यपूर्ण असलेल्या दिसून येतात. "प्रणव सखदेव यांच्या कथांनी जागतिक वाङ्‌मयातील विविध प्रवाह, इतिहास, सामाजिक व राजकीय घटित आणि मानवी भूगोलशास्त्रातील उलथापालथी यांची जाण, पचवलेली आहे. जटिल व फँटसीपल्याडचं भयकारक वास्तव दाखवण्यासाठी त्या विविध आयुधांचं समर्पक उपयोजन करतात आणि समकाळातल्या व्यक्तीचा चिरफाळलेपणा चितारतात."[५] मानवी भावभावनांचे, तिच्यातील गुंतागुंतीचे, कोरडेपणाचे चित्रण असलेल्या समकालीन वैविध्यपूर्ण संदर्भनिष्ठ आशयांनी प्रणव सखदेव यांची कथा वाचनीय ठरताना दिसते. मानवी जगण्याच्या गाभ्याला स्पर्शून येणारी त्यांची कथा समकालीन प्रवाहातील एक वैशिष्ट्यपूर्ण कथा ठरते. 'विवादे विषादे प्रमादे प्रवासे' या कथासंग्रहातून 'प्रशांत बागड' यांची कथा गंगाधर गाडगीळ यांच्या कथेप्रमाणे काव्यात्म रूप धारण करून येताना दिसते. 'एक स्पष्ट गोष्ट', 'दौत,शाई,टाक' यांसारख्या शीर्षकांपासून त्यांची कथा आशय, विषय,रूपबंधातील नावीन्य जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसते.

एकूणच नव्वदोत्तरी मराठी कथा: प्रेरणा आणि प्रवृत्तींचा शोध घेतल्यानंतर हाती आलेले काही निष्कर्ष आपणाला सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) नव्वदोत्तरी मराठी कथा समुहविषक सहानुभवाच्या प्रेरणेतून निर्माण झाली आहे. समुहमन आणि समुहजीवन यांना सातत्याने स्पर्श करण्याचा ती प्रयत्न करते.

२) नव्वदोत्तर कथेच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असून त्याच्या व्यामिश्र जीवनानुभवाचा खोलवर शोध घेण्याच्या प्रेरणेतून मराठी कथा निर्मिली जाताना दिसते.

३) चिरंतन मानवी मूल्यांची जोपासना, दुःखाचा परिहार आणि भयमुक्त समाजाची निर्मिती या नव्वदोत्तर मराठी कथेच्या निर्मितीमागच्या आणखी काही प्रेरणा आहेत.

४) व्यक्तीजीवनाकडून समुहजीवनाकडे प्रवास करणारी नव्वदोत्तर मराठी कथा सजग, सावध व समकालीन घटनांची साक्षेपाने नोंद करताना दिसून येते.

५) नव्वदोत्तर कथा भोवतालच्या वास्तवाचे अचूक आणि अस्सल भान व्यक्त करण्यासाठी रूपबंधाच्या विविध पैलूंचा नेमकेपणाने उपयोग करते.

संदर्भ :-

Scanned by CamScanner

ISSN - 2278-9308

१) सासणे भारत, नव्वदोत्तर मराठी कथा, खेळ, २२ वा, एप्रिल-जून २०१२, पृष्ठ,१२
२) जोशी सुधा, कथा संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई, प.आ. २०००, पृष्ठ,३२
३) जोशी संजय, जागतिकीकरण आणि नव्वदोत्तर मराठी कथात्म साहित्य, अंतर्नाद, दिवाळी,२०१३, पृष्ठ, १०८
४) कदम महेंद्र, जयंत पवारांची कथा, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जानेवारी, २०१३, पृष्ठ,५५
५) विसपुते गणेश, निळ्या दाताची दंतकथा, सखदेव प्रणव, वॉटरमार्क पब्लिकेशन,पुणे, प.आ. २०१५, मलपृष्ठावरून उद्धृत

Scanned by CamScanner